महानिर्मिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# सृजन

मार्च - जुलै २०२४




## सांघिक कार्य

### उत्कृष्टतेची गुरुकिल्ली
















**Mahagenco Mission 5E workshop held at Nashik Training Centre, Glimpses thereof...**





















आर्थिक वर्ष २०२३-२०२४ मध्ये महानिर्मितीने ऐतिहासिक ६१,४३९ दशलक्ष युनिट्स विक्रमी वीज उत्पादन केले. मागील वर्षाच्या तुलनेत औष्णिक वीज निर्मितीमध्ये ७.५ टक्के वाढ झाली आहे. दोन संचांतून २०० दिवसांपेक्षा जास्त तर सात संचांतून १०० दिवसांपेक्षा जास्त अखंडित वीज उत्पादन करण्यात आले. सर्वोच्च औष्णिक उत्पादन ८,४६० मेगावॅट तर एकूण महत्तम वीज उत्पादन १०,४०३ मेगावॅटची ही विक्रमी कामगिरी करणाऱ्या माझ्या महानिर्मितीच्या सर्व अधिकारी-अभियंता-तंत्रज्ञ-कामगार-कर्मचारी-कुटुंबीय, संघटना प्रतिनिधी, कंत्राटदार-पुरवठादार या सर्वांचे सर्वप्रथम मी मनापासून अभिनंदन करतो.

कामाच्या ठिकाणी दुहेरी संवाद, लक्ष्य निश्चिती आणि जबाबदारीची जाणीव झाली की, आपुलकीची भावना निर्माण होते. काम करण्यात एक प्रकारचा आत्मविश्वास आणि कमालीचा आनंद निर्माण होतो. वैयक्तिकरित्या काम करण्यापेक्षा सांघिकरित्या कामाचा परिपाक अधिक सुलभ असल्याने सांघिक कार्याला अनन्यसाधारण महत्व आहे. मिशन ५-ई ही संकल्पना सांघिक कार्याचाच एक भाग असून या कार्यशाळेच्या माध्यमातून आपल्याला अधिक सकारात्मक वातावरण आणि आर्थिक शिस्त निर्माण करता आली. मात्र, अद्यापही लक्ष्यपूर्तीकरिता अधिक सातत्यपूर्ण प्रयत्नांची गरज आहे.

मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे ९ लाख मेट्रिक टन कोळसा साठा अधिक उपलब्ध असल्याने ह्या वर्षी पावसाळ्यात कोळशाचा तुटवडा किंवा चिंता नाही. गरे पालमा कोळसा खाणीतून देखील लवकरच कोळसा उत्पादन अपेक्षित आहे. ह्या वर्षी कोळसा वाहतुकीच्या विविध स्त्रोतांचा वापर करण्यात आला. कोळसा व्यवस्थापन, सूक्ष्म नियोजन आणि उत्तम समन्वयातून हे शक्य झाले आहे. त्यामुळे इंधन व्यवस्थापनात कार्यरत प्रत्येक व्यक्ती अभिनंदनास पात्र आहे.

औष्णिक विद्युत क्षमता वाढीसोबतच शाश्वत हरित ऊर्जेच्या प्राथमिक कामांना आपण गती देत आहोत. ज्यामध्ये प्रामुख्याने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, पंप स्टोअरेज, हरित हायड्रोजन, नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रातील कामे आकार घेत आहेत. सोबतच पॉवर ट्रेडिंग क्षेत्रात महानिर्मितीने पाऊल टाकले असून २५ मेगावॅट साक्री सौर ऊर्जा प्रकल्पातील वीज खुल्या बाजारात विकण्याचे नियोजन आहे तर १५ मेगावॅट क्षमतेची सौर ऊर्जेची विक्री खाजगी संस्थेला देण्याबाबत करार करण्यात आला आहे. निर्धारित वेळेत गुणवत्तेसह पारंपारिक तसेच नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प पूर्ण करण्याचे खडतर आव्हान प्रकल्प चमू समोर आहे. स्पर्धेत टिकायचे असेल तर आता स्मार्ट काम करायची हीच खरी वेळ आहे.



अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

## मनोगत

महानिर्मिती पर्यावरणपूरक बाबींना कटिबद्ध असल्याने एफ.जी.डी. उभारणीसाठी आर्थिक गुंतवणूक करण्यात आली असून चंद्रपूर येथे ४५ दशलक्ष घनमीटर सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित झाला आहे. चंद्रपूर नंतर आता नागपूर जिल्ह्यात देखील कोळसा पाईप कन्व्हेयर प्रणाली कार्यान्वित झाल्याने पर्यावरणपूरक पद्धतीने थेट खाणीतून कोळसा वाहतूक विद्युत केंद्रात होत आहे.

नुकतेच महानिर्मितीच्या महिला टेबल टेनिस संघाने राष्ट्रीय स्तरावर सुवर्ण ट्रॉफी पटकावली आणि महिला बुद्धिबळ संघाने प्रभावी कामगिरी केली तसेच चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रात कोळसा हाताळणी विभागात वॅगन टिपलर येथे तंत्रज्ञ-३ पदावर ११ महिला भगिनी यशस्वीरीत्या काम करीत आहेत, ही अभिनंदनीय बाब आहे. क्रीडा स्पर्धा, नाट्यस्पर्धाच्या माध्यमातून महानिर्मिती मनुष्यबळाच्या सुप्त गुणांना संधी देण्यात येत असून दैनंदिन कामकाजात अधिक सकारात्मक वातावरण, आनंदाचा स्तर आणि सांघिक कार्यास प्रोत्साहन मिळून कार्यक्षमता वृद्धी होण्यास हातभार लागत आहे, हे विशेष.

आगामी काळात सण उत्सव आणि विधानसभा निवडणूका आहेत त्यामुळे विजेची मागणी वाढणार आहे. राज्याला अखंडीत वीज देण्यासाठी आपण सज्ज राहीले पाहिजे, त्यादृष्टीने सूक्ष्म नियोजन करून यशस्वी वाटचाल करावी लागणार आहे. ऐतिहासिक विक्रमी वीज कामगिरीबद्दल आपणां सर्वांना खूप खूप शुभेच्छा.

**- डॉ. पी. अन्बलगन**

# MAHAGENCO's Direct Interaction with Renewable Energy Project Developers











**An Interactive Meet with National Level Experienced Renewable Energy Project Developers organized by MAHAGENCO. The program was presided over by the Chairman and Managing Director of Mahagenco Hon'ble Dr. P. Anbalagan, while Director (Projects) Shri. Abhay Harne, Director (Finance) Shri. Balasaheb Thite, Director (Operations) Shri. Sanjay Marudkar, Director (Mining) Dr. Dhananjay Sawalkar, Executive Directors Shri. Pankaj Nagdevate, Shri. Rajesh Patil, Shri. Nitin Wagh, Shri. Nitin Chandurkar and Chief Engineers Shri. Rajesh Kumar Oswal, Shri. Sanjay Kurhade, Shri. Kishore Raut were mainly present. On this Occasion, the project developers directly interacted with the MAHAGENCO Management. The meeting was attended by senior officials of MAHAGENCO and a large number of Renewable Energy Project Developers across the country.**













# महानिर्मितीचा १९ वा वर्धापन दिन प्रकाशगड मुख्यालयात उत्साहात साजरा











महानिर्मितीचा १९ वा वर्धापन दिन व शिवराज्याभिषेक दिन प्रकाशगड मुख्यालय येथे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे प्रमुख उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ. पी. अन्बलगन यांचे हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. महानिर्मितीचे संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारूडकर, संचालक (खनिकर्म) मा.डॉ. धनंजय सावळकर तसेच महानिर्मितीचे सर्व कार्यकारी संचालक, मुख्य अभियंते, मुख्य महाव्यवस्थापक, आणि अन्य वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. संचालक (प्रकल्प) मा.श्री. अभय हरणे ह्यांनी थेट फिलीपिन्स या देशातून दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधला व शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ. पी. अन्बलगन ह्यांनी उपस्थित कार्यकारी संचालक, मुख्य अभियंते, मुख्य महाव्यवस्थापक व क्षेत्रीय कार्यालयांतील मुख्य अभियंते यांना दुरदृश्य प्रणालीद्वारे समयोचित मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन सहाय्यक जनसंपर्क अधिकारी श्री. संतोष पुरोहित यांनी केले.


















**Mahagenco Mission 5E workshop held at Chandrapur Super Thermal Power Station Glimpses thereof...**












**महानिर्मिती**
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

वर्ष १९ वे (अंक २)
मार्च - जुलै २०२४

# Maharashtra State Power Generation Company Limited
## MARCH - JULY 2024

### संचालक मंडळ

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक : डॉ. पी. अन्बलगन (भाप्रसे)
संचालक : श्रीमती. आभा शुक्ला (भाप्रसे)
संचालक (वित्त) : श्री. बाळासाहेब थिटे
संचालक (संचलन) : श्री. संजय मारुडकर
संचालक (प्रकल्प) : श्री. अभय हरणे
प्र. संचालक (इंधन) : डॉ. धनंजय सावळकर
संचालक : श्री. विश्वास पाठक

## अनुक्रमणिका

| अनुक्रमणिका | लेखक / लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|
| MAHAGENCO - Yesterday, Today & Tomorrow | Priyanka Katkar | ४ |
| महानिर्मितीने मला घडवलंय याचा मला सार्थ अभिमान आहे | स्वरा दबडे | १५ |
| It's My Life | Sanjay Kulkarni | १९ |

### काव्यकुंज
**पृष्ठ क्र. :** १७ ते १८
**सहभाग :** आनंद आबाराव कोंत, नितीन देवराम सोनवणे, राजेश लक्ष्मण वऱ्हाडे

**सेवानिवृत्ती / निरोप** २९-३०

### प्रशासकीय वृत्त
**पृष्ठ क्र. :** ३, ७ ते १४, १६, २० ते २८, ३१ ते ३२

संपादक : **यशवंत मोहिते**
जनसंपर्क अधिकारी (महानिर्मिती)

संपादन सहाय्य : **संतोष पुरोहित**

**मालकी**
**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या.**
प्रकाशगड, वांद्रे, मुंबई

**श्री. यशवंत मोहिते** यांनी
कार्यालय - **हेमा आर्टस्**
१२१, सागर, प्रभात इंडस्ट्रीयल इस्टेट,
दहिसर चेकनाक्याजवळ, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे,
दहिसर (पूर्व), मुंबई - ४०००६८ येथे छापून
प्रकाशगड, वांद्रे, मुंबई येथे प्रसिध्द केले.

**(खाजगी वितरणाकरिता)**

**The Company accepts no responsibility for the matter published in the Journal.**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**
संपादक, सृजन
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित,
दुसरा मजला, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : pro@mahagenco.in
संकेतस्थळ : www.mahagenco.in

# संपादकीय....

'सृजन' चा हा अंक सांघिक कार्याची महती लक्षात आणून देणारा आहे. महानिर्मितीच्या मनुष्यबळाने ह्या वर्षी ऐतिहासिक विक्रमी वीज उत्पादनाचा उच्चांक गाठल्याबद्दल सर्वत्र उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण आहे. एकीकडे विक्रमी वीज उत्पादन आणि दुसरीकडे भरघोस वेतनवाढ जाहीर झाल्याने 'दुग्धशर्करा' योग जुळून आला आहे. यंदा कोळसा साठा मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याने पावसाळ्यात विशेषत: वीज उत्पादनावर विपरीत परिणाम दिसून आला नाही. मागील कालावधीतील सूक्ष्म नियोजन, दूरदृष्टी आणि वरिष्ठ व्यवस्थापनाच्या खंबीर नेतृत्वातून महानिर्मिती मनुष्यबळाच्या सांघिक कार्यातून ही यशस्वी वाटचाल सुकर झाली, हे विशेष.

महानिर्मिती व्हिजन-२०३५ अन्वये ३२ गिगावॅट अधिक मेगावॅटचे लक्ष्य निर्धारित करण्यात आल्याने वर्ष २०२३-२०२४ आणि २०२४-२०२५ भरीव पायाभूत कामांचे वर्ष असल्याने सन २०३५ च्या यशाची नांदी निश्चित करणारी ही दोन वर्षे आहेत. त्यामुळे स्थापित क्षमता वाढ, बदली वीज प्रकल्प, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०, हरित हायड्रोजन, गरे पालमा खाण विकसित करणे, एफ.जी.डी., कोल पाईप कन्व्हेयर, नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प उभारणी इत्यादी बाबींचा समावेश करण्यात आला असला तरी औष्णिक विद्युत उत्पादनाकडून शाश्वत हरित ऊर्जेकडील हा प्रवास निश्चितच आव्हानात्मक आहे. ओनरशिपसह प्रत्येकाने आपले भरीव योगदान देण्याची आता खरी गरज आहे.

'सृजन' च्या या अंकात विक्रमी वीज उत्पादन, कोळसा नियोजन, मिशन ५ ई कार्यशाळा "मानव संसाधन उत्कृष्ट कार्यसंस्कृती" आदानप्रदान, सौर ऊर्जा प्रकल्प विषयक विकासक आणि पॅनेल उत्पादक यांचेसमवेत थेट संवाद, आंतरविद्युत क्रीडा स्पर्धा, वर्धापन दिन, महिला दिन, नारी शक्तीचा पुढाकार, पर्यावरण दिन, प्रशिक्षण उपक्रम, पुस्तक प्रकाशने, लेख, कविता, सेवानिवृत्ती आणि इतर ज्वलंत घडामोडी यांचा सचित्र वेध घेण्यात आला आहे. महानिर्मिती मनुष्यबळासोबतच महानिर्मितीशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष जोडल्या गेलेल्या संस्था, संघटना प्रतिनिधी, कुटुंबीय यांचेसाठी हा अंक निश्चितच वाचनीय ठरेल, असा मला विश्वास आहे.

महानिर्मिती घडामोडी विषयक माहिती महानिर्मितीच्या वाचकांपर्यंत पोहोचविण्याचे अतिशय महत्वाचे कार्य 'सृजन' गृहपत्रिकेच्या माध्यमातून होत असल्याने महानिर्मिती परिवाराशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष अतुट नाळ जुळली आहे, याचा मनस्वी आनंद आहे.

**- यशवंत मोहिते**

## महानिर्मिती ऐतिहासिक विक्रमी कामगिरी

**“आर्थिक वर्ष २०२३–२०२४ मध्ये महानिर्मितीचे ऐतिहासिक ६१,४३९ दशलक्ष युनिट्स वीज उत्पादन मागील वर्षाच्या तुलनेत औष्णिक वीज निर्मितीमध्ये ७.८५ टक्के वाढ दोन संचांतून २०० दिवसांपेक्षा जास्त तर सात संचांतून १०० दिवसांपेक्षा जास्त अखंडित वीज उत्पादन”**

वीज क्षेत्र झपाट्याने बदलत असल्याने वीज ग्राहकांना रास्त दरात वीज उपलब्ध करून देण्यासाठी दिवसेंदिवस स्पर्धा वाढतच आहे. त्यानुसार महानिर्मितीने तांत्रिक आणि वाणिज्यिक बाजूंवर लक्ष्य केंद्रित करून कार्यक्षम वीज उत्पादनासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न केल्याने २०२३–२४ या आर्थिक वर्षात महानिर्मितीचे वीज उत्पादन ऐतिहासिक ६१,४३९ दशलक्ष युनिट्स इतके झाले आहे. त्यात भुसावळ ७,५७५.२३५ दशलक्ष युनिट्स, चंद्रपूर १६,२७९.६६९ दशलक्ष युनिट्स, पारस ३,५९५.९८३ दशलक्ष युनिट्स, कोराडी १३,२००.३०१ दशलक्ष युनिट्स, खापरखेडा ८,२६७.४०९ दशलक्ष युनिट्स, नाशिक २,६४७.३७६ दशलक्ष युनिट्स, परळी ४,१०४.२१६ दशलक्ष युनिट्स आणि उरण १,७६९.०३२ दशलक्ष युनिट्स, जल विद्युत प्रकल्प ३,६६७.८३३ दशलक्ष युनिट्स, सौर ऊर्जा प्रकल्प ३३२.१०५ दशलक्ष युनिट्स इतकी विजेची निर्मिती केली आहे. या यशस्वी कामगिरीबाबत महानिर्मितीचे मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी महानिर्मितीच्या अधिकारी, अभियंता, तंत्रज्ञ, कामगार, कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे.

मागील वर्षाची आकडेवारी पाहिली असता सन २०२२–२०२३ मध्ये ५७,७३४ दशलक्ष युनिट्स अशी ५.९८ टक्के वाढ तर सन २०२३–२०२४ मध्ये ६१,४३९ दशलक्ष युनिट्स आणि ७.८५ टक्के वाढ झाली आहे, हे विशेष.

### त्रिसूत्री, इंधन व्यवस्थापन आणि दैनंदिन व्ही.सी. ठरली गेमचेंजर

महानिर्मितीचे मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी त्रिसूत्री प्रोग्राम आखून दिला. त्यामध्ये संचाच्या कार्यक्षमता वाढीसाठी भरपूर प्रयत्न केले. जसे प्रभावी इंधन वापर व व्यवस्थापन, सहाय्यकारी वीज वापर कपात, आर्थिक शिस्त, काटकसर, १० टक्के संचलन सुव्यवस्था खर्चात कपात, देखभाल दुरुस्तीबाबत गुणवत्ता, संचाची उपलब्धता वाढविण्यावर भर, उष्मांक दरात वाढ तसेच मिशन झिरो डिसअलाऊन्स सारख्या उपक्रमांतून थेट कार्यकारी अभियंता यांचेशी सुसंवाद साधून महानिर्मितीच्या सर्व संचांची उपलब्धता वाढण्यास मोठा हातभार लागला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मा. संचालक, कार्यकारी संचालक यांनी उत्तम नियोजन करून क्षेत्रीय मुख्य अभियंते, उप मुख्य अभियंते, अधीक्षक अभियंते यांचेशी रोज सकाळी दुरदृश्य प्रणालीद्वारे आभासी बैठका, प्रत्यक्ष वीज केंद्र स्थळी वेळोवेळी दौरे करून आढावा घेतल्याने सूक्ष्म नियोजन यशस्वी झाले.

सद्यस्थितीत महानिर्मितीच्या औष्णिक वीजनिर्मिती केंद्रांमध्ये पुरेसा कोळसा साठा उपलब्ध असून मागील वर्षांच्या तुलनेत ३ लाख मेट्रिक टन जास्त कोळसा साठा आहे. त्यामुळे आगामी काळात महत्तम वीज उत्पादनाकरिता महानिर्मितीकडे पुरेसा कोळसा साठा उपलब्ध आहे.

### वीज केंद्रांची उल्लेखनीय कामगिरी

- २५० मेगावॅट पारस संच ४ मधून सलग २६७ दिवसांपेक्षा जास्त वीज उत्पादन.
- ५०० मेगावॅट चंद्रपूर संच क्रमांक ८ मधून २३४ दिवस अखंडित उत्पादन.
- महानिर्मितीच्या सात संचांमधून १०० दिवसांपेक्षा जास्त दिवस अखंडित वीज उत्पादन. (भुसावळ संच क्र. ५, कोराडी संच क्र. ६ व ९, चंद्रपूर संच क्र. ३, पारस संच क्र. ३, परळी संच क्र. ६, नाशिक संच क्र. ४)
- महानिर्मितीचे सर्वोच्च औष्णिक वीज उत्पादन ८,४६० मेगावॅट.
- २९ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ०९.४५ वाजता १०,४०३ मेगावॅट इतके विक्रमी वीज उत्पादन.

### महानिर्मितीची शाश्वत हरित ऊर्जेत भरीव कामगिरी

महानिर्मितीने या वर्षभरात सुमारे ८ हजार मेगावॅटपेक्षा अधिकच्या नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प कामांचे नियोजन केले असून त्यात सौर ऊर्जा, तरंगता सौर ऊर्जा प्रकल्प, पवन ऊर्जा, उदंचन जल विद्युत केंद्र, हरित हायड्रोजन प्रकल्पांचा समावेश आहे. या संदर्भात देशातील नामांकित सौर पॅनल उत्पादक आणि विकासक यांचे समवेत नुकतेच कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले, ज्यास उत्तम प्रतिसाद लाभला.

### पर्यावरणपूरक यंत्रणेचा अवलंब

महानिर्मितीने २३ संचांसाठी एफ.जी.डी. यंत्रणा लावण्याचे निश्चित केले आहे तसेच भुसावळ येथे सौर ऊर्जेच्या सहाय्याने २० घनमीटर प्रति तास क्षमतेचा हरित हायड्रोजन प्रकल्प उभारत आहे. याचबरोबर चंद्रपूर येथे ५० दशलक्ष घनमीटर क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित केला आहे. तसेच कोल पाईप कन्व्हेयरद्वारे खाणीतून थेट कोळसा वीज केंद्रात आणण्याची प्रणाली कार्यान्वित झाली असून कोराडी–खापरखेडा येथे कोल पाईप कन्व्हेयर प्रणाली टप्पा १ सुरू झाला आहे.

# MAHAGENCO
## Yesterday, Today & Tomorrow

**- Priyanka Hanmant Katkar**
**Asst. Engineer (SPGD-P)**
**H.O. Mumbai.**

'आजादी का अमृत महोत्सव' निमित्त महानिर्मितीतर्फे राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर निबंध स्पर्धेतील द्वितीय क्रमांक (विभागून) प्राप्त महानिर्मिती कर्मचाऱ्याचा निबंध. विजेत्या स्पर्धकांचे निबंध टप्याटप्याने उलट गुणांनुक्रमांनुसार यापुढील सृजन अंकात प्रसिद्ध केले जातील.

MAHAGENCO has kept vision as "*Generating adequate power for Maharashtra on a sustainable basis at competitive rates in a socially responsible manner*". Though Mahagenco is heading 2nd highest power generation in terms of installed capacity in India, to sustain in future and for growth it's time to amend the vision of Mahagenco as ***"Generating adequate power for Maharashtra on a sustainable basis at competitive rates in a socially responsible manner at the same time develop related products and services at competitive prices, integrating multiple energy sources with innovative and Eco-friendly technologies"***

Mahagenco has been growing with its exemplary journey and its contribution towards nation building. Mahagenco should raise the level from being a State company to being an international behemoth and should dream of becoming the bigger multi-national in field of energy. Mahagenco needs to keep growing and add capacity as the country needs to keep pace with the ever growing demand for energy. MSPGCL's impressive record of producing almost a billion units every day. It is privilege for every MSPGCL's as every employee worked round the clock during the lockdown phase not only during the last year but also in 2021 to ensure uninterrupted power supply to the nation.

During FY2020-2021 in covid-19 pandemic situation, for the first time in the last 60 years Mahagenco generated highest record 10445 MW of electricity. Also being social responsibility towards society Mahagenco went out of its way to do some valuable experiments like Mission Oxygen during second wave of covid-19 in Maharashtra. Under Mission oxygen concept, Mahagenco's Parali power station set up a war level oxygen plant at Swami Ramanand Tirth Hospital, Ambejogai & Parabhani district hospital and made it operational. Likewise oxygen supplied from Khaperkeda power station to Kamathi hospital, Nagpur. On 9th march 2021, Mahagenco achieved the highest ever historic power generation of 10445 MW.

Mahagenco adapted work culture in efficient manner by implementation of undertaking **Mazi Mahanirmiti-Maze yogdan** to interact with employee from field office to employee from upper management. Since 2005, from trifurcation Mahagenco supplies all the electricity only to MSEDCL, the financial pillars of Mahagenco are based on funds received from MSEDCL. Currently Mahagenco is facing two largest challenges which are fuel supply uncertainty and deteriorating finances from Mahadiscom. Due to covid-19 pandemic situation and especially during lockdown period unfortunately, due to the challenge of recovery of electricity bills in front of Mahadiscom due to exhausted electricity bills, it is only natural that it will directly affect Mahagenco to some extent.

MSPGCL is having generation capacity of 13602 MW comprising 10170 MW thermal, 2580 MW hydel, 672 MW gas turbine and 207 MW solar. The power generated by MSPGCL is supplied to the State of Maharashtra. In terms of installed capacity, Mahagenco is being second highest generation company after NTPC (National Thermal Power Corporation Limited)still there is huge gap between actual power generation & installed capacity. In the future, Mahagenco should strive to maintain maximum power generating sets according to Merit Order Dispatch (MOD) policy by controlling generation & maintenance costs. The need of hour is to identify and implement solutions with utmost urgency. Moreover, instead of taking populist measures, Mahagenco should focus on improving overall management of MSPGCL through steps such as efficient utilization of material, man-power, empowering energy generation through Renewable energy, efficient control & management of AMC's (Annual Maintenance Contracts) in all power

plants and Mahagenco needs to be strictly frugal by prioritizing work & supply related tenders in every power stations.

The past decade had been highly challenging for the power generation segment. The MSPGCL is plagued with issues pertaining to fuel availability, increase in imported coal prices, declining plant load factors, poor financial health of company and delay in clearances. Fuel security is the most bottleneck for the industry as it accounts for nearly three-fourths of total cost of generation.

To seek the position in future MSPGCL will need to resolve issues around :

1. Energy demand.
2. Penetration of renewable energies.
3. The degree of commitment to CO2 emissions reduction.
4. The different cost of fuels and generation mix infrastructure.
5. Pressure to reduce power prices.

In the light of these realities MSPGCL needs to implement following key solutions to generate power to contend with the vision.

1. It is need of future to take actions for replacements with state of art new technology to improve efficiency of individual auxiliaries & with reduced cost.
2. Adopt a business model that turns environmental awareness in to a competitive advantage.
3. Make intensive use of information and telecommunication technologies.
4. Manage their investment and operating cost effectively.
5. Integrate multiple power generation sources effectively,
6. Promote the effective development of new electric technologies capable of properly managing power systems that have a large penetration of renewable generation, distributed generation, energy storage, electric vehicles, demand management programs etc.

**Main guideline to improve competitive position includes :-**

1. Improving staff capabilities through training & appropriate hiring and retention processes.
2. Redesigning business procedures by eliminating unproductive tasks and redundant control activities.
3. Reducing hierarchy levels to build lean organizations.
4. Increasing the performance ratio of generation units and improving their availability.
5. Optimizing portfolio generation and the fossil fuel supply process.
6. Effectively managing regulatory issues.
7. Developing a culture focussed on the client through effective customer services, improved switching processes etc.

Renewable energy sources (RE) have an important role to play in meeting the objectives of the 2030 Agenda for Sustainable Development. Accordingly, Mahagenco is working hard towards its solar capacity Addition programme, During Pandemic period Mahagenco awarded solar projects in a total capacity of 463 MW through PPP(public-private partnership) Mode, further 16 MW projects under CMAG-Feeder scheme has been commissioned. Mahagenco awarded total 137 MW cumulative capacity grid interactive Solar PV projects under EPC (Engineering, procurement, and construction)mode. Also Mahagenco awarded 250MW Dondaicha solar park to M/s. TP Saurya Pvt. Ltd. Currently, total 207 MW capacity of Ground mounted solar projects are commissioned by Mahagenco. Since from last decade Mahagenco is facing lot of issues and challenges to install solar projects which includes land demarcation issue, work hindrance from local peoples. There is need of proper planning & take in action towards commissioning of solar projects. By rectifying ***"To preserve the world by using existing water bodies in our Maharashtra to generate renewable Solar energy in a more efficient way, while at the same time protecting scarce water and precious land"*** future need, Mahagenco has proposed to develop 105 MW floating solar park at Erai Dam Dist. Chandrapur under Ministry of New Renewable Energy (MNRE's) Scheme of UMREPP (Ultra Mega Renewable Energy Power Park) Mode-8 notified on 15.06.2020.

In order to survive and sustain in future, Mahagenco should have to expand business and need to enter in other business apart from Power Generation which includes providing consultancy services, project management and lastly enter in PV module manufacturing and this business should be diversified all across the globe. Mahagenco should have to utilize experienced manpower efficiently and engage them in the work of consultancy services and project management also. MSPGCL needs to adapt the 'triple bottom-line approach' recognizing People, Planet and Profit as primary pillars of corporate sustainability by keeping in mind development should not endanger the natural systems.

Mahagenco needs to prepare Sustainability Report based on the Global Reporting Initiative (GRI), Sustainability Report will help us in measuring and monitoring our Company's Performance. It is very important management tool helping us re-look at our Company's system, policies and procedure. MSPGCL needs to develop a policy in accordance with a Sustainable Development plan for every financial year. The main focus on sustainable development should cover waste management, water management, bio-diversity, promotion of renewable energy.

MSPGCL has always envisaged environment protection as one of its prime responsibilities and focuses its efforts to mitigate the impact of its operation on surrounding environment. To meet the environmental challenges of 21st century and beyond, the Company has adopted sound environment management practices and advanced environment protection system to minimize impact of power generation on environment. It has adopted advanced and high efficiency technologies, such as super critical boilers for commissioned and upcoming green field projects. Around 12-15% of the project cost is spent on various environment protection equipments, such as Electrostatic Precipitators (ESPs), Liquid Waste Treatment Plants (LWTP), Ash Water Re-circulation System (AWRS), Dry Ash Extraction System, Dust Extraction, Suppression System, Ambient Air Quality Monitoring System, Flue Gas Conditioning System and Desulphurization System etc. is augmenting its capacity by installing solar power systems and small hydel power systems attached to its thermal power stations, wherever possible, so as to encourage garnering of renewable energy resources. These measures are aimed not only to achieve reduction in pollution and minimize use of precious natural resources but also to lead to reduction of $CO_2$ emissions per unit of generation thereby reducing global warming. Still Mahagenco needs to maintain continuity towards preserving environment & managing environment by setting vision ***"Going Higher on Generation, Higher Green capacity addition, lowering carbon footprints and GHG emissions."*** MSPGCL is augmenting its capacity by installing solar power systems and small hydel power systems attached to its thermal power stations, wherever possible, so as to encourage garnering of renewable energy resources. These measures are aimed not only to achieve reduction in pollution and minimize use of precious natural resources but also to lead to reduction of CO2 emissions per unit of generation thereby reducing global warming.

MSPGCL has to focus on research efforts to address the major concerns of the power sector as well as the futuristic technology requirements of the sector. MSPGCL needs to take action for technology development and scientific services in the domain of electric power to enable seamless work flow right from concept to commissioning. The focus areas of R&D should be -Efficiency Improvement & Cost Reduction; New & Renewable Energy; Climate Change & Environmental protection which includes water conservation, Ash utilization & Waste Management. Currently all public sector companies in central are taking advantage of 1% of PAT (The Perform, Achieve and Trade (PAT) Scheme) for R&D activities. Research & Development team of MSPGCL should be comprising of eminent scientists and experts from India and abroad will in place to steer research direction. Research & Development team of MSPGCL will provide directions for undertaking specific applied research projects aimed to develop techniques in power plant for efficient, reliable and environment friendly operation with emphasis on reducing cost of generation. R&D team will provides Advanced Scientific Services to all its stations and many other utilities in the area of oil/water chemistry, environment, electrical, Rotor dynamics etc. For efficient performances.

The government has allowed thermal power generation companies to bundle RE along with thermal power and supply it to Discom's under existing PPAs. As the cost of renewable energy is less than the cost of thermal energy, According to Ministry of Power (MoP), the gains from the bundling of renewable energy with thermal will be shared between the generator and distribution companies/other procurers on a 50:50 basis. This step by the Central Government will lead to a faster energy transition and will be beneficial for both the generating and the distribution companies.

Every employee in the company should have to focus on work by keeping in mind that - **Your Company is market leader in power generation and has its presence in the entire power sector value chain which gives it a competitive edge in the market. Your Company continues to focus on scaling up generating capacity through a mix of conventional and non-conventional fuel sources, efficiently running its installed capacity and providing other value adding services like power trading, consultancy etc.**

******

## महानिर्मितीचा १९ वा वर्धापन दिन प्रकाशगड मुख्यालयात उत्साहात साजरा

मागील दोन वर्षांपासून महानिर्मितीचे वीज उत्पादनात नवनवीन विक्रम प्रस्थापित होत आहेत आणि सूक्ष्म नियोजनाच्या सहाय्याने देखभाल–दुरुस्ती, भांडवली कामात सातत्याने सुधारणा करण्यात येत असल्याने दैनंदिन कामात सकारात्मक बदल दिसून येतोय. असे असले तरी स्पर्धेच्या युगात नवनवीन आव्हानांचा सामना करताना आपल्याला कार्यक्षमतेत अधिक वाढ करावी लागणार आहे. महानिर्मितीच्या उज्ज्वल भविष्याचे आपण भागीदार असल्याचा अभिमान वाटेल असे सांघिक कार्य करण्यास सर्वांनी तत्पर राहण्याचे तसेच प्रत्येकाने जास्तीत जास्त योगदान द्यावे, असे आवाहन महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ. पी. अन्बलगन यांनी केले, ते वर्धापन दिन सोहळ्याप्रसंगी प्रकाशगड मुख्यालय येथे बोलत होते.

महानिर्मितीचा १९ वा वर्धापन दिन व शिवराज्याभिषेक दिन प्रकाशगड मुख्यालय येथे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे प्रमुख उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ. पी. अन्बलगन यांचे हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. महानिर्मितीचे संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारूडकर, संचालक (खनिकर्म) मा.डॉ. धनंजय सावळकर तसेच महानिर्मितीचे सर्व कार्यकारी संचालक, मुख्य अभियंते, मुख्य महाव्यवस्थापक, आणि अन्य वरिष्ठ अधिकारी–कर्मचारी उपस्थित होते.

वीज संचाची उपलब्धता, कार्यक्षमता वाढ, बाजारातील स्पर्धा, विविध क्षेत्रातून महसूल वाढीवर लक्ष आणि औष्णिक उत्पादनाकडून नवीकरणीय ऊर्जा क्षेत्राकडे महानिर्मितीची यशस्वी वाटचाल सुरू असून महानिर्मितीचा नावलौकिक कायम ठेवण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे मा.डॉ. पी. अन्बलगन यांनी सांगितले.

संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे यांनी महानिर्मितीचे विविध आर्थिक स्त्रोत तपासताना महानिर्मिती 'व्हीजन २०३५' नुसार स्वयंपूर्णतेकडे नेण्यासाठी प्रत्येकाने आपले यथायोग्य योगदान देणे गरजेचे असल्याचे सांगितले. तर संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारूडकर यांनी महानिर्मितीचा १८ वर्षांच्या प्रवासाचा तुलनात्मक आढावा घेतला आणि विक्रमी कामगिरी हा यातील केवळ एक टप्पा असून कार्यसुधारणा करण्यास भरीव संधी असून प्रत्येकाने वैयक्तिक जबादादारी घेत काम करावे असे आवाहन केले. संचालक (प्रकल्प) मा.श्री. अभय हरणे ह्यांनी थेट फिलीपिन्स या देशातून दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधला व शुभेच्छा दिल्या.

संचालक (इंधन) मा.डॉ. धनंजय सावळकर यांनी आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर मागील वर्षांच्या तुलनेत मुबलक कोळसा साठा उपलब्ध असल्याचे तसेच महानिर्मितीच्या माध्यमातून मागील वर्षी एकूण विविध संवर्गातील १,११७ उमेदवारांना थेट नियुक्ती देण्यात आली असल्याचे विषद केले. झपाट्याने बदलत्या क्षेत्रात भरपूर संधी आहे. तसेच दैनंदिन कामकाजाचे डिजिटल तंत्रज्ञानात रूपांतर करून गतिमानता वाढली असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी उपस्थित कार्यकारी संचालक व क्षेत्रीय कार्यालयांतील मुख्य अभियंते यांनी दुरदृश्य प्रणालीद्वारे समयोचित मार्गदर्शन केले. मागील वर्षांमध्ये महानिर्मितीच्या अनेक वीज निर्मिती संचांनी अखंडित वीज निर्मितीचे अनेक विक्रम प्रस्थापित केले असून राज्यातील वीजग्राहकांना सातत्यपूर्ण वीज पुरवठा करणेकरता उत्तरोत्तर अशीच वीज निर्मिती करत राहण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाला महानिर्मितीचे कार्यकारी संचालक सर्वश्री. पंकज नागदेवते, विवेक रोकडे, राजेश पाटील, नितीन चांदुरकर, डॉ. नितीन वाघ, पंकज सपाटे तसेच मुख्य अभियंते सर्वश्री. संजय कुऱ्हाडे, श्रीमती. विजया बोरकर, राहुल नाळे, प्रसन्न कोटेचा, चंद्रशेखर होळंबे, दत्तात्रय साळुंखे, सुनिल सोनपेठकर, राजेश कराडे, शशांक चव्हाण, आणि मुख्य महाव्यवस्थापक आनंद कोंत, पंकज शर्मा, कंपनी सचिव राहुल दुबे, विधी सल्लागार सुमंत कोल्हे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी पुरुषोत्तम वारजुरकर आणि अन्य वरिष्ठ अधिकारी–कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन सहाय्यक जनसंपर्क अधिकारी श्री. संतोष पुरोहित यांनी केले.

## चंद्रपूर कोळसा हाताळणी विभाग वॅगन टिपलर नारीशक्तीला सुपूर्द

चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र कोळसा हाताळणी विभाग वॅगन टिपलर 'बी' ५०० मेगावॅट येथे पूर्णत: नारी शक्तीने संचालित महिला रोटा सुरू करण्यात आला असून एकूण ११ महिला कर्मचारी यामध्ये कार्यरत आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने दर्शना नन्नावरे, ए.एस. खोब्रागडे, शर्मिला मुनघाटे, पी.डी. तामगाडगे, आर.डी. चौहान, शीतल आवळे, क्रांती सूर्यवंशी, विजया गोहणे, परवीन शेख, चेतना रामटेके, विद्या भोयर यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे या महिलांच्या सुरक्षेसाठी 'महिला सुरक्षा कर्मचारी' तैनात करण्यात आले आहेत.

एकूण तीन रोटे तयार करण्यात आले आहेत त्यामध्ये रोटा १ – टिपलर १, रोटा २ – टिपलर २ आणि रोटा ३– वजनकाटा आहे. प्रथमत: 'ब' आणि 'क' पाळीत हा प्रयोग सुरू करण्यात आला. दि. ८ एप्रिल पासून रात्रपाळीत महिला रोट्यात तीन महिला कर्मचाऱ्यांनी ४७ एन बॉक्स वॅगन आणि ५७ बी.ओ. बी.आर. वॅगन रिकाम्या केल्या. तंत्रज्ञ–३ या पदावर कार्यरत असलेल्या विजया गोहणे, दर्शना नन्नावरे आणि विद्या भोयर (ताजने) या तिघींनी हे काम सहजरित्या यशस्वी करून नारी शक्तीने आपल्या कामाची चुणूक दाखवून दिली. या तिघींचे विशेष अभिनंदन.

'महिलांच्या हाती विजेची दोरी' या संकल्पनेनुसार नारी शक्तीला प्रोत्साहित करण्यासाठी हा अभिनव उपक्रम चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता श्री. गिरीश कुमरवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि श्री. श्याम राठोड, उप मुख्य अभियंता (कोळसा हाताळणी विभाग) यांनी सुरू केला आहे.

## Central Electricity Aauthority's Committee Visit to Koradi Training Centre

Chairman of CEA Committee, Shri. Pravin Gupta, Member Thermal CEA New Delhi, Shri. T. Venkatswarlu, Chief Engineer (Thermal Engineering & Technology Development) CEA New Delhi with Shri. Bashiruddin Khan, Chief Engineer MP Genco and Shri Pankaj Sapate ED (O&M-II), Shri. Vilas Motghare CE Koradi TPS, Shri. Vijay Rathod CE Khaperkheda TPS, Visited Koradi Training Centre on 17th May 2024.

Shri. Pravin Gupta addressed newly joined Induction level trainees & shared their experience of CEA & motivated by thinking differently while working in Power Station. Further, he said that adoption of new technologies and innovations is the key for sustainable development and out of box thinking is needful for the development of any organisation. He reiterated that in fast changing scenario of power sector, freshers have bright future for their career.

## महानिर्मितीच्या कनिष्ठ / सहाय्यक रसायनशास्त्रज्ञ यांचे इंडक्शन लेव्हल प्रशिक्षण

कोराडी प्रशिक्षण केंद्रामध्ये दिनांक १५.०७.२०२४ पासुन कनिष्ठ / सहाय्यक रसायनशास्त्रज्ञ यांचे इंडक्शन लेव्हल बॅच चे प्रशिक्षण वर्गाला सुरुवात झाली.

सदर बॅचचे उद्घाटन कोराडी प्रशिक्षण केंद्राचे मुख्य अभियंता (प्रशिक्षण) श्री. सुनिल सोनपेठकर यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे श्री. विजय राठोड, मुख्य अभियंता, औष्णिक वीज केंद्र, खापरखेडा यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच या कार्यक्रमास अधीक्षक रसायनशास्त्रज्ञ श्री. राजेश चिवाने, श्री. विवेक घोडमारे तसेच अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) सौ. भारती विजयकर, सौ. अरुणा भेंडेकर व इतर अधिकारी वर्ग यांची उपस्थिती लाभली. प्रशिक्षण वर्गामध्ये एकुण २७ प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सौ.श्रद्धा सुके, अतिरिक्त कार्यकारी अभियंता व आभार प्रदर्शन कोराडी प्रशिक्षण केंद्रातील उप कार्यकारी अभियंता श्री. प्रशांत धांदे यांनी केले.

## माऊंट एव्हरेस्ट बेसकॅम्पची यशस्वी सफर

माऊंट एव्हरेस्ट जगातील सर्वात उंच पर्वत शिखर ८८४६.८६ मीटर उंच आणि या शिखराची अगदी जवळून भेट घालून देणारा एव्हरेस्ट बेस कॅम्प ट्रेक. नेपाळमधील एवरेस्ट बेस कॅम्प पर्यंत ट्रेकिंग हे अनेक मैदानी उत्साही आणि निसर्ग प्रेमींसाठी एक स्वप्नातील साहस आहे. हिमालयाच्या मध्यभागी वसलेला हा प्रतिष्ठित ट्रेक चित्तथरारक दृश्ये, सांस्कृतिक विविधता आणि जगातील सर्वोच्च शिखराच्या पायथ्याशी जाताना सिद्धीची अनुभूती देतो. समुद्रसपाटीपासून ५३६४ मीटर उंच. अवघड वाट, सोबत आपल्या पाठीवर सामानाचे ओझे, उणे १५ ते उणे ५ अंशापर्यंत जाणारे न्यूनतम तापमान असा शारीरिक व मानसिक क्षमतेची परीक्षा पाहणारा अत्यंत अवघड समजला जाणारा एव्हरेस्ट बेस कॅम्प ट्रेक महानिर्मितीच्या नविकरणीय ऊर्जा मंडळ पुणे येथे चाचणी विभागात कार्यरत उप कार्यकारी अभियंता सौ. रश्मी सुनील निमजे यांनी १५ ते ३० एप्रिल २०२४ या कालावधीत यशस्वीरित्या पूर्ण केला. सौ रश्मी यांनी १८ एप्रिल रोजी नेपाळ येथील लुकला येथून प्रत्यक्ष ट्रेकला सुरुवात केली व दररोज पायी ६ ते ८ तास प्रवास करून हा टप्पा यशस्वीरित्या गाठला. लुकला, फाकडींग, नामचे बाजार, डेबुचे, डिंगबोचे, थुक्ला पास, लोबूचे, गोरखशेप असा अत्यंत अवघड वाटेने व प्रतिकूल हवामानात प्रवास करत त्यांनी २५ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजता एव्हरेस्ट बेस कॅम्प यशस्वीरित्या सर केला. समुद्रसपाटीपासून ५,३६४ मीटर उंच व उणे ६ अंश तापमानात त्यांनी आपले लक्ष्य यशस्वीरित्या गाठले.

सौ. रश्मी यांना गिर्यारोहणाची आवड असून त्यांनी जी ट्राइब या ग्रुपच्या माध्यमातून पूणे आणि परिसरातील शिवनेरी, सिंहगड–कल्याण दरवाजा, डोंगरवाडी, कोरीगड, घोराडेश्वर असे अनेक ट्रेक पूर्ण केले आहेत.

महानिर्मिती कंपनी वीज निर्मिती क्षेत्रात नवनवीन उच्चांक स्थापन करत असून यात नारी शक्तीचा सिंहाचा वाटा आहे. चाचणी विभागातील अत्यंत व्यस्त वेळापत्रक सांभाळून व कौटूंबिक जबाबदाऱ्याही यशस्वीरित्या पार पाडून त्यांनी आपला आगळावेगळा साहसी छंद जोपासल्याने त्यांचे हे यश निश्चितपणे कौतुकास्पद आहे. सौ. रश्मी यांनी नवीकरणीय ऊर्जा मंडळ पूणे येथील वरिष्ठ अधिकारी व सहकारी यांनी केलेल्या सहकार्याबद्दल व दिलेल्या प्रोत्साहनाबद्दल आभार मानले आहेत. सौ. रश्मी यांनी जगाच्या पाठीवरील वेगवेगळी पर्वत शिखरे सर करण्याचा मानस बोलून दाखवला असून त्यांच्या या उपक्रमास महानिर्मिती परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा.

## पारस वीज केंद्र संच-४ चा २६७ दिवस अखंडित वीज उत्पादनाचा नवा ऐतिहासिक विक्रम

**“ महानिर्मितीच्या आजवरच्या इतिहासात अखंडित वीज उत्पादन करण्याचा नवा विक्रम पारस वीज केंद्राच्या नांवे चंद्रपूर वीज केंद्र संच-३ चा मोडला विक्रम ”**

महानिर्मितीच्या पारस वीज केंद्राने वीज उत्पादनात कायम नावलौकिक राखला आहे. २५० मेगावॅट क्षमतेचा हा संच क्रमांक ४ सलग मागील २६७ दिवसांपासून सुरू आहे. अखंडित वीज उत्पादन करीत असल्याने महानिर्मितीच्या आजवरच्या इतिहासात या संचाने नवीन ऐतिहासिक विक्रम प्रस्थापित केला आहे. २१० मेगावॅट चंद्रपूर संच क्र.३ च्या नावे या अगोदर अखंडित वीज उत्पादनाची सन २००९ मध्ये २६६ दिवसांच्या विक्रमाची नोंद होती तो विक्रम मोडून पारस वीज केंद्राने आपले नांव कोरले आहे.

पारस संच क्रमांक ४ ने या २६७ दिवसांत १३८५.१ मिलियन युनिटस आणि सरासरी २१६ मेगावॅटसह वीज उत्पादन केले आहे.

पारस वीज केंद्राने नोव्हेंबर-२०२३ (९०.२२%), जानेवारी-२०२४ (९१.०२%) आणि फेब्रुवारी-२०२४ (९५.५५%) मध्ये मासिक महाराष्ट्र वीज नियामक आयोग उपलब्धता घटक वर Zero Disallowance ‘शून्य नामंजूर’ लक्ष्य यशस्वीरीत्या साध्य केले आहे हे विशेष.

पारस वीज केंद्राने २०२३-२०२४ आर्थिक वर्षासाठी फेब्रुवारी-२०२४ (९३.९७%) मध्ये सर्वाधिक मासिक केंद्रीय विद्युत प्राधिकरण भारांक गाठले आहे.

पारस वीज केंद्राने ऑगस्ट-२०२३ पासून मासिक विशिष्ट इंधन वापर वर ‘शून्य अस्वीकृती’ प्राप्त केली आहे.

पारस वीज केंद्राच्या या सर्वोत्तम कामगिरीबाबत महानिर्मितीचे मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, मा. संचालक-कार्यकारी संचालक वर्ग यांनी पारस औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता आणि चमूचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

उन्हाळ्यात विजेची वाढती मागणी लक्षात घेता, पारस वीज केंद्र आपला नावलौकिक कायम राखत महत्तम वीज उत्पादनासाठी सज्ज असल्याचे मुख्य अभियंता श्री. शरद भगत यांनी सांगितले.

## कोयना जल विद्युत प्रकल्प टप्पा ३ मधील संच क्र. ११ कार्यान्वित

महानिर्मितीच्या पोफळी जलविद्युत केंद्र टप्पा ३ ची स्थापित क्षमता ३२० मेगावॅट असून प्रत्येकी ८० मेगावॅट क्षमतेचे चार संच कार्यान्वित आहेत. एकूण चार संचांपैकी, संच क्रमांक ११ हा दि. १० जुलै २०२३ पासून स्टेटर अर्थ फॉल्टमुळे बंद होता. यातील तांत्रिक बिघाड असलेल्या स्टेटर बदलीचे अत्यंत क्लिष्ट स्वरूपाचे भांडवली खर्चाचे काम केवळ ९ महिन्यात यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले व हा संच दि. २३ एप्रिल २०२४ रोजी यशस्वीरित्या कार्यान्वित करण्यात आला. अशा प्रकारचे तांत्रिक दुरुस्तीचे काम प्रथमच पोफळी जलविद्युत केंद्राचे अधिकारी, अभियंते, तंत्रज्ञ आणि विविध विभागांचे कंत्राटी कामगार, विशेषत: मेकॅनिकल मेंटेनन्स, चाचणी उपकरण नियंत्रण, विद्युत परिरक्षण आणि संचलन इत्यादी संवर्गातील मनुष्यबळाच्या कौशल्य, अथक परिश्रम आणि उत्कृष्ट सांघिक कार्यामुळे शक्य झाले आहे. कोयना जल विद्युत प्रकल्प टप्पा ३ मधील संच क्र. ११ कार्यान्वित झाल्याने विजेच्या अधिकच्या मागणीच्या काळात वीज ग्राहकांना दिलासा मिळणार आहे.

याकरिता मुख्य अभियंता श्री. संजय चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली अधीक्षक अभियंता श्री. संतोष चव्हाण, कार्यकारी अभियंता श्री. जॉन बर्वे, कार्यकारी अभियंता श्री. शार्दूल जोशी यांनी अथक परिश्रम घेतले.

या यशस्वी कामगिरीबद्दल सर्व सहभागी कर्मचारी यांचे महानिर्मितीचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, संचालक (संचलन), कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था - १) आणि वरिष्ठ व्यवस्थापन यांनी विशेष अभिनंदन केले.

## महानिर्मितीचे संचालक (संचलन) ह्यांनी उरण वायू विद्युत केंद्रात संबंधितांचे केले अभिनंदन

वायू विद्युत केंद्र उरणने जवळपास ५ वर्षांनंतर ४७६ मेगावॅटची एकूण निर्मिती गाठली. त्यामुळे ३१ ऑक्टोबर २०१९ रोजी सेट केलेल्या ४२६ मेगावॅटच्या मागील विक्रमाला मागे टाकले आहे.

या उल्लेखनीय कामगिरीबाबत महानिर्मितीचे संचालक (संचलन) मा. श्री. संजय मारुडकर यांनी प्रत्यक्ष उरण वायू विद्युत केंद्राला भेट देऊन संबंधित सर्व अधिकारी, अभियंता आणि कामगारांना भेटून त्यांचे अभिनंदन केले.

१२ नोव्हेबर २०२२ नंतर GT-5 आज (१७ एप्रिल २०२४ रोजी, सायंकाळी ६.४१ वाजता) बारवर उपलब्ध करून देण्यात आले हे लक्षात घेता, ही कामगिरी उल्लेखनीय आहे. याव्यतिरिक्त, १ मार्च २०२० नंतर सर्व 4 GT एकाच वेळी कार्यान्वित होण्याची ही पहिलीच वेळ आहे.

अधिकारी, अभियंते, तंत्रज्ञ आणि विविध विभागांचे कंत्राटी कामगार, विशेषत: Mechanical Maintenance, TIC, EM आणि ऑपरेशन यांनी दाखवलेले कौशल्य, अथक परिश्रम आणि उत्कृष्ट टीमवर्क शिवाय हे यश शक्य झाले नसते, सर्वांचे समर्थन आणि सहकार्याबद्दल विशेष धन्यवाद.

आम्ही पुन्हा एकत्रितपणे कठोर परिश्रम करू आणि वायू विद्युत केंद्र उरण आणि महानिर्मितीचा नावलौकिक अधिकाधिक उंचावण्याचा प्रयत्न करू असे मुख्य अभियंता श्री. सुनील इंगळे यांनी सांगितले.

# MAHAGENCO's Direct Interactions with Renewable Energy Project Developers

## Developers should come forward to quickly complete the renewable projects of MAHAGENCO

**- Dr. P. Anbalagan**

## Target to install 8000 MW Renewable Energy Projects by 2030

Since the Maharashtra Electricity Regulatory Commission has mandated the purchase of renewable energy for the year 2024-25 at 13.50% Solar, 11.50% other renewables i.e. a total of 25% Renewable Power, it is necessary to increase the production by about 6,000 MW in the next two years. Therefore, there will be a lot of opportunities for project developers in the field of renewable energy. Dr. P. Anbalagan appealed to the developers to take advantage of this opportunity, increase their professional credit and come forward in this national work. He was speaking at Mumbai at an interactive meet with national level experienced renewable energy project developers organized by MAHAGENCO.

The program was presided over by the Chairman and Managing Director of Mahagenco Dr. P. Anbalagan, while Director (Projects) Abhay Harne, Director (Finance) Balasaheb Thite, Director (Operations) Sanjay Marudkar, Director (Mining) Dr. Dhananjay Sawalkar, Executive Directors Pankaj Nagdevate, Rajesh Patil, Nitin Wagh, Nitin Chandurkar and Chief Engineers Rajesh Kumar Oswal, Sanjay Kurhade, Kishore Raut were mainly present.

Dr. P. Anbalagan further said that the state of the art project management will be done with the help of modern technology to speed up the project work. For this purpose, MAHAGENCO has started renewable energy field offices in Nashik, Pune and Nagpur with its headquarters at Mumbai. A team of skilled, experienced experts is ready for this novel task. Interestingly, a wholly owned subsidiary company "MAHAGENCO Renewable Energy Limited" has been established.

In the introduction, Director (Projects) Abhay Harne said that for the upcoming project, MAHAGENCO has planned for construction and planning of 8,000 Megawatt RE Projects at a fast pace, which includes projects from 7 MW capacity to 300 MW installed capacity. This includes, RE-Bundling 1,956 MW, NTPC 2,500 MW by forming a joint venture with Green Energy Limited, S.J.V.N. 5,000 MW Pumped storage Hydro Power Project, Solar Project, Floating Solar Project, 100 MW Solar Power Project with Rahuri Agricultural University, 135 MW Solar and Wind Power Projects with MEDA by forming a joint venture company. Therefore, the developers should put up their opinion/say regarding the tender terms and conditions, so that it is possible to complete these projects within the time limit through mutual cooperation.

On this occasion, the project developers directly interacted with the MAHAGENCO Management to share their views on project details, tender eligibility criteria, project duration, necessary permissions, local constraints, financial criteria, developer registration, technical terms and conditions, quality testing, experience, operations & maintenance practices, AMC etc. positive discussion was held. Also, the developers welcomed the role and initiative of MAHAGENCO.

In the beginning, a comprehensive film of the MAHAGENCO was shown to the developers. The program was moderated by Deputy Chief Engineer (Solar) Mr. Ajay Bagade, while vote of thanks was given by Chief Engineer (Solar) Mr. Sanjay Kurhade. The meeting was attended by senior officials of MAHAGENCO and a large number of renewable energy project developers across the country.

## कोराडी औष्णिक वीज केंद्राने गाठले महत्तम वीज निर्मितीसह नवे विविध उच्चांक

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीमध्ये दुसऱ्या क्रमांकाची स्थापित क्षमता असणाऱ्या कोराडी औष्णिक विद्युत केंद्राने झिरो डिसअलॉऊन्सचे उद्दिष्ट गाठण्यासाठी सातत्यपूर्ण कामगिरी करीत, उपलब्ध संसाधनांचा सुयोग्य उपयोग करीत कार्यक्षमता वाढीसह नवे विविध उच्चांक गाठले आहेत.

कोराडी वीज केंद्र कार्यान्वित झाल्यापासून माहे फेब्रुवारी-२०२४ मध्ये महत्तम मासिक एमईआरसी भारांक ८६.००% तसेच महत्तम मासिक सीईए भारांक ८६.५८% चा नवा उच्चांक गाठला आहे.

६६० मेगावॅटचे तीन संच कार्यान्वित झाल्यापासून माहे फेब्रुवारी-२०२४ मध्ये महत्तम मासिक एमईआरसी भारांक ८६.०१% तसेच महत्तम मासिक सीईए भारांक ८६.६५% चा नवा उच्चांक गाठला आहे.

संच क्रमांक - ८,६६० मेगावॅट कार्यान्वित झाल्यापासून, माहे फेब्रुवारी-२०२४ मध्ये महत्तम मासिक सीईए भारांक ९२.२०% हा नवा उच्चांक गाठला आहे.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ.पी. अन्बलगन यांनी कोराडी औष्णिक वीज केंद्राचे मुख्य अभियंता श्री. विलास मोटघरे आणि टीम कोराडीचे विशेष कौतुक आणि अभिनंदन केले आहे. महानिर्मिती वरिष्ठ व्यवस्थापनाचे नियमित सहकार्य आणि मार्गदर्शनामुळे तसेच कोराडी टिमच्या परिश्रमामुळे ही फलश्रुती झाल्याचे श्री. मोटघरे यांनी सांगितले.

श्री. विलास मोटघरे यांचे नेतृत्वात वीज केंद्रातील सर्व अधिकारी, अभियंते, कर्मचारी, कंत्राटदार, कंत्राटी कामगार व सर्व संबंधित, नेमून दिलेली जबाबदारी सक्षमपणे पार पडत असून, वीज केंद्राच्या कार्यक्षमता वाढीसाठी व नवनवे उच्चांक गाठण्यासाठी कटीबद्ध आहेत.

पावसाळ्यात विजेची मागणी कमी राहत असल्याने विजेच्या संचांचे देखभाल दुरुस्ती, भांडवली खर्च कामे करण्यात येतात, जेणेकरून उन्हाळ्यात वाढत्या विजेची मागणी पूर्ण करण्याकरिता हे संच पूर्ण क्षमतेने वीज उत्पादन करण्यास सज्ज राहावेत. आता उन्हाळ्यात दुपारी विजेची मागणी २७ हजारच्या घरात राहील म्हणून महानिर्मितीने कोळशाचे पूर्वनियोजन केले असल्याने पुरेसा कोळसा साठा उपलब्ध आहे. विजेची मागणी आणि पुरवठा आकडेवारी पाहिली तर महानिर्मितीच्या एकूण २७ संचांपैकी २६ संचांतून वीज उत्पादन सुरू होते. १ मार्च रोजी सकाळी महानिर्मितीचे औष्णिक वीज उत्पादन विक्रमी ८,४६० मेगावॅट इतके होते तर कोळसा, वायू, सौर आणि जलविद्युत उत्पादन एकूण ९ हजार मेगावॅट इतके होते.

महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ.पी. अन्बलगन यांनी कोळशाचे सूक्ष्म नियोजन, देखभाल दुरुस्ती, भांडवली खर्च कामे, शून्य डीस अलाऊन्स धोरण, आर्थिक शिस्त, काटकसर आणि कार्यक्षम वाढीसाठी मनुष्यबळाला प्रोत्साहित केले, त्यामुळे महानिर्मितीच्या वीज उत्पादनात सातत्य आणि कार्यक्षमता वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

२९ फेब्रुवारी रोजी १,३४० मेगावॅट स्थापित क्षमता असलेल्या खापरखेडा वीज केंद्रातून ९३.२८ टक्के भारांकासह १,२५० मेगावॅट उत्पादन सुरू होते तर १ मार्च रोजी चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रातून २,९२० मेगावॅट स्थापित क्षमतेच्या तुलनेत २,६५० मेगावॅट वीज उत्पादन ९०.५८ टक्के भारांकासह सुरू होते. मागील ५ वर्षांच्या तुलनेत महानिर्मितीचे एकूण वीज उत्पादन आणि औष्णिक वीज उत्पादन महत्तम तथा विक्रमी झाल्याची नोंद आहे.

## महानिर्मिती प्रकाशगड मुख्यालय येथे जागतिक महिला दिनाचे निमित्ताने जनसंपर्क विभागातर्फे तयार करण्यात आलेल्या "महिला कट्टा २०२४" या विशेषांकाचे प्रकाशन

"२४ बाय ७ कार्यरत वीज निर्मिती सारख्या क्षेत्रामध्ये आत्मविश्वासाने महिला कर्मचारी काम करत आहेत. विशेषत: महिला कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणी सुरक्षित आणि आनंददायी वातावरण असावे, याकरिता महानिर्मिती व्यवस्थापन नेहमीच सकारात्मक भूमिका घेत असून महिला कर्मचाऱ्यांना काही सुचवायचे असल्यास त्याची निश्चितच दखल घेतली जाईल", असा विश्वास मा.डॉ. पी. अन्बलगन यांनी व्यक्त केला. महानिर्मिती प्रकाशगड मुख्यालय येथे जागतिक महिला दिनाचे निमित्ताने जनसंपर्क विभागातर्फे तयार करण्यात आलेल्या 'महिला कट्टा २०२४' या विशेषांकाचे प्रकाशन मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.पी. अन्बलगन तसेच संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारुडकर, संचालक (प्रकल्प) मा.श्री. अभय हरणे, संचालक (खनिकर्म) मा.डॉ. धनंजय सावळकर तसेच कार्यकारी संचालक सर्वश्री डॉ. नितीन वाघ, राजेश पाटील, नितीन चांदूरकर आणि पंकज नागदेवते आणि मुख्य अभियंते श्री. संजय कुऱ्हाडे, श्री. सुनील सोनपेठकर, श्री. प्रसन्न कोटेचा, तसेच मुख्य महाव्यवस्थापक (मासं) श्री. आनंद कोंत, श्री. काळे, सौ. स्नेहलता हराळे श्री. रंगदळ आणि वरिष्ठ अधिकारी आणि महिला कर्मचारी यांचे उपस्थिती मध्ये करण्यात आले.

याप्रसंगी महानिर्मितीमधील प्रथम महिला मुख्य अभियंता सौ. विजया बोरकर तसेच या विशेषांकामध्ये लेख लिहिलेल्या सर्व महिला कर्मचारी यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले.

सदर प्रसंगी सौ. गीतांजली लाटे-झिरमुटे यांनी आपल्या लेखाचे वाचन केले तर सौ. वैशाली धोंगडे यांनी नाशिक औष्णिक वीज प्रकल्पामध्ये काम करतानाचे आपले अनुभव विषद करत महिला तांत्रिक कर्मचारी तसेच इतर भगिनी यांना सुविधा प्राप्त करून दिल्याबद्दल वरिष्ठ व्यवस्थापनाचे विशेष आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सहाय्यक जनसंपर्क अधिकारी श्री. संतोष पुरोहित यांनी केले.

## नाशिक प्रशिक्षण केंद्र एकलहरे येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

८ मार्च या जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून नाशिक प्रशिक्षण केंद्र, एकलहरे येथे महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सौ गीतांजली पारखी,अधीक्षक अभियंता नाशिक प्रशिक्षण केंद्र यांच्या अध्यक्षतेखाली व श्री. जयंत देवरे, कार्यकारी अभियंता यांच्या प्रमुख उपस्थितीत नाशिक प्रशिक्षण केंद्रातील कार्यरत महिला अभियंता, कर्मचारी, पदवीधर/पदविका महिला अभियंता प्रशिक्षणार्थी व महिला कंत्राटी कामगार यांनी या कार्यक्रमात हिरीरीने सहभाग घेतला.

सौ.गीतांजली पारखी यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले की, "विविध क्षेत्रात आता महिला समर्थपणे पुढे येत आहेत. महानिर्मितीच्या पहिल्या महिला मुख्य अभियंता श्रीमती विजया बोरकर यांचा सर्व महिला अभियंत्यांनी आदर्श घ्यावा तसेच आपल्या उत्कृष्ट कार्यशैलीने महानिर्मितीचे उद्दिष्ट गाठून प्रगतीमध्ये हातभार लावावा". त्यांनी प्रशिक्षणार्थी महिला अभियंत्यांकडून पुढील सेवाकाळात उल्लेखनीय कामाची अपेक्षा व्यक्त केली.

कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून उपस्थित असलेल्या सौ. दिपाली चांडक, संस्थापिका - स्त्री उद्यमी फाउंडेशन, नाशिक आणि सौ. शिवांगी काळे - मानव संसाधन सल्लागार यांचे 'अर्थनियोजन व गुंतवणूक' तसेच 'मानसिक ताणतणाव व्यवस्थापन' यासंबंधी व्याख्यान आयोजित करण्यात आले.

महानिर्मितीच्या "Mission Zero-Disallowance-5E" या संकल्पनेशी निगडित विविध प्रमापकं (निकष) संबंधी जागरूकता व्हावी या उद्देशाने "Gain Vs Disallowance" हे अभिनव पथनाट्य प्रशिक्षणार्थी महिला अभियंत्यांनी आपल्या अभिनयाद्वारे उत्कृष्टपणे सादर केले. या पथनाट्याला सर्व प्रशिक्षणार्थी, कर्मचारी यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रज्ञा वाघ, शारदा काटोले, श्रद्धा सातपुते या प्रशिक्षणार्थींनी आणि सौ. मुरतडक, सौ. आगरकर, सौ. सातभाई व श्रीमती स्वर्गे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनात हातभार लावला.

नाशिक प्रशिक्षण केंद्र, एकलहरे येथे व्याख्यान, परिसंवाद, पथनाट्य व विविध मनोरंजनपर खेळांच्या आयोजनाद्वारे हा महिला दिन उत्साहात साजरा झाल्याने महानिर्मितीमध्ये नुकत्याच रुजू झालेल्या महिला अभियंत्यांमध्ये चैतन्य निर्माण झाले, हे विशेष.

## Induction Level Training organized at CSTPS for Junior Security Officers

Chief Engineer CSTPS, Shri. Girish Kumarwar was present as the President, while Chief General Manager (Security) Col. Shri. Rajiv Malewar along with Deputy Chief Engineer Shri. Anil Punse were present as the Chief Guest of the inaugural function. AD Security, Shri. Shilratna Gongale, Sr. Manager Security, Shri. Anurag Shukla, and Safety Officer, Shri. Prashant Kathale were prominently present as Special Guests.

Total 22 newly joined JSOs from various TPS participated in the training program. The program was hosted by Training Coordinator, Shri. Narendra Rahate. Special efforts were taken by Shri. Rahul Pahune AE, Satish Birkhede ASO and Yashil Saturde.

## Mahagenco got water efficient award

MAHAGENCO's commitment towards Water Conservation and Management was very well recognised and appreciated by Council of Enviro Excellence in recently held function at Delhi.

MAHAGENCO's Thermal power plants got awards in various categories for achieving Specific Water Consumption, Water Efficiency and Zero Liquid Discharge.

1. Chandrapur and Khaperkheda 500 MW TPS got best National Water efficient plant award in 500 MW category.
2. Bhusawal TPS got award for achieving ZLD amongst 500 MW plants.
3. Koradi 660 MW got best National Water efficient plant award in 660 MW category.
4. Khaperkheda, Paras, Nasik and Parli TPS got best National Water efficient plant award in 210/250 MW category.
5. Mr, Vivek Ghodmare, Superintending Chemist, HO was conferred with 'Leader of the Year Award' for Achievement in Water Management in Thermal Power Sector by the hands of Shri. Abhinav Shrivastav, Dy. Commissioner, Ministry of Jal Shakti, GoI.

## Huge response to Summer VT Batch at Chandrapur STPS

Summer 2024, Vacation training Batch at CSTPS was conducted under the guidance of Chief Engineer Chandrapur Super Thermal Power Station, Shri. Girish Kumarwar.

Closing ceremony of VT Batch for Engineering Students was held at Chandrapur STPS Training Sub Centre.

Dy. Chief Engineer (Admin) CSTPS, Dr. Shri. Bhushan Shinde was present as the President and SE(RP) Shri. Mahesh Rajurkar was present as a Chief Guest, Shri. Narendra Rahate, Training Co-ordinator (TSC) and Shri. Rahul Pahune (AE) were also present.

Total 148 students from various colleges of all over India enrolled for the Vacation training program.

Training fees amounting to Rs. 7 Lakh was collected which is a record in MSPGCL amongst all VT batches carried out at CSTPS/Mahagenco.

Momentos with certificates were awarded to students at the hands of Dr. Bhushan Shinde and Shri. Mahesh Rajurkar respectively.

The closing ceremony was hosted by Shri. Yashil Satardey. Special efforts were taken by Shri. Vishweshwar Madavi and all staff of training centre.

Special Thanks to all class room and inplants Faculties. Chandrapur STPS Managements support was main driving force for this record achievement.

## KORADI TPS 660 MW U#9 CONTINUOUSLY RUNNING SINCE 100 DAYS

Recently, we are all witnessing series of records in Mahagenco's Chandrapur, Koradi, Khaperkheda & Paras TPS. It is a proud moment for all of us that our Team Work proves sustainable and reliable generation in scorching summer.

On 4th March 2024, Koradi TPS 660 MW Unit-9 has achieved a remarkable Milestone for continuously running unit since 100 days under the leadership of Mr. Vilas Motghare, Chief Engineer, Koradi TPS.

Sincere thanks for continuous support and guidance from Hon'ble Chairman & Managing Director, Hon'ble All Directors, Executive Directors and dedicated efforts of Unit-9 Team KTPS.

Hon'ble Chairman & Managing Director congratulated Team Koradi TPS for this achievement and expect to continue striving for even greater milestones in the future !

## कोयना जल विद्युत केंद्र संकुल येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

कोयना जल विद्युत केंद्र संकुल, पोफळी येथे ८ मार्च २०२४ रोजी जागतिक महिला दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला मुख्य अभियंता श्री. संजय चोपडे, सौ. स्नेहा चोपडे, श्री. अजय डी. शिंदे, अधीक्षक अभियंता (प्रशासन), सौ. अरूणा शिंदे, श्री. संतोष चव्हाण, अधीक्षक अभियंता, डॉ. मृदुला पवार, वैद्यकीय अधिकारी, माधुरी पवार, व्यवस्थापक (मासं) व कल्याण अधिकारी श्री. प्रसाद निकम यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रमाता जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान प्रियदर्शिनी इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार व दीपप्रज्वलन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्रीमती. माधुरी खाडीलकर यांनी केले व सौ. स्मिता ठाकुरदेसाई यांनी स्वागत गीताने सर्वांचे स्वागत केले. मुख्य अभियंता, श्री. संजय चोपडे यांनी महिला दिनानिमित्त मनोगत व्यक्त करुन स्त्रीशक्तीचा गौरव केला. त्यानंतर सकाळच्या सत्रात श्री. गोविंद महाराज गायकवाड, पुणे यांचा समाजप्रबोधनपर कार्यक्रम सादर करण्यात आला. कार्यक्रमासाठी महिला अधिकारी, कर्मचारी, कंत्राटी कामगार महिला, वसाहतीतील महिला वर्गाने विशेष उपस्थिती दर्शविली.

दुपारच्या सत्रात महिलांसाठी सौ. स्नेहल नकाते व सौ. मल्लिका मुजावर यांनी मनोरंजनपर खेळ व विविध स्पर्धांचे आयोजन केले. सांस्कृतिक कार्यक्रमातही महिलांनी सहभाग घेतला. श्रीमती. माधुरी पवार यांनी फुलराणी लेखक–पु.ल. देशपांडे या नाटकातील 'मंजुळा साळुंखे' या पात्राचा एकपात्री अभिनय सादर केला.

डेरवण येथील वालावलकर हॉस्पिटल, यांच्या मार्फत वुमन्स वेलबिईंग शिबीरातर्गत कोयना जल विद्युत केंद्र संकुल, पोफळी येथील कार्यालयीन तसेच, वसाहतीतील महिलांची १० मार्च २०२४ व १७ मार्च २०२४ रोजी आरोग्य तपासणी करण्यात आली. या तपासणीसाठी डॉ. सौ. मृदूला पवार यांनी विशेष परिश्रम घेतले.

सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी कल्याण अधिकारी श्री. प्रसाद निकम, श्री. अवधुत ठाकुरदेसाई, सौ. सुजाता नवले व श्रीमती. वीणा रायकर यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रशासकीय अधिकारी व सहकारी यांच्या सहयोगाने तसेच कोयना संकुलातील माहिला व वसाहतीतील महिलांच्या सहभागामुळे महिला दिनाचा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

## महानिर्मिती महिला टेबल टेनिस संघाला राष्ट्रीय स्तरावर सुवर्ण ट्रॉफी

४५ व्या अखिल भारतीय विद्युत् क्रीडा संनियंत्रण मंडळ (AIESCB) अंतर्गत कुरुक्षेत्र, हरियाणा येथे आयोजित स्पर्धेत ३० मार्च २०२४ रोजी महानिर्मिती महिला टेबल टेनिस संघाने राष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी बजावत सुवर्ण ट्रॉफी जिंकली आहे.

मध्यप्रदेश व गुजरात सोबत जिंकत महावितरण ला अंतिम सामन्यात ५–३ स्कोर करत टेबल टेनिस विजेता पद पटकाविले.

**खेळाडू खालीलप्रमाणे :–**

सौ. वैशाली पाटील, अधीक्षक अभियंता, मुख्य कार्यालय, मुंबई,
पियुशा तांबेकर, उप कार्यकारी अभियंता, मुख्य कार्यालय, मुंबई,
भारती अंभोरे, तंत्रज्ञ–१, औ. वि. केंद्र पारस,
शुभांगी चिंचाळकर, तंत्रज्ञ–२, औ. वि. केंद्र खापरखेडा.
**संघ प्रशिक्षक** – श्री. किरण शिंदे, अति कार्यकारी अभियंता,
**संघ व्यवस्थापक** – श्री. अमरजीत गोडबोले, कल्याण अधिकारी.

महानिर्मितीच्या महिला संघाच्या या अतुलनीय कामगिरीबद्दल महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ. पी. अन्बलगन यांनी तसेच संचालक मंडळाने विशेष अभिनंदन केले असून संपूर्ण महानिर्मिती परिवाराकडून या विजेत्या संघावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## महानिर्मितीच्या महिला बुद्धिबळ संघाची राष्ट्रीय पातळीवर प्रभावी कामगिरी

अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळ (AIESCB) द्वारे कुरुक्षेत्र, हरियाणा येथे आयोजित ४५ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महानिर्मिती महिला बुद्धिबळ संघाने प्रभावी कामगिरी करत प्राथमिक सर्व सामन्यात आघाडी घेतली होती तसेच अंतिम सामना महावितरण समवेत अटीतटीने २–२ बरोबरी राखला. मात्र एकूण गुणतालिकेत एक अंक कमी पडल्याने प्रभावी कामगिरी करूनही यश मिळाले नाही आणि अत्यंत चुरशीच्या सामन्यात थोडक्यात पदक हुकले.

स्पर्धा म्हटले की यश–अपयश येणार हे जरी स्वाभाविक असले तरी आपले क्रीडा कौशल्य पणाला लावून महानिर्मिती महिला बुद्धिबळ संघाने केलेल्या शर्थीच्या प्रयत्नांचे, बौद्धिक कुशलतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

महानिर्मिती महिला बुद्धिबळ खेळाडूंमध्ये प्रामुख्याने रचना साळुंके – प्रणाली विश्लेषक, मुख्य कार्यालय, मुंबई., शिल्पा पाटील – सहाय्यक अभियंता, औ. वि. केंद्र भुसावळ, प्रणाली जाधव – सहाय्यक अभियंता, औ. वि. केंद्र नाशिक, रेणुका यादव –तंत्रज्ञ २, औ. वि. केंद्र पारस तर संघ प्रशिक्षक – श्री. किरण शिंदे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, संघ व्यवस्थापक – श्री. अमरजीत गोडबोले, कल्याण अधिकारी यांचा सहभाग होता.

## महानिर्मितीच्या पुढाकारातून "मानव संसाधन उत्तम कार्यपद्धती" कार्यशाळा संपन्न

वीज उत्पादन प्रक्रियेत महाराष्ट्र वीज नियामक आयोग आणि पर्यावरणीय निकष दिवसेंदिवस बदलत असल्याने चुरशीची स्पर्धा निर्माण झाली आहे. त्यामुळे वीज उत्पादनाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या मनुष्यबळाचे ज्ञान अद्ययावत राहावे तसेच मनुष्यबळाला आवश्यक सोयीसुविधा सवलती जसे रुजू होण्यापासून सेवानिवृत्तीपर्यंतचे निगडीत सर्व लाभ सहजसुलभ आणि गतिमानतेसह उपलब्ध व्हावे, दैनंदिन कामकाजाची पद्धती अधिकाधिक सुलभ व्हावी. वीज क्षेत्रातील इतर कार्यरत संस्थांमध्ये राबविण्यात येणाऱ्या उत्कृष्ट कार्यपद्धतीचे आदानप्रदान व्हावे पासाठी महानिर्मितीने पुढाकार घेऊन एन.टी.पी.सी., भेल, गुजरात इलेक्ट्रिसिटी कॉर्पोरेशन, अदानी, महावितरण, महापारेषण आणि टाटा पॉवर सारख्या प्रथितयश संस्थांना निमंत्रित करून "मानव संसाधन उत्तम कार्यपद्धती कार्यशाळा" २० मार्च २०२४ रोजी मुंबई येथे आयोजित करण्यात आली.

याप्रसंगी मुख्य अतिथी म्हणून महानिर्मितीचे संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे, कार्यकारी संचालक (मासं) तथा प्रभारी संचालक (इंधन) मा. डॉ. धनंजय सावळकर, कार्यकारी संचालक (सौर ऊर्जा) श्री. पंकज नागदेवते, मुख्य महाव्यवस्थापक (मासं) श्री. आनंद कोंत प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते.

मा.श्री. बाळासाहेब थिटे यांनी आपल्या भाषणातून "पंढरपूरची वारी, वारकरी आणि मानव संसाधन तसेच शिवाजी महाराजांची युद्धनीती आणि मानव संसाधन उदाहरणासह सांगितले. तसेच प्रती मेगावॅट मनुष्यबळ भागीदारी मर्यादा कमीतकमी करणे गरजेचे असल्याचे" त्यांनी सांगितले.

कार्यकारी संचालक (मासं) डॉ. धनंजय सावळकर यांनी सांगितले की, "दैनंदिन समस्यांची सकारात्मक उकल करणे, कंपनीच्या उद्दिष्टपूर्तीकडे लक्ष केंद्रित करून वाढत्या स्पर्धेच्या वातावरणात दैनंदिन चौकटीच्या बाहेर विचार करून 'स्मार्ट वर्क' करण्याची गरज आहे. आजच्या कार्यशाळेतून प्रत्येकाने किमान पाच बाबी घेऊन प्रत्यक्ष जीवनात त्याचा वापर केला तर व्यक्तिगत आणि संस्थात्मक पातळीवर त्याचा उत्तम प्रभाव पडेल".

श्री. पंकज नागदेवते यांनी मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या दूरदृष्टीचे कौतुक केले आणि आगामी काळात अधिकाधिक उंची गाठण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

महानिर्मितीचे उत्कृष्ट मानव संसाधन विषयक कार्यपद्धतीचे सादरीकरण मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. आनंद कोंत, उप महाव्यवस्थापक श्री. योगेंद्र पाटील, सहाय्यक महाव्यवस्थापक सौ. स्वप्रिता राठोड, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. पुरुषोत्तम वारजूरकर यांनी केले तर सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन उप कार्यकारी अभियंत्या सौ. सोनाली चुंगडे यांनी केले.

कार्यक्रमाला संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारुडकर, संचालक (प्रकल्प) मा.श्री. अभय हरणे, कार्यकारी संचालक श्री. राजेश पाटील, मुख्य अभियंते सर्वश्री. संजय कुऱ्हाडे, प्रसन्ना कोटेचा, शशांक चव्हाण, विजया बोरकर, राहुल नाळे, राजेश कराडे, चंद्रशेखर होळंबे, दत्तात्रय साळुंखे, कंपनी सचिव राहुल दुबे, मुख्य विधी सल्लागार सुमंत कोल्हे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी पुरुषोत्तम वारजूरकर प्रामुख्याने उपस्थित होते.

# “महानिर्मितीने मला घडवलंय याचा मला सार्थ अभिमान”

| | | |
|---|---|---|
| **पाल्याचे नाव** | : | **स्वरा जितेंद्र दबडे** |
| **इयत्ता** | : | ९ वी पार्ले टिळक विद्यालय, विलेपार्ले, मुंबई. |
| **आईचे नाव** | : | सौ. इंदिरा जितेंद्र दबडे |
| **पदनाम** | : | प्रयोगशाळा रसायनशास्त्रज्ञ, जलप्रक्रिया विभाग. |
| **नोकरीचे ठिकाण** | : | पर्यावरण व सुरक्षितता विभाग, मुख्यालय, मुंबई. |
| **मोबाईल** | : | ९४२३५४९४२६. |
| **E-mail** | : | Indira_chavan2000 @yahoo.com |

**“मेहंदी रंग लाती है सुखने के बाद।
कॉलनी याद आती है
छोडने के बाद।”**

मला खरंच महानिर्मिती कॉलनी सोडल्यानंतर खूप काही वाटत होतं. पण काय ते कळत न्हवते. आज हा विषय मिळाला आणि माझ्या भावना मी शब्दात मांडण्याला घेतले. माझी आई इंदिरा, महाजनको मध्ये आहे. तिची बदली उरण येथून बांद्रा येथे झाली. उरण पेक्षा बांद्रा नक्कीच सुविधायुक्त आहे. मुंबईची खरी ओळख इथेच तर आहे. पण तरीही आम्ही महाजनको वसाहतीला खूप मिस करतो. इथे आम्हाला कॉलनीसाठी वेटिंग नंबर आहे. आम्ही छान घरात राहतो. पण कॉलनीचे जे वैशिष्ट्य आहे ते इथे नाही. म्हणून आम्ही लवकरच कॉलनीत राहायला नक्की जाऊ, कारण का ते सविस्तर सांगते. माझा पहिला वाढदिवस नाशिक कॉलनी मध्ये झाला. कोणी पाहुणे नव्हते फक्त आजी आजोबा, आईबाबा व आईच्या ऑफिसच्या सर्व मैत्रिणी होत्या. तेव्हा सर्व आपलेच समजून मोठा वाढदिवस झाला. तिथे मी लहान होते. आता तिथले फोटो पाहते, तिथेही खूप छान लोक व वातावरण होते नंतर माझं बालपण गेले ते उरणलाच.

आज मी जे काही घडले आहे ते महाजनकोमुळेच. कारण महाजनकोच्या अनेक ठिकाणाहून तिथे बदली करून अनेक जण येतात आणि सर्वांच्या अनुभवाने महाजनकोच्या सर्वच वसाहती कुटुंबियांच्या सोयीसुविधांनी युक्त सारख्याच आहेत. तिथले सगळेच महाजनकोच्याच ऑफिसला असतात. जास्त करून मुलांचे पप्पा व काहींच्या मम्मी. त्यामुळे जाण्यायेण्याच्या वेळा, दुपारची सुट्टी, सणवार हे सर्वांचे सारखेच असतात. साहजिकच आमचेही खेळायचे आणि शाळेचे टाइमिंग एकच होते. आम्हाला स्कूल बसची सुविधा असते तीही फ्री मध्ये. अतिशय काळजीने आमची सर्व व्यवस्था होते. कॉलनीमध्ये असलेला दवाखाना, औषधे ती पण मोफतच मिळतात. त्यामुळे काहीच टेन्शन नसते. इतकेच नव्हे, तर कॉलनीत शाळा आहेत. बऱ्याच ठिकाणी सी.बी.एस.सी., एस.एस.सी., इंग्लिश, मराठी मीडियमच्या पण आहेत. अनेक प्रकारचे क्लासेस माफक दरात जवळच्या जवळ असतात. आमची किती सोय केली आहे.

महानिर्मितीने आमचे मम्मी-पप्पा २४ तास सेवेला बांधिल असतात. कित्येकांची लहान मुले, स्त्रिया, वृद्ध घरी एकटे असतात. पण सर्व काही दैनंदिन गोष्टी जसे की, किराणाचे दुकान, भाजीपाला, ए.टी.एम., जवळपास सगळेच दुकाने असतात हाकेच्या अंतरावर आहेत. आणि त्याहीपेक्षा असते ती सुरक्षा, जी की कुठल्याही बाहेरील ठिकाणी मिळणार नाही. अशी शाश्वत आणि निश्चिंत सुरक्षिततेमुळेच आम्ही कॉलनीत अगदी बिनधास्त राहू शकतो. आमचं विश्वच त्या वसाहतीत जोडलेलं असतं.

विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र ते खानदेश अशा विविध भागांमधून सर्व धर्माचे लोक इथं एकत्र येतात. सर्वांच्या पद्धती, पदार्थ वेगवेगळे. पण हे आम्हाला सगळे आजमवायला मिळतं. आणि अगदी मोठे साहेब मुख्य अभियंता ते ड्रायव्हर काकांची मुले सर्वजण एकत्र खेळतो. आमच्यामध्ये कधी भेदभाव नसतो. आम्ही सर्वजण कॉलनीत एका कुटुंबाप्रमाणे वाढतो. एकमेकांच्या अडचणीला हक्काने व घरच्यांचाही पहिले आवर्जून धावून येतो. कॉलनीतले सर्व लोक एकमेकांना ओळखतात. त्यामुळे सगळे आपलेच वाटतात.

इतकेच नाही तर कॉलनीमध्ये स्वच्छता असते. रस्ते, इमारती व्यवस्थित असतात. आम्हाला खेळायला गार्डन आहे, पार्किंग आहे. झाडे, फुले, पक्षी, प्राणी सगळं मला कॉलनीमुळे पाहायला मिळालं. मी तर महाजनकोच्या पाळणा घरात पण राहिले आहे. आमच्यासाठी किती ह्या सोयीसुविधा. मला सर्वात जास्त काय आवडते माहितीये ? क्लब हाऊस जिथे ग्रंथालय असतं, जिम, बॅडमिंटन कोर्ट, टेबल टेनिस कोर्ट सगळे काही असतं. ज्याचा आम्ही अगदी पुरेपूर वापर करतो आणि मुख्य म्हणजे स्टेज, अनेक बाल कलाकार म्हणजे अगदी एक महिन्याच्या बाल कलाकारापासून ते कॉलेजचे दादा-दीदी सगळ्यांसाठी ह्या स्टेजने एक स्टेज मिळवून दिला आहे. ह्या स्टेजने अनेकांच्या कलेला वाव दिला आहे. अनेकांना घडवले आहे. सांस्कृतिक कलेचा वारसा जपला आहे. ज्यामुळे आमच्या मध्ये आत्मविश्वास आला. आमची स्टेजची भीती मोडली. अगदी कुणाच्यातही मिक्स न होणारी मुले पण मिक्स होऊन जातात, कारण एकी... सर्व मुले एकत्र येतातच. खेळाचे मैदान, व्हॉलिबॉल, क्रिकेट, फुटबॉल, कबड्डी हे मैदान कॉलनीतच आहेत. त्यातही गणपतीला व वर्धापन दिनाच्या वेळेला आम्हा मुलांसाठी चित्रकला, पळण्याची रेस, कॅरम, चेस, बॅडमिंटन, क्रिकेट, फुटबॉल, डान्स, फॅन्सी ड्रेस, वकृत्व स्पर्धा इतक्या

स्पर्धा होतच असतात आणि त्याहूनही विशेष म्हणजे सहभागींना पण पारितोषिक मिळते म्हणून सगळे सहभागी होतातच. कॉलनीतला उत्साह असतो त्याला कशाशीच तोड नसते. नवरात्रीतही शारदा देवी बसते. गरबा, सांस्कृतिक कार्यक्रम असतो. आजी-आजोबा पण खूप आहेत कॉलनीत. त्यांचेही सत्कार असतात. विविध विषयांवर माहितीपूर्ण भाषणे असतात. ऑर्केस्ट्रा असतात. मोकळ्या हवेत फिरायला छान जागा आहे.

मुख्य अभियंता काका त्यांचा बंगला मस्त असतो. आमच्या मुलांमध्ये एक प्रेरणा तयार होते. असे साहेब बना, असे आई-बाबा सांगतात. म्हणूनच दहावी बारावीला विशेष प्राविण्याला आम्हाला बक्षीस देऊन सत्कार करतात. सृजन मध्ये फोटो देतात आणि आम्हाला प्रेरणा म्हणून शिष्यवृत्ती पण मिळते. फायर फायटिंगचे, रेस्क्यू टीम चे प्रात्यक्षिक पण कॉलनीत होते. वीज निर्मिती आम्ही जवळून पाहिलेली आहे इंजिनिअर ते डॉक्टर, विविध पदांवर सर्व क्षेत्रातील व्यक्ती इथे काम करू शकतात. अगदी खानसामा, माळी सुद्धा. आमच्यासाठी अप्रेंटिसच्या सुद्धा जागा असतात. कॉलनीतले ग्रंथालय जिम वेळेवर सांभाळण्यासाठी आमच्यापैकीच एकाची जबाबदारी असते. दहीहंडी, होळी आंबेडकर जयंती, शिवजयंतीची रॅली हे तर सगळं उत्साहाने होतच असतं, पण १५ ऑगस्ट २६ जानेवारीला ऑफिसला भाषणे, कला सादर करायला मिळते. दसऱ्याला आणि वर्धापन दिनाला ऑफिसला जायला परवानगी असते. तेव्हा विद्युत केंद्राची माहिती मिळते. मकर संक्रांतीला बिल्डिंगचे हळदीकुंकू, ख्रिसमस, ३१ डिसेंबरची पार्टी, कोजागिरी असे सर्व सण साजरे होतात. तसं तर कॉलनी व्यतिरिक्त इतर ठिकाणी पण होतात, पण इथे ते कंपल्सरी व एकीने आणि समान भावाने होतात.

जुने लोक गेले तरी नवीन लोक ती धुरा पुढे सांभाळत राहतात. अनेक वर्ष जेव्हा मी कॉलनी सोडून दुसरीकडे राहते. तेव्हा आज मला हा फरक प्रकर्षाने जाणवला. तेव्हा कळते, माझ्या बालपणाचा पायाच भक्कम आहे. तो महानिर्मितीमुळेच. इतर मुलांच्या तुलनेने माझ्या मधला उत्साह माझी कला, क्रीडा ह्यातील नैपुण्यही मला मिळालेली संधी महानिर्मितीमुळेच आहे. नृत्य, संगीत, वैयक्तिक, सांघिक खेळ, भाषण, संस्कृतीक कार्यक्रम, फॅन्सी ड्रेस स्पर्धा, चित्रकला, नाटक आणि निसर्गाच्या सानिध्यात खेळात गेलेले बालपण मला सर्वार्थाने घडवले आहे. **"थँक यु व्हेरी मच महाजनको"** आणि म्हणूनच माझी इच्छा आहे की, पुन्हा एकदा आम्हाला लवकरच कॉलनीत राहायला जायला मिळावे, कारण अजूनही आम्ही जरी वेगवेगळ्या ठिकाणी बदली करून गेलो, तरी कोणत्याही कारणाने नेहमी भेटतच असतो. कॉलनीचे आमचे मित्रमैत्रिणी हे आमचं नातं कायम टिकणारे आहे व आम्ही महानिर्मितीच्या परिवारात वाढलो व घडलो ही अभिमानास्पद बाब आहे. महानिर्मिती त्यांच्या कर्मचाऱ्यांसोबतच त्यांच्या मुलांची आणि घरच्यांची सुद्धा खूप सोयीसुविधा पुरवते आणि काळजी घेते. **"थँक यु महाजनको परत एकदा...."**

******

## चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राच्या ऊर्जानगरात वसाहतीत पर्यावरणपूरक होळीचे आयोजन

मानवी जीवनाची नाळ ही पर्यावरणाशी जुळलेली असल्यामुळे पर्यावरण रक्षणातच मानवी जीवनाचे रक्षण आहे व पर्यावरणातील ज्या संसाधनांची कमतरता आहे त्याचा नाश न करता ज्या समाजविघातक कुप्रवृत्ती वाढलेल्या आहेत, त्याचे प्रतिकात्मक दहन करून दरवर्षीप्रमाणे यावर्षीही महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती श्री गुरुदेव सेवा मंडळ आणि, ऊर्जानगर स्पोर्टिंग क्लब व युवा सोशल फाऊंडेशन ऊर्जानगरच्यावतीने सार्वजनिक पर्यावरणपूरक होळीचे चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राच्या ऊर्जानगर वसाहतीतील खुले रंगमंच मैदान येथे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राचे मुख्य अभियंता श्री. गिरीश कुमरवार तर प्रमुख अतिथी उपमुख्य अभियंता श्री. श्याम राठोड, डॉ. भूषण शिंदे, कल्याण अधिकारी श्री. दिलीप वंजारी तसेच श्री. पी.एम. जाधव चंद्रपूर जिल्हा कार्याध्यक्ष महाअंनिस, श्री. प्रशांत दुर्गे अध्यक्ष श्रीगुरूदेव सेवा मंडळ, श्री. नरेंद्र रहाटे सामाजिक कार्यकर्ते, श्रीमती. मंजुषा शेषराव येरगुडे सरपंच ऊर्जानगर, कुमरवार मॅडम, राठोड मॅडम, शिंदे मॅडम, श्री. मुरलीधर राठोड अध्यक्ष अंनिस ऊर्जानगर शाखा, किसन अरडळे यांची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती.

या पर्यावरणपूरक होळीला मुख्य अभियंता श्री. गिरीश कुमरवार ह्यांचे हस्ते पेटविण्यात आले. सोबतच प्रमुख अतिथीच्या हस्ते समाजातील कुप्रवृत्ती हिंसाचार, अमानवीयता, अंधश्रद्धा, भ्रष्टाचार, आतंकवाद, स्त्रीभ्रुण हत्या, व्यसनाधीनता, हुंडाबळी या कुप्रवृतीचे होळीत दहन करण्यात आले. कार्यक्रमात मान्यवरांचे शुभेच्छापर मार्गदर्शन घेण्यात आले. याप्रसंगी वसाहतीतील कविवर्य श्री. किशोर मुगल, श्री. सुरेंद्र इंगळे यांनी आपल्या कविता सादर करून प्रेक्षकांचे मनोरंजन केले. यावेळी पर्यावरणपूरक होळीनिमित्त पर्यावरण या विषयावर घोषवाक्य स्पर्धा घेण्यात आल्या त्याचे बक्षिस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या घोषवाक्य स्पर्धेचे परीक्षण कुमावत मॅडम यांनी केले.

'होळी लहान करा, पोळी दान करा' या संकल्पनेतून होळी दहणानंतर जमा झालेल्या पुरणपोळ्या व ईतर साहित्य एकत्र करून त्या वांढरी येथील मुलाच्या अनाथालयात आणि डेबू सावली वृद्धाश्रमात पोहचविण्यात आल्या. याकरिता युवा कार्यकर्ते श्री. किसन अरदळे, श्री. दिपक मडावी, श्री. भोजराज शिंदे व टीमचे सहकार्य लाभले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अंनिसचे उपाध्यक्ष श्री. दुरेंद्र गेडाम यांनी केले तर आभार कार्याध्यक्ष श्री. देवराव कोंडेकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेकरिता सर्वश्री. नारायण चव्हाण जिल्हा प्रधान सचिव, बाळकृष्ण सोमलकर, संजय जुनारे, शंकर दरेकर, भैयाजी उईके, विजय राठोड, हर्षल मेश्राम, तसेच निर्मला चव्हाण, मालू कोंडेकर, मिनाक्षी गेडाम, कविता राजूरकर व इतर महाराष्ट्र अंनिसचे पदाधिकारी, श्री गुरुदेव सेवा मंडळाचे पदाधिकारी आणि युवा सोशल फाउंडेशन यांचे उत्तम सहकार्य लाभले आणि ऊर्जानगरवासियांचा उत्तम प्रतिसाद लाभला.















वीज क्षेत्रातील इतर कार्यरत संस्थांमध्ये राबविण्यात येणाऱ्या उत्कृष्ट कार्यपद्धतीचे आदानप्रदान व्हावे यासाठी महानिर्मितीने पुढाकार घेऊन एन.टी.पी.सी., भेल, गुजरात इलेक्ट्रिसिटी कॉर्पोरेशन, अदानी, महावितरण, महापारेषण आणि टाटा पॉवर सारख्या प्रथितयश संस्थांना निमंत्रित करून "मानव संसाधन उत्तम कार्यपद्धती कार्यशाळा" आयोजित केली. सदर कार्यशाळेस महानिर्मितीचे मान्यवर संचालक मंडळ, कार्यकारी संचालक, मुख्य अभियंते-मुख्य महाव्यवस्थापक तसेच अन्य अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. महानिर्मितीचे उत्कृष्ट मानव संसाधन विषयक कार्यपद्धतीचे सादरीकरण मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. आनंद कोंत, उप महाव्यवस्थापक श्री. योगेंद्र पाटील, सहाय्यक महाव्यवस्थापक सौ. स्वप्निता राठोड, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. पुरुषोत्तम वारजूरकर यांनी केले तर सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन उप कार्यकारी अभियंत्या सौ. सोनाली चुंगडे यांनी केले.















## महानिर्मितीचे मा. संचालक (संचलन) यांची भिरा अवजल विद्युत केंद्र आणि टाटा पॉवर भिरा जल विद्युत केंद्रास भेट







महानिर्मितीचे संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारुडकर यांनी महानिर्मितीच्या भिरा अवजल विद्युत केंद्र (२×४० मेगावॅट) आणि टाटा पॉवरच्या भिरा (जिल्हा रायगड) जलविद्युत केंद्रास भेट देऊन कामांची पाहणी केली. यावेळी भिरा विभागीय कार्यालय प्रमुख कार्यकारी अभियंता श्री. अशोक वालकोळी यांनी तसेच टाटा पॉवर येथे भिरा जल विद्युत केंद्राचे प्रमुख श्री. अजय कोन्नूर यांनी मा. संचालक (संचलन) यांचे स्वागत केले, त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.





## चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राच्या ऊर्जानगरात वसाहतीत पर्यावरणपूरक होळीचे आयोजन




महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती श्री गुरुदेव सेवा मंडळ आणि, ऊर्जानगर स्पोर्टिंग क्लब व युवा सोशल फाऊंडेशन ऊर्जानगरच्यावतीने सार्वजनिक पर्यावरणपूरक होळीचे आयोजन चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राच्या ऊर्जानगर वसाहतीतील खुले रंगमंच मैदान येथे चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राचे मुख्य अभियंता श्री. गिरीश कुमरवार यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. सदर कार्यक्रमास उपमुख्य अभियंता श्री. श्याम राठोड, डॉ. भूषण शिंदे, कल्याण अधिकारी श्री. दिलीप वंजारी तसेच श्री. पी.एम. जाधव चंद्रपूर जिल्हा कार्याध्यक्ष महाअंनिस, श्री. प्रशांत दुर्गे अध्यक्ष श्रीगुरूदेव सेवा मंडळ, श्री. नरेंद्र रहाटे सामाजिक कार्यकर्ते, श्रीमती. मंजुषा शेषराव येरगुडे सरपंच ऊर्जानगर, कुमरवार मॅडम, राठोड मॅडम, शिंदे मॅडम, श्री. मुरलीधर राठोड अध्यक्ष अंनिस ऊर्जानगर शाखा, किसन अरडळे तर वसाहतीतील रहिवाश्यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.





# गौरव - अभिनंदन




**Mr, Vivek Ghodmare, Superintending Chemist, MAHAGECO was conferred with 'Leader of the Year Award' for Achievement in Water Management in Thermal Power Sector by the hands of Shri. Abhinav Shrivastav, Dy. Commissioner, Ministry of Jal Shakti, GoI.**




परळी औष्णिक विद्युत केंद्र येथे कार्यरत असलेले संतोष श्रीहरी कापावार (उप कार्यकारी अभियंता) यांचे चिरंजीव ओमसाई संतोष कापावार इयत्ता ८ वी भेल सेकंडरी स्कूल टी.पी.एस. कॉलनी परळी याला नुकताच इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड २०२४ चा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्याचे अभिनंदन.

ओम साईचे रुबिक क्यूब मधील योगदान पाहून इंडिया बुक ऑफ रेकॉर्डच्या टीमने त्याचे विशेष कौतुक केले, तसेच ३×३×३ रुबिक क्युब ओमसाईने ३२.५२ सेकंदात पूर्ण केल्याबद्दल त्याला इंडिया बुक ऑफ रेकॉर्डच्या टीमने २०२४ चा इंडिया बुक ऑफ रेकॉर्डचे पुस्तक, गोल्ड मेडल, ओखळपत्र, एक पेन व दोन स्टिकर, एक बॅज देऊन ओमसाईचा सन्मान करण्यात आला.

ओमसाई हा भेल सेकंडरी शाळेचा विद्यार्थी असून तो ईयत्ता ८वी मध्ये शिकत आहे. परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या वर्धापनदिना निमित्त Talent Show चे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ओमसाईने पायाने ३×३×३ रूबिक क्युब एदत्न केल्यामुळे परळी औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता मा. आव्हाड साहेब यांनी त्याची तोंड भरून स्तुती केली होती. आतापर्यंत ओमसाईने वेगवेगळ्या ठिकाणी रूबिक क्युबच्या कार्यशाळा घेतलेल्या आहेत व थर्मल कॉलनी परळी वैजनाथ येथे आहिल्यादेवी होळकर जयंती निमित्त रूबिक क्युबचा प्रशिक्षक म्हणून त्यांने विद्यार्थ्यांना रूबिक क्युब विषयी मार्गदर्शन केले आहे.

ओमसाईचे OSK Smart Cube या नावाने Youtube Channel ही आहे, त्या Channel च्या माध्यमातून तो वेगवेगळ्या रूबिक क्युबविषयी माहिती देत असतो, एव्हढेच नाही तर १५० रूबिक क्युबचा वापर करून त्याने अहिल्यादेवी होळकर, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बसवेश्वर महाराज, श्री प्रभू रामचंद्र, इत्यादी महापुरुषांच्या हुबेहूब प्रतिमा साकारल्या आहेत.



महानिर्मितीचे अभियंता श्री.सुभाष किसनराव तेटवार यांना सन २०२१-२२ यावर्षीचा महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार (दलितमित्र) नुकताच मा. मुख्यमंत्री, मा. उप मुख्यमंत्री आणि मा. समाजकल्याण मंत्री यांचे शुभ हस्ते प्रदान झाला असुन आजवर त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याचा हा खऱ्या अर्थाने गौरव आहे.

श्री. तेटवार हे मागील ३० वर्षांपासून कामगार नेते, वृक्षमित्र, रक्तदान चळवळ, अपंग व निराधारांना मदत तसेच कुंभार समाजाच्या संघटनात्मक आणि रचनात्मक कार्यात महत्वपूर्ण सहभाग आदिं क्षेत्रात त्यांनी स्वत:ला झोकून देऊन काम केले आणि आजही करतात.

विशेषत: आजवर त्यांनी ७० वेळा रक्तदान केले. तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रात एक सामान्य कामगार ते उप कार्यकारी अभियंता हा त्यांचा प्रवास अतिशय प्रेरणादायी असा आहे. विकलांग सेवा संस्थेचे (चंद्रपुर) अध्यक्ष म्हणून त्यांनी केलेली विकलांग लोकांची सेवा अधोरेखित करण्यासारखी आहे. महानिर्मितीत त्यांनी निष्ठेने प्रदीर्घ सेवा बजावली आहे. त्यांच्या या सेवाकार्याचा गौरव म्हणून "गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार" प्रदान करण्यात आला आहे.

सेवानिवृत्तीनतंरही त्यांच्या निष्ठापूर्वक कार्याचा आणि अनुभवाचा फायदा महानिर्मितीला व्हावा म्हणून महानिर्मिती कंपनीत सहाय्यक अधिकारी, सौर ऊर्जा (उभारणी व देखभाल) या पदावर ते प्रादेशिक मुख्य अभियंता (नवीकरणीय ऊर्जा) नागपूर येथे कार्यरत आहे. त्यांच्या या सामाजिक सेवेचा महानिर्मिती परिवाराला सार्थ अभिमान आहे.





मुंबई येथे ऑक्टोबर २०२३ मध्ये संपन्न झालेल्या कॉम्बॅट मार्शल आर्टस असोसिएशन-इंडिया आणि वाडो-र्यु कराटे डो वर्ल्ड स्पोर्टस युथ असोसिएशन-इंडिया तर्फे आयोजित सी.एम.एम. चॅम्पियन्स कप - २ऱ्या आंतरराष्ट्रीय कराटे चॅम्पियनशिप २०२३ मध्ये कु. प्रांजल हिला ३८ किलोग्रॅम वजनी गटात काटा या प्रकारात ३रा आणि कु. मंजिरी हिला ३६ किलोग्रॅम वजनी गटात काटा या प्रकारात १ला तर कुमाईट या प्रकारात ३रा क्रमांक प्राप्त झाला.

कु. प्रांजल व कु. मंजिरी ह्या महानिर्मितीच्या सांघिक कार्यालय येथे शिष्टाचार विभागात कार्यरत असलेले वाहन चालक श्री. मच्छिंद्र कुतरवाडे यांच्या कन्या आहेत.

# गौरव - अभिनंदन



अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळ (AIESCB) द्वारे कुरुक्षेत्र, हरियाणा येथे आयोजित ४५ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महानिर्मिती महिला बुद्धिबळ संघाने प्रभावी कामगिरी केली. महानिर्मिती महिला बुद्धिबळ खेळाडूंमध्ये प्रामुख्याने रचना साळुंके – प्रणाली विश्लेषक, मुख्य कार्यालय, मुंबई., शिल्पा पाटील – सहाय्यक अभियंता, औ. वि. केंद्र भुसावळ, प्रणाली जाधव – सहाय्यक अभियंता, औ. वि. केंद्र नाशिक, रेणुका यादव –तंत्रज्ञ २, औ. वि. केंद्र पारस तर संघ प्रशिक्षक - श्री. किरण शिंदे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, संघ व्यवस्थापक - श्री. अमरजीत गोडबोले, कल्याण अधिकारी यांचा सहभाग होता.



४५ व्या अखिल भारतीय विद्युत क्रीडा संनियंत्रण मंडळ (AIESCB) अंतर्गत कुरुक्षेत्र, हरियाणा येथे आयोजित स्पर्धेत महानिर्मितीच्या महिला टेबल टेनिस संघाने राष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी बजावत सुवर्ण ट्रॉफी जिंकली. यामध्ये प्रामुख्याने सौ. वैशाली पाटील, अधीक्षक अभियंता, मुख्य कार्यालय, मुंबई, पियुशा तांबेकर, उप कार्यकारी अभियंता, मुख्य कार्यालय, मुंबई, भारती अंभोरे, तंत्रज्ञ-१, औ. वि. केंद्र पारस, शुभांगी चिंचाळकर, तंत्रज्ञ-२, औ. वि. केंद्र खापरखेडा तर संघ प्रशिक्षक - श्री. किरण शिंदे, अति कार्यकारी अभियंता, संघ व्यवस्थापक - श्री. अमरजीत गोडबोले, कल्याण अधिकारी यांचा सहभाग होता.



महानिर्मिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या.

भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र

प्रशस्ती पत्र

श्री. बजरंग शामराव पारसकर

उप व्यवस्थापक (सुरक्षा)

आपण कर्तव्यावर असतांना भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र, दीपनगर येथे सुरक्षा विभागातील कामकाजात उत्कृष्टपणे कामगिरी करीत आहात. आपण भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र, दीपनगर येथे चोरीच्या प्रयत्नास आपले जिवाची पर्वा नकरता गुन्हेगारास रंगेहाथ पकडून चोरीचा प्रयत्न हाणून पाडले. त्यामुळे महानिर्मितीचे होणारे भौतिक व आर्थिक नुकसान टळले आहे.

तसेच आपण संप, आंदोलन व मोर्चा दरम्यान विशेष परिश्रम घेऊन करीत असलेल्या कौतुकास्पद कामगीरीमुळे सुरक्षा विभागास नेहमी लाभ होऊन भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र, दीपनगर परिसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणेसाठी आपले मोलाचे योगदान लाभले आहे.

आपण केलेल्या कार्याचा भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र, दीपनगर प्रशासनास सार्थ अभिमान असुन या उल्लेखनीय कामगीरीची सेवापुस्तीके मध्ये नोंद घेवुन आज "प्रजासत्ताक दिनी" आपणास प्रशस्ती पत्र देऊन गौरव करण्यात येत आहे.

भविष्यात अशीच उत्कृष्ट कामगिरीच्या अपेक्षांसह हार्दिक शुभेच्छा..

दि. २६ जानेवारी २०२४

मुख्य अभियंता
भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र,
दीपनगर



माऊंट एव्हरेस्ट जगातील सर्वात उंच पर्वत शिखर ८८४६.८६ मीटर उंच आणि या शिखराची अगदी जवळून भेट घालून देणारा एव्हरेस्ट बेस कॅम्प ट्रेक.




अत्यंत अवघड समजला जाणारा एव्हरेस्ट बेस कॅम्प ट्रेक महानिर्मितीच्या नविकरणीय ऊर्जा मंडळ पुणे येथे चाचणी विभागात कार्यरत उप कार्यकारी अभियंता सौ. रश्मी सुनील निमजे यांनी १५ ते ३० एप्रिल २०२४ या कालावधीत यशस्वीरित्या पूर्ण केला.



खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र येथे तंत्रज्ञ-२ या पदावर कार्यरत असलेले श्री. दिगंबर मोतीराम राठोड यांचे चिरंजीव श्री. स्वप्निल राठोड ह्याने नोव्हेंबर २०२३ मध्ये एस.एम.बी.टी. आयुर्वेद महाविद्यालय, इगतपुरी, नाशिक येथे बी.ए.एम.एस. ला प्रवेश घेतला आहे.



सांघिक कार्यालय, मुंबई येथे कार्यकारी अभियंता या पदावर कार्यरत असलेले श्री. रमेश क. प्रधान यांची पाल्या कु. श्रध्दा रमेश प्रधान ही २०२३-२४ मध्ये झालेल्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १०वी) मध्ये ९३.४०% गुण मिळवून उत्तीर्ण झाली.



भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र, दीपनगर येथे कामगार व औद्योगिक संबंध विभागात तंत्रज्ञ-३ या पदावर कार्यरत असलेले श्री. प्रफुल्ल सोमनाथ आवारे ह्यांना गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार - २०२१ करिता तत्कालीन राज्यपाल मा.श्री. रमेश बैस यांच्या हस्ते गौरविण्यात आलेले असून महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे रोख रु. २५,०००/-, स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे, मुंबईचे पालकमंत्री मा.श्री. दिपक केसरकर, प्रधान सचिव (कामगार विभाग) विनिता वेद सिंघल, आयुक्त (कामगार) श्री. सतीश देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

# गौरव - अभिनंदन



महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाद्वारे पहिले राज्यस्तरीय कवी संमेलन नागपूर विभागाची ऑनलाईन स्व-रचित काव्य स्पर्धा गुगल मिटद्वारे कामगार कल्याण भवन, राजेरघुजी नगर, नागपूर येथे आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये कोराडी औष्णिक विद्युत केंद्र येथे तंत्रज्ञ-१ या पदावर कार्यरत असलेले श्री. प्रशांत ज्ञानेश्वर नागापुरे ह्यांनी स्व-रचित सादर केलेल्या 'अरे कामगार कामगार' या कवितेस तृतीय क्रमांक प्राप्त झाला.



कोराडी औष्णिक विद्युत केंद्र येथे अग्निशमन विभागात डी.सी.एफ.ई.ओ. या पदावर कार्यरत असलेले श्री. अनिलसिंह एम. चौहान यांची पाल्या कु. सिध्दी चौहान श्री रामदेवबाबा अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन या कॉलेजची विद्यार्थिनी असून तिला बी.ई. इलेक्ट्रिक इंजिनीअरींग मध्ये ९.९२ सी.जी.पी.ए. गुणवत्ता प्राप्त केले असून सुवर्ण पदक प्राप्त झाले. तसेच कु. सिध्दी हिने 'स्कोप' हे क्लासिक पुस्तक नविनतम विज्ञान कक्षेवर आधारित लिहिले आहे.



भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र येथे पहारेकरी या पदावर कार्यरत असलेले श्री. राजेंद्र वसंत झोपे यांचा पाल्य कु. जीवन राजेंद्र झोपे हा एम.एच.टी.-सी.ई.टी. (पी.सी.एम. ग्रुप) मध्ये ९४.१६% गुण मिळवून उत्तीर्ण झाला.





कोराडी औष्णिक विद्युत केंद्र येथे अतिरिक्त कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ या पदावर कार्यरत असलेले डॉ. नितीन करमरकर यांचा 'रंग त्या नभाचे' हा दुसरा कथासंग्रह विदर्भ साहित्य संघ, नागपुर व दिलीपराज प्रकाशन, पुणे यांच्या तर्फे ज्येष्ठ साहित्यिक डॉ. रवींद्र शोभणे यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला. डॉ. नितीन करमरकर यांचा 'समर्पण' हा कथासंग्रह यापूर्वी प्रकाशित झाला असून त्यांना अनेक राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. सदर साहित्याची दखल रस्ते, वाहतुक व परिवहन मंत्री मा. श्री. नितीन गडकरी ह्यांनी घेतली असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

सदर सोहळ्यास डॉ. गिरीश गांधी (माजी विधान परिषद सभासद) व विश्वस्त वनराई फाऊंडेशन, नागपूर आणि ज्येष्ठ साहित्यिक डॉ. वि.स. जोग यांची उपस्थिती लाभली होती.



महानिर्मितीच्या सांघिक कार्यालय, मुंबई येथे औद्योगिक संबंध विभागात उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी या पदावर कार्यरत असलेले श्री. विलास रघुनाथ हिरे यांचा पाल्य कु. जयेश विलास हिरे हा वर्ष २०२२-२३ मध्ये मुंबई विद्यापीठातून एम.एस.सी. (फिजिक्स) या विषयात विशेष प्राविण्य मिळवून उत्तीर्ण झाला.



**Khaperkheda Unit-2 marked an impressive milestone of 100 continuous running days. KPKD Unit-02 is running continuously after completion AOH on dtd. 13/02/2024.**



**पारस संच क्रमांक ४ ने या २६७ दिवसांत १३८५.१ मिलियन युनिटस आणि सरासरी २१६ मेगावॅटसह वीज उत्पादन केले आहे. अखंडित वीज उत्पादन करीत असल्याने महानिर्मितीच्या आजवरच्या इतिहासात या संचाने नवीन ऐतिहासिक विक्रम प्रस्थापित केला आहे.**

## Congratulations!

PARAS UNIT 4 has created new milestone by completing 250 days of Continuous Running since 17.07.2023 (07.45 Hrs) till 23.03.2024 (07.45 Hrs)

This was possible due to Teamwork, Dedication, and Outstanding Performance

**KEEP UP THE GREAT WORK**

## CONGRATULATIONS TEAM URAN

ON 06.05.2024 AT 05:01 HRS URAN UNIT 10 (B0) COMPLETED 100 RUNNING DAYS AFTER LONG TIME ( 17.05.2016) THIS IS SPECIAL ACHIEVEMENT CONSIDERING PRESENT HIGH DEMAND SEASON.

CONGRATULATIONS TO CE & ALL THE URAN STAFF WHO HAVE CONTRIBUTED FOR THIS ACHIEVEMENT

## CONGRATULATIONS TO THE TEAM PARLI UNIT 6

TODAY ON 25.03.2024 AT 11:45 HRS. PARLI UNIT 6 ACHIEVED A MARVELOUS FEAT OF 100 DAYS CONTINUOUS RUNNING DAYS.

MAHAGENCO MANAGEMENT APPRECIATES THE OUTSTANDING PERFORMANCE AND ANTICIPATES EVEN GREATER ACHIEVEMENTS IN FUTURE

CONGRATULATIONS ON THIS AMAZING ACCOMPLISHMENT!!!!

## चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राच्या कोळसा हाताळणी विभागातील नारीशक्तीची उल्लेखनीय कामगिरी!

चंद्रपूर कोळसा हाताळणी विभाग वॅगन टिपलर नारीशक्तीला सुपूर्द केल्याचा अभिनव प्रयोग यशस्वी! कोळसा हाताळणी विभागाचे खडतर काम लीलया साकारले!

Congratulations CHP- CSTPS!

Great achievement of Mahagenco CSTPS women power, 100 wagons unloaded in C - shift of 08/05/2024. Significant contribution by Woman Employees is highly appreciated.

महानिर्मितीच्या नारीशक्तीला सलाम. महानिर्मितीच्या पुढील वाटचालीत नारीशक्तीचे योगदान असणार महत्त्वपूर्ण.

## Congratulation Total Mahagenco Genration above 60K MUs!

Today Mahagenco's Total Power Generation surpasses 60,000 MUs (60 BUs) for current FY, marking a new all-time high Generation. The previous record was 57,734 MUs.

This achievement was made possible by the continuous motivation, guidance and support from Honorable CMD, Honorable Directors, Top Management and the entire team at Mahagenco. Their encouragement inspires us to strive for even greater success through teamwork & dedication.

## Happy to inform that Zero Oil Consumption (SOC) recorded on 29.06.2024 !

Mahagenco Level Thermal Oil (SOC) Consumption for 29.06.2024 was Zero, this is remarkable achievement during ongoing monsoon season.
Leading to saving in cost of Oil for the day.

oilsave
efficient safe energy

We should endeavor to achieve even better commercial performance.

## खापरखेडा वीज निर्मिती केंद्राचे मुख्य अभियंता अधिकारी कर्मचारी यांचे अभिनंदन!

100

Today 23.05.2024 at 21:44 hrs, KPKD Unit-02 marked an impressive milestone of 100 continuous Running days. KPKD Unit-02 is running continuously after completion AOH on 13.02.2024.

This achievement is particularly commendable since Unit-02 achieved 100 running days milestone after long span i.e 20.03.2019.

Congratulations Khaperkheda TPS!

## PARAS TPS UNIT04
## 234 CONTINOUS RUNNING DAYS .

UNIT 04 OF PARAS TPS COMPLETES 234 CONSECUTIVE DAYS OF OPERATION, MARKING THE HIGHEST RECORD FOR FY23-24 AMONG ALL UNITS OF MAHAGENCO.

*Team Paras, fantastic work!*

*This success is a direct outcome of the outstanding teamwork and dedication shown by all team members.*

## Mahagenco maintaining 10,000 + MW

10,000MW+ achieved to meet rising State demand..
22.05.2024 - 3 blocks (00.30 HRS, 00.45 HRS, 01.00 HRS)

राज्यात वीज मागणीमध्ये वाढ! मुंबईत ४३०६ मेगावॅट विक्रमी मागणी
महानिर्मितीचे १०,००० + मेगावॅट योगदान

## Thermal Generation in last 5 years - July Month - record we broke today.

It is proud to announce that, MAHAGENCO broke record of Thermal generation in last 5 year - JULY.

Thermal Generation recorded as 3938.928 Mus in JULY 2024.
Previous highest was 3889 Mus in JULY 2023

**Congratulations TEAM MAHAGENCO, All TPS.**

## सांघिक कार्यालय, मुंबई येथे जागतिक महिला दिनानिमित्त ‘महिला कट्टा’ विशेषांकाचे प्रकाशन




सांघिक कार्यालय, मुंबई येथे महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ. पी. अन्बलगन यांचे अध्यक्षतेखाली महिला दिन साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक व मान्यवर संचालक, कार्यकारी संचालक व अन्य अधिकारी-कर्मचारी तसेच महिला अधिकारी-कर्मचारी यांच्या उपस्थितीत ‘महिला कट्टा’ या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी मान्यवर संचालक मंडळासमोर उपस्थित महिला अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली, त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.




## भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र येथे जागतिक महिला दिन उत्साहात संपन्न







भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र येथे मुख्य अभियंता श्री. मोहन आव्हाड यांचे अध्यक्षतेखाली जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त औ.वि. केंद्रातील महिला अधिकारी-कर्मचारी तसेच वसाहतीतील महिलांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन, प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन, विशेष कामगिरीबद्दल महिलांचा सन्मान करण्यात आला. तसेच महिला सक्षमीकरण व जनजागृती सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.





कोयना जल विद्युत केंद्र संकुल, पोफळी येथे मुख्य अभियंता श्री. संजय चोपडे यांचे अध्यक्षतेखाली जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त कार्यालयीन तसेच वसाहतीतील महिलांसाठी समाजप्रबोधनपर तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन आाणि आरोग्य तपासणी शिबीर राबिवण्यात आले.

## कोराडी प्रशिक्षण केंद्र येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा





कोराडी प्रशिक्षण केंद्रात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा झाला. यावेळी मुख्य अतिथी डॉ. रमा गोळवलकर यांनी नारी शक्तीचे महत्व सांगितले, तर महानिर्मितीचे संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारुडकर यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थींशी संवाद साधला. याप्रसंगी कोराडी प्रशिक्षण केंद्राचे मुख्य अभियंता श्री. सुनील रामटेके, कोराडी वीज केंद्राचे मुख्य अभियंता श्री. विलास मोटघरे तसेच प्रशिक्षण केंद्रातील महिला अधिकारी-कर्मचारी सुध्दा उपस्थित होते.





## नाशिक प्रशिक्षण केंद्र, एकलहरे येथे जागतिक महिला दिन उत्साहात संपन्न












नाशिक प्रशिक्षण केंद्राच्या अधीक्षक अभियंता सौ. गीतांजली पारखी यांच्या अध्यक्षतेखाली व कार्यकारी अभियंता श्री. जयंत देवरे यांच्या प्रमुख उपस्थितीत नाशिक प्रशिक्षण केंद्र, एकलहरे येथे विशेष अतिथींचे मार्गदर्शनपर व्याख्यान, परिसंवाद, पथनाट्य व विविध मनोरंजनपर खेळांच्या आयोजनाद्वारे महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.














परळी औष्णिक विद्युत केंद्रात मुख्य अभियंता श्री. अनिल काठोये यांचे अध्यक्षतेखाली महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सदर दिनानिमित्त औ.वि. केंद्रातील आणि वसाहतीतील महिलांसाठी विविध क्रीडा-सांस्कृतिक कार्यक्रम व आरोग्यविषयक शिबिरे राबिवण्यात आली, तसेच उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला, त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.






























## कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात महिला दिन उत्साहात संपन्न





कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात मुख्य अभियंता श्री. विलास मोटघरे यांचे अध्यक्षतेखाली महिला दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी मान्यवर अध्यक्ष व अतिथी यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले तसेच औ.वि. केंद्रातील कार्यरत महिलांनी आपले मनोगत व्यक्त केले. सदर दिनाचे औचित्य साधून महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबीर आयोजन करण्यात आले होते तसेच उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा व पाळीत काम करणाऱ्या महिलांचा यथोचित सन्मान करण्यात आला, त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.










## पारस औष्णिक विद्युत केंद्रात महिला दिन उत्साहात संपन्न




पारस औष्णिक विद्युत केंद्रात मुख्य अभियंता श्री. शरद भगत यांचे अध्यक्षतेखाली महिला दिन उत्साहात संपन्न झाला. सदर दिनानिमित्त महिलांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन तसेच बाह्यगृह क्रीडा स्पर्धेतील विजेत्या महिलांचा सन्मान करण्यात आला, त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.





## Huge response to Summer VT Batch at Chandrapur STPS





**Summer 2024, Vacation training Batch at CSTPS was conducted under the guidance of Chief Engineer Chandrapur Super Thermal Power Station, Shri. Girish Kumarwar. Closing ceremony of VT Batch for Engineering Students was held at Chandrapur STPS Training Sub Centre. Dy. Chief Engineer (Admin) CSTPS, Dr. Shri. Bhushan Shinde were present as the President and S.E. (RP) Shri. Mahesh Rajurkar was present as a Chief Guest, Shri. Narendra Rahate, Training Co-ordinator (TSC) and Shri. Rahul Pahune (AE) were also present. Total 148 students from various colleges of all over India enrolled for the Vacation training program.**

















## Induction Level Training organized at CSTPS for Junior Security Officers







**Chief Engineer CSTPS, Shri. Girish Kumarwar was present as the President, while Chief General Manager (Security) Col. Shri. Rajiv Malewar along with Deputy Chief Engineer Shri. Anil Punse were present as the Chief Guest of the inaugural function. AD Security, Shri. Shilratna Gongale, Sr. Manager Security, Shri. Anurag Shukla, and Safety Officer, Shri. Prashant Kathale were prominently present as Special Guests. Total 22 newly joined JSOs from various TPS participated in the training program.**

## कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात कार्यक्षम ऊर्जा निर्मितीसाठी ताणतणाव व्यवस्थापन आणि प्रेरणादायी प्रशिक्षण





महानिर्मितीच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून कोराडी औष्णिक विद्युत केंद्र ३×६६० मे.वॅ. येथे मुख्य अभियंता (कोराडी औ.वि. केंद्र) श्री. विलास मोटघरे यांच्या अध्यक्षतेखाली आणि मुख्य अभियंता (सौर) श्री. राजेशकुमार ओसवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत **Motivation Programme for Efficient Power Generation** या शिर्षका अंतर्गत प्रेरणादायी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. तज्ज्ञ प्रशिक्षक, प्रसिद्ध नॉन क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट, वरिष्ठ पत्रकार आणि प्रभावी चरित्रकार, डॉ. पी.आर. सूबास चंद्रन यांनी प्रस्तुत विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला सर्व वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा भरघोस प्रतिसाद लाभला.

















**Prize Distribution Ceremony of Indoor & Outdoor Sports Competitions for trainees were organised in presence of Mrs. Bharti Vijaykar, Superintending Engineer (Admin) and Mrs. Aruna Bhendekar, Superintending Engineer with Executive Engineers Mrs. Vidhya Bakde, Shri. Nilesh Wankhede, S. Suke Incharge Executive Engineer and all Koradi Training Centre Engineers.**





## महानिर्मिती आंतर विद्युत केंद्र "आंतरगृह क्रीडा स्पर्धा" क्षणचित्रे
## यजमानपद - भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र

























## महानिर्मिती आंतर विद्युत केंद्र "आंतरगृह क्रीडा स्पर्धा" क्षणचित्रे
## यजमानपद - भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र





















## महानिर्मितीच्या सांघिक कार्यालयात पर्यावरण दिनानिमित्त निसर्ग छायाचित्रांचे प्रदर्शन व वृक्षारोपण










जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महानिर्मितीच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी काढलेल्या निसर्ग छायाचित्रांचे प्रदर्शन सांघिक कार्यालय, मुंबई येथे लावण्यात आले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते प्रकाशगड मुख्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले तसेच कागदांपासून तयार केलेले पेन आणि झाडांच्या बियांसह अभिनव ग्रीटिंग कार्ड सर्व मान्यवरांना देण्यात आले, त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.






## चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रात पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण





चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर तसेच हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड यांनी सहभागी होऊन संयुक्तिकपणे चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण दिवस साजरा केला. पर्यावरण दिनानिमित्त 'पर्यावरण' या विषयावर चित्रकला स्पर्धा आणि घोषवाक्ये स्पर्धा घेण्यात आली.







घाटघर जल विद्युत केंद्र येथे जागतिक पर्यावरण दिन व महानिर्मितीच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून वृक्षारोपण संपन्न

## कोराडी औष्णिक विद्युत केंद्र येथे जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा







कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात मुख्य अभियंता श्री. विलास मोटघरे यांच्या अध्यक्षतेखाली जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले, नर्सरी ते इयत्ता बारावी पर्यंतच्या मुलांकरिता पर्यावरण विषयावर चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा तसेच वीज केंद्राच्या कर्मचाऱ्यांनी पर्यावरण विषयक पथनाट्याचे सादरीकरण केले. तद्नंतर वीज केंद्रामध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले.












## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कोराडी प्रशिक्षण केंद्र परिसरात वृक्षारोपण













जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून मुख्य अभियंता श्री. सुनील सोनपेठकर यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिक प्रशिक्षण केंद्र, एकलहरे येथे कार्यालयीन वास्तू व प्रशिक्षणार्थी वसतिगृह परिसरात प्रशिक्षण केंद्राचे अधिकारी, कर्मचारी, एन-७१, एन-७२ आणि एन-७३ बॅचच्या प्रशिक्षणार्थी अभियंत्यांच्या हातून वृक्षारोपण करण्यात आले.

# एक विदारक कटु सत्य

एक विदारक कटू सत्य,
पण लक्षात येत नाही,
मनुष्य जीवन जगत असताना
बऱ्याच वेळा आपल्याला असे वाटते की,
जगात मलाच जास्त दु:ख आहे.
हे दु:ख, हा त्रास माझ्याच वाट्याला का ?
हे भोग मलाच का भोगावे लागतात ?
अशा लोकांसाठी.

ऊस तोडणी गोरगरीब मजूर पहा...

सकाळी लवकर उठा आणि बाहेर फिरायला जा.
तुम्हाला काही मान्यवर मंडळी पळताना दिसतील
त्यांना विचारा का पळताय?
तर पोट कमी करायला.
कारण अनेक आजार झालेत म्हणून.
तर काही पोट भरण्यासाठी धडपडत आहे,
किती विरोधी चित्र ना...

यानंतर शेजारच्या एखाद्या हॉस्पिटलमधे जा.
तिथे गरीब श्रीमंत पडलेल्या चेहरा करून बसलेले
दिसतील...

यानंतर मंदिरात जा. जाताना गरीब भिकारी तुमच्याकडे
भीक मागतील आणि मंदिरात श्रीमंत भिकारी देवाकडे
भीक मागताना दिसतील, मला अजुन काहीतरी दे...

यानंतर रेशनिंग, बील, फी भरण्याच्या रांगा बघा.
पैसा असूनही काही तरी घेण्यासाठी आसुसलेले
लोक दिसतील...

यानंतर एखाद्या अनाथाश्रमात जा.
लहानपणीच जवळचे सोडून गेल्याने
प्रेमासाठी भुकेले चेहरे दिसतील...

यानंतर अपंगाच्या आश्रमात जा.
स्वत:च्या एखादा अवयवाशिवाय जगणारे भेटतील.
एखादा अवयव नसेल तेव्हा त्याची किंमत समजते...

यानंतर घरी या आणि शांतपणे विचार करा. मी तर
इतरांपेक्षा सुखी आहे का?
विचार स्वत:च्या अंतर्मनाला...
माझे दु:ख मोठे आहे का आज दिवसभर
भेटलेल्या लोकांचे ?...

आणि रात्री दुसऱ्याचे दु:ख पाहून
तुम्हाला झोप येणार नाही.
मग लक्षात येईल त्यांच्या दु:खात
तुम्ही तुमचं दु:ख विसरून गेलाय ते...

आपल्यापेक्षा जगात हजारो पटीने
दु:ख भोगणारे आणि तरीही छान जगणारे
लोक आहेत या जगात.
पण तरीही आपले दु:ख मोठे वाटते
कारण ते आपल्यालाच भोगावे लागते...

आपल्या दु:खाचा, संकटाचा बाऊ करू नका
कारण ते भोगण्याशिवाय गत्यंतरच नाही...
म्हणून हसत जगा आणि दुसऱ्याला हसवा...

यालाच जीवन म्हणतात.
हे सगळं पाहिल्यावर
आपल्याला असे वाटले की,
आपण स्वत: खरंच किती सुखी आहोत...

स्वानंदी...

**– आनंद आबाराव कोंत,**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं),**
**महानिर्मिती, मुंबई.**



# माणूस असा का वागतो

नैतिकता अन् सामाजिक विषमता,
धर्मभावना आणि अध्यात्मिकता,
प्रेम अन् लैंगिकता, आक्रमकता अन् भय,
अनुपालन, धर्म–जात भेदाभेद,
कल्पनाविश्व अन साहित्य–कला–क्रीडा
माणसाच्या वर्तनाचे असे अनेकविध पैलू,

उत्क्रांतिशास्त्र, मानववंशशास्त्र,
भाषाशास्त्र, जेनेटिक्स, मेंदूविज्ञान,
मानसविज्ञान, प्राणीवर्तनविज्ञान
अशा विविध ज्ञानशाखांच्या मिलाफातून
माणसाच्या वर्तनाचा अभ्यास चालू आहे.
स्वत:चे सांस्कृतिक पर्यावरण
घडवण्याची क्षमता असलेला
एकमेव प्राणी म्हणजे माणूस.

सहकार्य, परोपकार, साहचर्य हे गुण
माणसाच्या उत्क्रांतीत महत्त्वाचे ठरले आहेत.
माणसांना एकमेकांशी बांधणारी तत्त्वं
माणसाच्या वर्तनात उत्क्रांतीनेच पेरली आहेत का ?
मानवी वर्तनाला विधायक वळण
देण्याची अंगभूत क्षमता माणसातच आहे का ?

अशा अनेक प्रश्नांच्या उत्तरांचा मागोवा
घेणारे आजच्या सामाजिक–राजकीय–आर्थिक परिस्थितीशी
नानाविध ज्ञानशाखांच्या एकात्मिक अभ्यासाचा
संबंध जोडत माणसाच्या व्यक्तिगत अन्
सामूहिक वर्तनाचा वैज्ञानिक वेध घेणारे
माणूस 'असा' का वागतो ?

– नितीन देवराम सोनवणे
**तंत्रज्ञ १,**
**भुसावळ औ.वि. केंद्र.**





# निसर्ग आपले जीवन

निसर्ग आपले जीवन
कर्तव्य घ्या स्वत:चे जाणून
जोपासना करणे त्याची
नाही तर काय पश्चाताप करून
ऊन वारा पाऊस जर असे समतोल
त्याचा वृक्ष लावा जोपासना करू

गोष्ट अधिकाराची
उपाय सर्व संपता
काही कुणाचे चालेना
योजना आधी आखा
प्राणवायू द्या उरलेल्यांना

धबधबे सरोवर छान
आकर्षक करतील पर्यटन आणि
चित्र मोबाईल कॅमेऱ्यात प्रकटतील

हिरवीगार सृष्टी चहुकडे
दिसे समाधान मनाला
जीवनात खूप सारे महत्त्व आहे
ती जिवंत असण्याला

– राजेश लक्ष्मण वन्हाडे,
**एम आय एस विभाग,**
**पारस औष्णिक वीज केंद्र पारस**

# It's My Life

- श्री. संजय कुलकर्णी,

कार्यकारी अभियंता (मध्यवर्ती खरेदी विभाग),
मुख्य कार्यालय, मुंबई.




**It's** my life take it or leave it ,Set me free what's that crap papa-knew-it-all
I got my own life you got your own life , Live your life and set me free
Mind your business and leave my business ,You know everything papa-knew-it-all
Very little knowledge is dangerous
Stop bugging me stop bothering me ,Stop bugging me stop forcing me
Stop fighting me stop yelling me
It's my life

It's my life my worries! (It's my life), It's my life my problems! (It's my life)
It's my life my worries! (It's my life), It's my life my problems! (It's my life)

[Verse 2]
Do you understand ,I live the way I want to live
I make decisions day and night ,Show me signs and good examples
Stop telling me how to run your business ,Take a trip to east and west
You find that you don't know anything , Every's getting tired of you
Sometimes you have to look and listen ,You can even learn from me
Little knowledge is dangerous ,It's my life
[Verse 3]
Set me free, So you bed so you lie
What you see is what you get, Listen to people and sort things out
Things I do I do them no more, Things I say I say them no more
Changes come once in life, It's my life...

१९९० च्या दशकात गाजलेले व कॉलेज जीवनात मला प्रेरणा देणारे माझे आवडते गाणे 'इट्स माय लाईफ'. नायजेरियात जन्मलेल्या स्वीडिश कलाकार डॉ. अल्बान यांचे गीत १९९२ मध्ये रिलीज झाले आणि बघता बघता सगळ्या जगात व विशेष करून युरोपात सुपरहिट झाले. 'इट्स माय लाइफ' हे नायजेरियन-स्वीडिश रेकॉर्डिंग आर्टिस्ट डॉ. अल्बान यांचे एक गाणे आहे. हे SweMix द्वारे फेब्रुवारी १९९२ मध्ये स्वीडनमध्ये त्यांचा दुसरा स्टुडिओ अल्बम, वन लव्ह (१९९२) मधील पहिले एकल म्हणून प्रसिद्ध झाले. गाण्याचे आकर्षक बीट आणि बोल यामुळे हे स्व-अभिव्यक्ती, व्यक्तिमत्व आणि आत्मनिर्णय व्यक्त करणारे (self-determination) हे एक गीत आहे.

९० च्या दशकात ग्रामीण भागातून शेकडो मैलाचा प्रवास करून शहरात उच्च शिक्षण घेण्यासाठी आलेल्या माझ्यासारख्या अनेक होतकरू व परिस्थितीशी संघर्ष करणाऱ्या तरुणांना आपले लक्ष विचलित न होऊ देता ध्येयाच्या दिशेने एकाग्रपणे वाटचाल करण्याची प्रेरणा देणारे हे गीत.

इट्स माय लाइफचे या गाण्याच्या सुरुवातीच्या ओळी आपल्या आयुष्यावर, आपल्या जीवनावर नियंत्रण ठेवण्याच्या आणि स्वत:चे निर्णय स्वतः घेण्याच्या स्वातंत्र्याबद्दल, महत्त्वाबद्दल बोलतात. डॉ. अल्बन म्हणतात, "हे माझे जीवन आहे, तुम्ही लक्षात घ्या किंवा सोडा. मला मोकळे करा, स्वतंत्रपणे जगण्याचा मला पूर्ण अधिकार आहे."

हे जग आपल्याविषयी काय म्हणेल याचा विचार न करता आपल्याला योग्य काय आहे, हे आपल्या क्षमतेनुसार व गरजेनुसार ठरवून त्याप्रमाणे निर्णय घेणे गरजेचे आहे. कोणाच्याही आहारी न जाता प्राप्त परिस्थितीत योग्य तो निर्णय घेणे आपला अधिकार आहे कारण Afterall It's My life...

ह्या गाण्यात पुढे म्हटले आहे की, "मला माझे स्वत:चे जीवन मिळाले, आणि तुम्हाला तुमचे स्वतंत्र जीवन, तुम्ही तुमचे जीवन जगा आणि मला माझे जीवन स्वतंत्रपणे जगू द्या, तुम्ही माझ्या कार्यात ढवळाढवळ न करता तुमच्या कार्यावर लक्ष केंद्रीत करा. स्वतः तुमच्या क्षेत्रात सर्वज्ञ बना कारण अपूर्ण ज्ञान अत्यंत हानिकारक असते."

पूर्वीच्या काळी सुविधांचा अभाव असताना हॉस्टेलला राहून शिक्षण घेणाऱ्या आमच्यासारख्या विद्यार्थ्यांना या गाण्याने निश्चितपणे योग्य दिशा दाखवली.

It's My Life हे गाणे श्रोत्यांना स्वत:चे बनण्यास आणि ते कोण असावे हे इतरांना ठरवू न देण्यास प्रोत्साहित करते. "It's my soul, it's now or never. I ain't gonna live forever. I just want to live while I'm



महानिर्मिती

alive.” हा माझा आत्मा आहे, हे माझे जीवन आहे आणि ते मी आताच माझ्या पद्धतीने जगण्याचे न शिकल्यास मला परत जगण्याची संधी मिळणार नाही. मी कायमचे जगणार नाही. मी जिवंत असतानाच मला माझे जीवन माझ्याप्रमाणे जगायचे आहे. एकंदरीत, हे गीत लोकांना त्यांच्या जीवनाची जबाबदारी घेण्यास आणि पृथ्वीवरील त्यांचा जीवनप्रवास सुखद व अविस्मरणीय बनवण्यासाठी सक्षम करते आणि प्रेरणा देते.

"इट्स माय लाइफ" आत्मनिर्णयाबद्दल एक शक्तिशाली संदेश पाठवते. आपल्या जीवनावर आपले स्वत:चे नियंत्रण असणे जरुरी असून इतर काय विचार करतील किंवा काय म्हणतील हे महत्वाचे नाही. जुन्या व कालबाह्य सामाजिक नियमांचे पालन करण्यासाठी किंवा एखाद्या विशिष्ट विचारधारेचे पालन करण्यासाठी दबाव असणाऱ्या युवा वर्गासाठी हे गाणे विशेष मार्गदर्शक आहे.

हे गाणे आपल्याला आठवण करून देते की, आयुष्य खूप छोटे आहे आणि ज्या गोष्टी आपल्याला आनंदी आणि परिपूर्ण बनवतात त्यासाठी आपण आपल्या वेळेचा जास्तीत जास्त उपयोग केला पाहिजे.

"इट्स माय लाइफ" ची प्रेरणा वैयक्तिक अनुभवातून मिळाली, असे डॉ. अल्बन यांनी म्हटले आहे. दंतचिकित्सक म्हणून त्याच्या कारकिर्दीत संगीताच्या आवडीसोबत समतोल साधण्यासाठी ते धडपडत होते आणि यामुळे त्यांच्यावर सतत टीका होत होती. हे गाणे त्यांच्या स्वातंत्र्यावर ठाम राहण्याचा आणि त्यांचे जीवन जगण्यासाठी स्वत:चे आहे याची आठवण करून देण्याचा त्यांचा मार्ग होता व त्याद्वारे इतरांनाही प्रेरणा मिळावी हा त्यांच्या प्रयत्नाचा भाग होता.

"इट्स माय लाइफ" हे पॉप, डान्स आणि हिप-हॉपसह विविध संगीत शैलींचे मिश्रण आहे. गाण्याची उत्स्फूर्त लय आणि आकर्षक चाल यामुळे ते नाचण्यासाठी आणि गाण्यासाठी झटपट आवडते बनले आहे. गाण्याच्या अनोख्या संगीत शैलीने ते १९९०च्या दशकातील सर्वात प्रतिष्ठित गाण्यांपैकी एक बनण्यास मदत केली आहे. आजही हे गाणे लोकप्रिय आहे. आजही बरेच लोक ते ऐकतात आणि सोबत गातात.

"इट्स माय लाइफ" ने एक शक्तिशाली वारसा मागे सोडला आहे, जो पिढ्यान्पिढ्या लोकांना त्यांच्या जीवनावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि त्यांच्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्यास प्रेरित करतो. हे गाणे बॉन जोवी, नो डाउट आणि ग्वेन स्टेफनी यांच्यासह अनेक कलाकारांनी गायले आहे. हे गाणे अनेक चित्रपट आणि टीव्ही कार्यक्रमांमध्ये देखील वापरले गेले आहे, १९९० च्या दशकातील एक प्रतिष्ठित गाणे म्हणून त्याचे स्थान आणखी मजबूत केले आहे.

आपण खरोखर हे गाणे अजून ही ऐकले नसेल तर यु ट्यूब किंवा इतर कुठल्याही म्युझिक ऍप वर "Dr. Alban's... It's My Life Song" शोधा आणि मिळवा एक निखळ आनंद आपले आयुष्य जगण्याचा...

**After all It's my life...**

******

## भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र जागतिक महिला दिन उत्साहात संपन्न

भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र, दीपनगर येथे ८ मार्च २०२४ 'जागतिक महिला दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. भुसावळ औ.वि. केंद्रातील महिला कर्मचारी यांच्यासह वसाहतीतील महिलांचा सहभाग घेवून कार्यकमाची आखणी करण्यासाठी १ मार्च २०२४ रोजी १×६६० मेगावॅट प्रकल्प कार्यालय, भुसावळ येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. तसेच आयोजन समिती गठीत करुन विविध कार्यकमांची आखणी करण्यात आली.

**८ मार्च २०२४ जागतिक महिला दिन** –

८ मार्च २०२४ जागतिक महिला दिनानिमित्त मुख्य अभियंता श्री. मोहन आव्हाड यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्य अभियंता (प्रकल्प स्थापत्य) श्री. मनोहरराव तायडे, उपमुख्य अभियंता (प्रकल्प) श्री. संतोष वकारे व सर्व अधिकारी व विभागप्रमुख उपस्थित होते.

यावप्रसंगी मुख्य अभियंता श्री. मोहन आव्हाड यांनी स्त्रियांनी स्वत:ला ताणतणावातून मुक्त ठेवून कशा पध्दतीने काम करावे त्यादृष्टीने तर महानिर्मितीच्या यशामधे 'महिला कर्मचाऱ्यांचे योगदान' या विषयावर मार्गदर्शन केले. भुसावळ औ.वि. केंद्रातील महिला कर्मचारी व वसाहतीतील सर्व महिला यांच्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यकमाचे आयोजन, प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन, विशेष कामगिरीबद्दल महिला कर्मचारी यांचे सत्कार करण्यात आहे. तसेच मुख्य अतिथी ऍड. अनुराधा एल. वाणी, सहा. जिल्हा सरकारी वकील, जळगाव यांचे जागतिक महिला दिनानिमित्त मार्गदर्शन व व्याख्यान समावेश होता.

**महिला सक्षमीकरण व जनजागृती सायकल रॅली**–

"महिला सक्षमीकरण व जनजागृती सायकल रॅली" आयोजन करण्यात आले होते. मुख्य अभियंता श्री. मोहन आव्हाड यांनी झेंडा दाखवून रॅलीची सुरुवात करण्यात आली. तसेच सदर रॅलीप्रसंगी सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यामध्ये औ.वि. केंद्रातील सर्व महिला अधिकारी व कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. या रॅलीची सुरुवात ५०० मेगावॅट फॅक्टरी गेटपासून सुरु करण्यात आली. याप्रसंगी रॅलीची सुरुवात झाल्यावर महिलांनी चौकाचौकात 'बंदिनी' पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले तसेच खालीलप्रमाणे विविध घोषवाक्य म्हणून सायकल रॅलीत मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

"डोळ्यात येवू देवू नको पाणी, तु आहेस लढणारी झाशीची राणी",

"नही सहना है अब किसी का अत्याचार, महिला सशक्तिकरण का यही है मुख्य विचार"

"सोडून द्या वाईट चालीरीती, महिलांना द्या शिक्षणाची गती"

सदर कार्यक्रमास महिला कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होवून कार्यक्रम यशस्वीरित्या खेळीमेळीने पार पाडला, जागतिक महिला दिनानिमित्त विभागप्रमुख व संघटना प्रमुख यांनी शुभेच्छा पाठविल्या.

## मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांची भुसावळ प्रकल्पाला भेट

महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ. पी. अन्बलगन यांनी भुसावळ प्रकल्प स्थळी पाहणी करून प्रगतीपर कामांचा आढावा घेतला आणि महानिर्मिती, मेसर्स. भेल आणि संबंधित अधिकाऱ्यांशी बैठक घेऊन प्रकल्प कामांना अधिक वेग देण्याचे निर्देश दिले. सदर दौऱ्यावेळी संचालक (संचलन) मा. श्री. संजय मारूडकर, संचालक (प्रकल्प) मा. श्री. अभय हरणे, मे. भेल कंपनीचे महाव्यवस्थापक (PS-BG) श्री. सुदिप्त अग्रवाल, श्री. एस. के. रॉय, श्री. दिनेश जवादे तसेच १×६६० मेगावॅट प्रकल्पाचे मुख्य अभियंता श्री. मोहन आव्हाड व मुख्य अभियंता (प्रकल्प व्यवस्थापन समूह) सौ. विजया बोरकर आदि उपस्थित होते.

याप्रसंगी उप मुख्य अभियंते श्री. रविंद्र सोनकुसरे, श्री. संतोष वकारे, श्री. मनोहर तायडे, अधीक्षक अभियंते सर्वश्री. किशोर शिरभैय्ये, मनिष बेडेकर, योगेश इंगळे, नितीन कांबळे, संतोष दगडे, प्रामुख्याने उपस्थित होते.

## भाटघर जलविद्युत केंद्र वसाहत येथे महिला दिन उत्साहात संपन्न

भाटघर विद्युत केंद्र व भाटघर विभागीय कार्यालय यांचे वतीने १९ मार्च २०२४ रोजी महिला दिन अधीक्षक अभियंता (नवीकरणीय ऊर्जा), पुणे यांचे अध्यक्षतेखाली उत्साहात साजरा करण्यात आला. महिला दिन निमित्ताने विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले,

श्री. संजयकुमार सूर्यकांत भागवत, अधीक्षक अभियंता, नवीकरणीय ऊर्जा मंडळ, पुणे तसेच महिला, अधिकारी व कर्मचारी यांचे उपस्थित वृक्षारोपणाने कार्यक्रमाचे उद्घाटन व श्री. भागवत यांचे हस्ते दीप प्रज्वलन व सरस्वती पुजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सौ. सोनाली चव्हाण यांनी केले. महिलांनी आपल्या कुटुंबाची काळजी घेत असताना स्वत:ची काळजी घेणे गरजेचे आहे, असे अध्यक्षांनी मार्गदर्शन करताना सांगितले, महिला दिनानिमित्त महिला, मुले व कुटुंबातील इतर सदस्य यांचेसाठी आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले असल्याने सर्वांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

आरोग्य तपासणी शिबीर भारती विद्यापीठ आयुर्वेद हॉस्पिटल, पुणे व भोर आरोग्य विभाग यांचे तर्फे आयोजित करण्यात आले, यामध्ये रक्त तपासणी, डोळे तपासणी व इतर काही तपासण्या मोफत करण्यात आल्या. महिलांसाठी स्वतंत्र स्त्रीरोग तज्ञांकडून आरोग्य तपासणी व मार्गदर्शन घेण्यात आले.

सौ. शीतल कदम यांनी महिला दिनाच्या निमित्ताने आलेल्या सर्वांचे आभार व्यक्त केले, तसेच भोर आरोग्य विभागाचे आरोग्य अधिकारी डॉ. ओम पाटील यांनी शिबीर आयोजित करण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी भाटघर विभागीय कार्यालयाचे कार्यकारी अभियंता श्री. अरविंद कोटी, भाटघर जल विद्युत केंद्राचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. ज्ञानेश्वर डोंगरे व भाटघर विभागीय कार्यालय तसेच भाटघर जल विद्युत केंद्र येथील सर्व कर्मचारी अधिकारी उपस्थित होते.

## पारस औष्णिक विद्युत केंद्रात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे महिला कर्मचारी यांची संयुक्त समिती गठीत करून जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. या समितीमध्ये अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता श्री. शरद भगत होते तर सचिव पदी उपकार्यकारी अभियंता श्वेता पाटील होते. तसेच, श्री. धनंजय पंधाडे (अधीक्षक अभियंता) व श्री. राजेश गट्टूवार (अधीक्षक अभियंता, प्रभारी) उपस्थित होते.

जागतिक महिला दिनानिमित्त गठीत समितीद्वारे ७ – ८ मार्च २०२४ या दरम्यान विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये महिलांचे अंताक्षरी स्पर्धा, संगीत खुर्ची, फॅशन शो व नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ८ मार्च २०२४ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व राष्ट्रमाता जिजाऊ यांना अभिवादन करून विविध महिला कर्मचाऱ्यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच उपमुख्य अभियंता श्री. राजेश चव्हाण ह्यांनी महिला दिनाच्या शुभेच्छापर मार्गदर्शन केले व तद्नंतर, डॉ. अश्विनी मालविया, मानसशास्त्रज्ञ अकोला यांचे 'स्त्रियांनी दैनंदिन जीवनात कसे तणावमुक्त रहावे' विषयी मार्गदर्शन महिलांकरीता आयोजित करण्यात आले.

महानिर्मिती कंपनीच्या परिपत्रकानुसार महिलांच्या विशेष कार्याबद्दल गौरव करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुषंगाने, मीना शेंडे (तंत्रज्ञ–३) यांना बाह्यगृह क्रीडा स्पर्धा थाली फेक मध्ये सुवर्ण व रौप्य पदक मिळाल्याबद्दल गौरविण्यात आले. तसेच ज्या महिला कर्मचारी सेवानिवृत्त होणार आहे, त्यांना पुष्पगुच्छ व भेटवस्तु देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

१० मार्च २०२४ रोजी महिला कर्मचाऱ्यांकरिता सहल आयोजित करण्यात आली. ज्यामध्ये महिला कर्मचाऱ्यांनी सहभाग घेऊन जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात पार पाडला.

सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रियंका दुकर व आभार प्रदर्शन जयश्री इंगळे यांनी केले.

## महानिर्मितीच्या सांघिक कार्यालयात पर्यावरण दिनानिमित्त निसर्ग छायाचित्रांचे प्रदर्शन व वृक्षारोपण

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महानिर्मितीच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी काढलेल्या निसर्ग छायाचित्रांचे प्रदर्शन सांघिक कार्यालय, मुंबई येथे लावण्यात आले. यात जंगली प्राणी, पक्षी, निसर्ग यांच्या आकर्षक छायाचित्रांचा समावेश होता. तसेच उत्तरकाशी येथे सुमारे १० ते १५ हजार फुटांवर ट्रेकिंग करून यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या मोहिमेच्या छायाचित्रांचे सुद्धा प्रदर्शन लावण्यात आले होते.

यामध्ये प्रामुख्याने श्री. मंजुनाथ बागडे (प्रकल्प नियोजन, मुंबई), श्री. विक्रांत ओक (चंद्रपूर), श्री. लक्ष्मीकांत नेवे (भुसावळ), श्री. मकरंद परदेशी (चंद्रपूर), श्री. विश्वास उगले (चंद्रपूर) यांच्या सहभागातून छायाचित्र प्रदर्शन अधिक प्रभावी झाले. श्री. मंजुनाथ बागडे आणि श्री. सुशांत पाटील यांनी निसर्ग छायाचित्रे व ट्रेकिंगचा अनुभव कथन करून उपस्थितांची वाहवा मिळवली.

पर्यावरण दिनाच्या निमित्ताने मान्यवरांच्या हस्ते प्रकाशगड मुख्यालय परिसरात वृक्षारोपण देखील करण्यात आले तसेच कागदांपासून तयार केलेले पेन आणि झाडांच्या बियांसह अभिनव ग्रीटिंग कार्ड सर्व मान्यवरांना देण्यात आले.

याप्रसंगी बोलताना संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारुडकर म्हणाले की, "पर्यावरणीय चळवळ ही एक दिवसापुरता मर्यादित न ठेवता वर्षभर त्यावर काम व्हायला हवे, त्यासाठी लोकसहभाग वाढविणे गरजेचे आहे". तर संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे यांनी पर्यावरण उपक्रमाची मुक्तकंठाने प्रशंसा केली. याप्रसंगी पर्यावरणीय शपथ प्रत्येकाने घेऊन पर्यावरणाशी कटीबद्ध राहण्याचा संकल्प केला.

सदर प्रसंगी महानिर्मितीचे कार्यकारी संचालक (पर्यावरण व सुरक्षा, गरे पालमा-२) डॉ. नितीन वाघ, कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था - १) श्री. राजेश पाटील, कार्यकारी संचालक (सांघिक नियोजन व सुसंवाद) श्री. पंकज नागदेवते, कार्यकारी संचालक (प्रकल्प) श्री. विवेक रोकडे, मुख्य अभियंता (पर्यावरण व सुरक्षा) श्री. शशांक चव्हाण, मुख्य अभियंता (स्थापत्य-३) श्री. चंद्रशेखर होळंबे, मुख्य महाव्यवस्थापक (मासं) श्री. आनंद कोंत, मुख्य विधी सल्लागार श्री. सुमंत कोल्हे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. पुरुषोत्तम वारजुरकर तसेच पर्यावरण व सुरक्षितता कक्षाचे अधिकारी-कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सहाय्यक जनसंपर्क अधिकारी श्री. संतोष पुरोहित यांनी केले.

## नाशिक प्रशिक्षण केंद्र एकलहरे येथे जागतिक पर्यावरण दिन साजरा

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून दि. ५ जून २०२४ रोजी मुख्य अभियंता श्री. सुनील सोनपेठकर यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिक प्रशिक्षण केंद्र, एकलहरे येथे कार्यालयीन वास्तू व प्रशिक्षणार्थी वसतिगृह परिसरात प्रशिक्षण केंद्राचे अधिकारी, कर्मचारी, एन-७१ए , एन - ७२ आणि एन -७३ बॅचच्या प्रशिक्षणार्थी अभियंत्यांच्या हातून वृक्षारोपण करण्यात आले.

याप्रसंगी महानिर्मितीचे मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांच्या, पर्यावरणपूरक वीज निर्मिती करतांना पर्यावरणाचे संवर्धन, तसेच हरित व स्वच्छ विजेची महानिर्मितीची दीर्घकालीन बांधिलकी आणि सन २०५० पर्यंत कार्बन उत्सर्जन पातळी शून्य (नेट झिरो), संकल्पाचा अधीक्षक अभियंता सौ. गीतांजली पारखी, कार्यकारी अभियंता श्री. जयंत देवरे यांच्या उपस्थितीत पुर्ननिश्चय करण्यात आला.

प्रशिक्षणार्थी अभियंत्यांनी या उपक्रमात हिरिरीने भाग घेत श्रमदानातून खड्डे खोदून विविध फळझाडे, औषधी वनस्पती व सावली देण्ग्रया भारतीय जातीच्या १२० वृक्षांचे रोपण केले.

'प्रकृती रक्षिती रक्षत:' पर्यावरणाचे रक्षण म्हणजेच आपले रक्षण हा संदेशही या वृक्षारोपणाच्या माध्यमातून देण्यात आला.

या कार्यक्रमास श्री. संजय दराडे, श्री. प्रविण कहाळे, सौ.स्वाती मुरतडक, सौ. विजयालक्ष्मी आगरकर, माधवी सातभाई, श्री. संदीप पंडीत, श्री. संग्राम कोरडे, मंजूषा स्वर्गे उपस्थित होते.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कोराडी प्रशिक्षण केंद्र परिसरात वृक्षारोपण

कोराडी प्रशिक्षण केंद्र, कोराडी येथे जागतिक पर्यावरण दिनाचे निमित्ताने वृक्षारोपणाचा उपक्रम मुख्य अभियंता (प्रशिक्षण) श्री. सुनील सोनपेठकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. यामध्ये प्रशिक्षण केंद्र परिसरात पर्यावरणीय उपयोगी अश्या विविध वृक्षांचे रोपण रस्त्याच्या दुतर्फा करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत गुलमोहोर, कडुलिंब, जारूळ, बोंद्रा, कन्हेर, गंगारावी इत्यादी १०५ वृक्षांची लागवड करण्यात आली. हा उपक्रम प्रशिक्षण केंद्रातील अधिकारी, कर्मचारी तसेच १३६ प्रशिक्षणार्थी यांच्या हस्ते उत्साहाने यशस्वीरित्या संपन्न झाला. सदर कार्यक्रमास अधीक्षक अभियंता भारती विजयकर, अरुणा भेंडेकर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच, कार्यकारी अभियंता विद्या बाकडे, अर्चना नाईक, श्री. निलेश वानखेडे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. बाळु रत्नपारखी, श्रध्दा सुके, उप. कार्यकारी अभियंता श्री. प्रशांत धांदे, कुमुद चौधरी, हर्षदा धोंडरीकर, सहा. प्रोग्रामर श्री. विपीन दुबे इत्यादिंनी उपरोक्त वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न करण्यात मोलाची भूमिका बजावली.

## कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात जागतिक महिला दिन संपन्न

कोराडी औष्णिक विद्युत केंद्र, सेवा इमारत ६६० मेगावॅट सभागृहामध्ये १३ मार्च २०२४ रोजी मा. मुख्य अभियंता श्री. विलास मोटघरे यांच्या अध्यक्षतेखाली जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रारंभी मुख्य अभियंता श्री. विलास मोटघरे यांच्या हस्ते भारताच्या प्रथम मुख्याध्यापिका सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले तसेच प्रमुख अतिथी डॉ. हेमा देशपांडे आणि विशेष अतिथी डॉ. रमणी मोटघरे यांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

याप्रसंगी जागतिक महिला समितीच्या अध्यक्षा सौ. किरण नानवटकर यांनी कार्यक्रमाने प्रास्ताविक सादर केले. जागतिक महिला दिनाच्या प्रमुख अतिथि डॉ. रमणी मोटघरे (प्रो. केमिस्ट्री विभाग, व्ही.एन.आय.टी. कॉलेज, नागपूर) यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले, त्या म्हणाल्या की, "स्त्री ही कुटूंब व्यवस्थेचा पाया आहे. पाया मजबुत असला तर ईमारत मजबूत राहते. स्त्रियांना कुटुंबामध्ये वेगवेगळ्या भुमिका निभवाव्या लागतात". विषेश अतिथी डॉ. हेमा देशपांडे (प्रादेशिक अधिकारी), यांनी मनोगत व्यक्त करतांना म्हणाल्या की, "विद्युत निर्मितीमध्ये महिलांचा सिंहाचा वाटा आहे. भारतीय संविधानाने महिलांना अधिकार दिलेत, परंतु आपण ज्या ठिकाणी काम करतो त्याठिकाणी आपल्याला सर्व सुविधा मिळतात काय? आपले प्रश्न, अडचणी आपण मांडल्या पाहिजेत". तसेच महानिर्मिती कंपनीतील इतर महिलांनीसुद्धा आपले विचार मांडलेत. ज्यामध्ये सौ. दिप्ती मेश्राम (अतिरिक्त कार्यकारी अभियंता), सौ. माधवी जांभुळकर (अतिरिक्त कार्यकारी अभियंता), सौ. सारिका सोनटक्के (अधीक्षक अभियंता) यांचा समावेश होता. अध्यक्षीय भाषणांतून मुख्य अभियंता श्री. मोटघरे म्हणाले की, "महानिर्मिती कंपनीने महिलांवर गुंतवणुक केली असून विविध पदांवर महिलांची नियुक्ती केली आहे. कोराडी औष्णिक विद्युत केंद्रामध्ये एकुण ७५० महिला कार्यरत असून लवकरच मुख्य अभियंता या पदावर सुद्धा महिला विराजमान होतील.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून कोराडी औष्णिक विद्युत केंद्राच्या वसाहतीत मोफत महिला आरोग्य तपासणी व तज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. तसेच महानिर्मिती कंपनीमध्ये महिला अधिकारी/कर्मचारी यांनी उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्यांना प्रमाणपत्र आणि शिल्ड्स देऊन गौरविण्यात आले. महानिर्मिती कंपनीच्या विद्युत केंद्रात कार्यरत महिला अभियंता/तंत्रज्ञ, पाळीमध्ये काम करतात अशा महिलांचा सुद्धा प्रमाणपत्र आणि शिल्ड्स देऊन सत्कार करण्यात आला, तसेच श्री. दिवाकर देशमुख यांनी महिलांना बाल संगोपन रजा, सरोगसी रजा, विकलांग अपत्याकरिता ७३० दिवसांनी रजा, इ. उपयुक्त अशी संपूर्ण रजेची माहिती दिली.

याप्रसंगी मुख्य अभियंता श्री. विलास मोटघरे, श्री. शैलेंद्र कासुलकर (उप मुख्य अभियंता), श्री. भास्कर इंगळे (उप मुख्य अभियंता प्रभारी), श्री. सचिन भागेवार (अधीक्षक अभियंता), श्री. चंद्रमणी (अधीक्षक अभियंता), श्री. प्रविण बुटे (उप कार्यकारी अभियंता), श्री. दिवाकर देशमुख्य (वरिष्ठ व्यवस्थापक) यांची विशेष उपस्थिती होती.

जागतिक महिला दिनाच्या यशस्वीतेकरिता सौ. जयश्री दहीभाते (अतिरिक्त कार्यकारी अभियंता), सौ. रिमा गिरी (वरिष्ठ रसायनशास्त्रज्ञ), सौ. मिता वडतकर (अतिरिक्त कार्यकारी अभियंता), सौ. माधवी जांभुळकर (उप कार्यकारी अभियंता), श्रीमती. शितल चिंनुरकर (उच्चस्तर लिपिक) यांनी अथक परिश्रम घेतले.

तसेच महानिर्मिती कंपनीचे महिला अधिकारी/कर्मचारी यांनी उपरोक्त कार्यक्रमाचा लाभ घेतला. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सौ. नेहा फुके (सहाय्यक अभियंता) आणि सुश्री. सपना गावंडे (सहाय्यक अभियंता) तर आभार प्रदर्शन मृणाली झाडे (सहाय्यक अभियंता) यांनी केले.

## परळी औष्णिक विद्युत केंद्रात जागतिक महिला दिन उत्साहात

परळी औष्णिक विद्युत केंद्रात ८ मार्च जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून परळी औष्णिक विद्युत केंद्रात महिलांकरिता विविध कार्यक्रम तसेच क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्यादरम्यान कर्मचारी महिला विरुद्ध वसाहतीतील महिला यांच्यात मनोरंजनात्मक क्रिकेट सामना, संगीत खुर्ची, लिंबू चमचा, बुद्धिबळ, कॅरम, बॅडमिंटन, गायन, डान्स स्पर्धा तसेच सामाजिक कार्य करणाऱ्या महिलांवर आधारित वेशभूषा, स्त्रीवर आधारित काव्य सादरीकरण व सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.

तसेच महिला आरोग्य तपासणी शिबीर व तज्ञांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात आले याप्रसंगी डॉ. सुनीता झंवर, स्त्री रोग तज्ञ यांनी 'गर्भाशय कॅन्सर' व आहार तज्ञ डॉ. मीरा लाहोटी डेंटिस्ट ॲड डायटिशियन यांनी 'डेंटिस्ट आहार' संदर्भात माहिती व डेंटल चेक अप करण्यात आले.

मुख्य अभियंता श्री. अनिल कठोये यांच्या अध्यक्षतेखाली ८ मार्च २०२४ रोजी मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमात परळी औष्णिक विद्युत केंद्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला व त्यानंतर विविध स्पर्धेतील विजयी महिलांना बक्षिस देऊन सत्कार करण्यात आला. तसेच प्रमुख अतिथी प्रा.डॉ. अर्चना रामचंद्र चव्हाण यांनी महिलांना मार्गदर्शन केले व मुख्य अभियंता श्री. अनिल काठोये यांनी महिला दिनानिमित शुभेच्छा देऊन अध्यक्षीय समारोप केला.

सदर कार्यक्रमास उप मुख्य अभियंता श्री. अमित बनकर, प्र. उपमुख्य अभियंता श्री. एच. के. अवचार, अधीक्षक अभियंता श्री.एस.एन. बुक्तारे, श्री.पी.बी. गरुड, श्री.डी.डी. कोकाटे, श्री.आर.पी. रेड्डी, वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) श्री.वी.आर. अंबाड, सहा. कल्याण अधिकारी श्री. शरद राठोड तसेच इतर अधिकारी/ कर्मचारी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोराडी औष्णिक विद्युत केंद्र येथे जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा

कोराडी औष्णिक विद्युत केंद्रामध्ये जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले त्यामध्ये २ जून रोजी मुलांकरिता चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. मुलांनी अतिशय उत्साहाने या स्पर्धेमध्ये भाग घेतला आणि पर्यावरण विषयक विषयावर खूप छान–छान चित्र काढले आणि रंगवले. चित्रकला स्पर्धेचे आयोजन एकूण तीन गटांमध्ये करण्यात आले. नर्सरी ते वर्ग बारापर्यंत हे गट होते.

३ ते ४ जून या दरम्यान पर्यावरण विषयावर निबंध स्पर्धा घोषवाक्य स्पर्धा घेण्यात आली यामध्ये सुद्धा स्पर्धकांनी भरघोस प्रतिसाद दिला.

५ जून रोजी सकाळी आठ वाजता कोराडी औष्णिक विद्युत केंद्र च्या आवारामध्ये पथनाट्याचे सादरीकरण झाले औष्णिक वीज केंद्राच्या कर्मचाऱ्यांनी स्वत: नाटक लिहून बसवले आणि सादरीकरण केले. तद्नंतर वीज केंद्रामध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले.

मुख्य कार्यक्रमांमध्ये विविध स्पर्धेच्या स्पर्धकाना पारितोषिक वितरण करण्यात आले या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून भांडेवाडी प्रकल्पाचे संचालक डॉ. किशोर मालवीय हे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात श्री. सुरेश गणवीर कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यानंतर महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक माननीय मा.डॉ. पी. अन्बलगन यांच्या पर्यावरणपर संदेशाचे वाचन सौ. जयश्री जिरापुरे यांनी केले प्रमुख पाहुण्यांचा परिचय सौ. प्रियंका देशमुख यांनी करुन दिला.

प्रमुख पाहुण्यांनी अतिशय सखोल पद्धतीने पर्यावरण आणि मानवी जीवन याचा परस्पर संबंध आणि पर्यावरणाचा ऱ्हास इत्यादी विषयांवर आपले मनोगत मांडले. कार्यक्रमाला औष्णिक विद्युत केंद्र कोराडीचे मुख्य अभियंता श्री. विलास मोटघरे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते, तसेच औष्णिक विद्युत केंद्राचे उपमुख्य अभियंता श्री. शैलेन्द्र कासूलकर, प्रभारी उप मुख्य अभियंता श्री. भास्कर इंगळे, श्री. सचिन देगवेकर, तसेच अधीक्षक अभियंता सौ. सारिका सोनटक्के, किरण नानवटकर, कार्यकारी अभियंता, विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी कंत्राटी कामगार तसेच स्पर्धक मंडळी आणि त्यांचे पालक इत्यादींची उपस्थिती लाभली.

अध्यक्षीय भाषणामध्ये श्री. मोटघरे यांनी वृक्षारोपण आणि संगोपन याचे महत्त्व पटवून दिले आणि येणाऱ्या वर्षांमध्ये प्रत्येक विभागाने पन्नास झाडे लावण्याचे आणि जगविण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. रिमा गिरी यांनी केले तसेच आभार प्रदर्शन श्री. अक्षय राणे यांनी केले. श्री. गुलाम मोहसीन यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

## महानिर्मितीचे संचालक (संचलन) यांची भिरा अवजल विद्युत केंद्र आणि टाटा पॉवर भिरा जल विद्युत केंद्रास भेट

**आगामी काळात मुंबई ग्रीड साठी १५० मेगावॅट स्पिनिंग रिझर्व्ह आणि महानिर्मितीच्या भिरा केंद्रातून ८० मेगावॅट वीज उपलब्ध होणार.**

महानिर्मितीचे संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारुडकर यांनी २ जून २०२४ रोजी महानिर्मितीच्या भिरा अवजल विद्युत केंद्र (२×४० मेगावॅट) आणि टाटा पॉवरच्या भिरा (जिल्हा रायगड) जलविद्युत केंद्रास भेट दिली.

मे. टाटा पॉवर, भिरा येथे १५० मेगावॅटचा उदंचन प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी नोव्हेंबर २०२३ पासून 'गेटेड स्ट्रक्चर' उभारण्याचे काम चालू आहे. यासाठी महानिर्मितीने आपले २×४०= ८० मेगावॅट क्षमतेचे अवजल विद्युत केंद्र बंद ठेवून सहकार्य केले आहे. बोगद्याच्या तोंडाशी मोठे गेट उभारण्याचे काम अंतिम टप्यात आले असून महानिर्मितीचे भिरा अवजल विद्युत केंद्र देखील वीजनिर्मितीसाठी सज्ज झाले आहे या सर्व कामांची पाहणी मा. संचालक महोदयांनी केली.

भिरा विभागीय कार्यालय प्रमुख श्री. अशोक वालकोळी, कार्यकारी अभियंता यांनी मा. संचालक (संचलन) यांचे स्वागत केले. त्यानंतर टाटा पॉवर येथे श्री. अजय कोन्नूर प्रमुख, भिरा जल विद्युत केंद्र यांनी स्वागत केले.

सदर गेटचे काम पूर्ण झाल्यानंतर १५० मेगावॅटचा उदंचन प्रकल्प (Pumped storage Project) कार्यान्वित होईल व मुंबई ग्रीडसाठी १५० मेगावॅटचा 'स्पिनिंग रिझर्व' उपलब्ध होईल. हा संच उदंचन प्रणालीत काम करत असताना गेट बंद करण्यात येईल. त्यामुळे Pick-up dam मधील पाणी मुळशी धरणात (जि. पुणे) कडे परत जाईल. ज्यावेळी संच वीजनिर्मिती करेल त्यावेळी मुळशी धरणातील पाणी पिक–अप डॅममध्ये (निम्न जलाशय) जमा होईल व बोगद्यातून फोर–बे डॅममध्ये जाईल, ज्यावर परत महानिर्मितीच्या वीजकेंद्रातून ८० मेगावॅट इतकी वीजनिर्मिती होईल. या सर्व प्रक्रियेमध्ये महानिर्मितीच्या वीजनिर्मितीवर कोणताही प्रतिकूल परिणाम होणार नाही, याची विशेष दक्षता घेण्यात आली आहे.

मा. संचालक (संचलन) यांच्या उपस्थितीत गेट क्रमांक १ ची यशस्वी चाचणी घेण्यात आली. त्यांनी प्रथम मॉडेल रुमला भेट देऊन भौगोलिक रचना व प्रकल्प आराखड्याची माहिती घेतली. तसेच जुन्या ६×२५ मेगावॅटच्या प्रकल्पास व १५० मेगावॅटच्या उदंचन प्रकल्पास भेट देऊन माहिती घेतली. मे. टाटा पॉवर यांच्या अत्याधुनिक नियंत्रण कक्षास देखील भेट दिली.

त्यानंतर मा. संचालक महोदयांनी महानिर्मितीच्या भिरा जलविद्युत केंद्रास भेट देऊन शट–डाऊन काळात झालेल्या विविध कामांचा तपशीलवार आढावा घेतला.

## महानिर्मिती नॉलेज बँक (प्रश्नोत्तरे) डेस्कटॉप स्क्रीन सेव्हरवर

तत्कालीन महाराष्ट्र विद्युत मंडळात ६० ते ९० च्या दशकांत बहुतांश कामे हाताने (मॅन्युएल) पद्धतीने करण्यात येत होती. वीज क्षेत्रात खूप स्पर्धा नसल्याने तो सुवर्णकाळ होता, आपली मक्तेदारी होती. २१व्या शतकापासून जसे २००३ मध्ये वीज कायदा, खाजगी वीज स्पर्धा वाढू लागली तशी, वीज नियामक आयोग आणि पर्यावरणीय निकष/बंधने वाढली, सातत्याने कठोर होत गेली आणि सन २००५ मध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे त्रिभाजन होऊन महानिर्मिती, महावितरण, महापारेषण कंपन्यांची स्थापना झाली. तेव्हापासून आर्थिक शिस्त, कॉस्ट सेंटर यावर विशेष लक्ष देण्यात येत होते. एकूणच महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात सुमारे १० मेगावॅट स्थापित क्षमतेपासून सुरू झालेला प्रवास ३० मेगावॅट, ६२ मेगावॅट, १२० मेगावॅट, २१० मेगावॅट, २५० मेगावॅट, ५०० मेगावॅट आणि ६६० मेगावॅट पर्यंत येऊन पोहोचला. सबक्रिटिकलकडून सुपरक्रिटिकल तंत्रज्ञानाकडे प्रगती, संगणकामुळे ऑटोमेशन, कामात सोयीसुविधा गतिमानता डिजिटल तंत्रज्ञानातील प्रगती आणि आता आर्टिफिशियल इंटिलीजन्स, मशीन लर्निंग, चॅट जीपीटी, जेमिनी सारखी अत्याधुनिक आयुधे आल्याने झपाट्याने बदलते ऊर्जा क्षेत्रातील तंत्रज्ञान, निकष, बाजारातील वाढती स्पर्धा यांचा विचार केल्यास महानिर्मितीचे मनुष्यबळ देखील या सर्व आव्हानांचा सामना करण्यासाठी सक्षम/समर्थ असले पाहिजे. कारण तांत्रिकदृष्ट्या कुशल, अनुभवी मनुष्यबळ हीच महानिर्मितीची खरी संपत्ती आहे आणि या संपत्तीला अधिक मौल्यवान करण्यासाठी नियमित प्रशिक्षण, वीज क्षेत्रातील दैनंदिन कामांची अद्ययावत माहिती, तांत्रिक ज्ञान परिपूर्ण असणे गरजेचे आहे.

त्यादृष्टीने दि. १ जून पासून "महानिर्मिती नॉलेज बँक" हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. महानिर्मितीच्या राज्यभरातील कार्यालयात डेस्क टॉप स्क्रीन सेव्हरवर दररोज दोन प्रश्न प्रदर्शित करण्यात येत आहे. त्या दोन्ही प्रश्नांची उत्तरे दुसऱ्या दिवशी आपल्या डेस्क टॉपवर दिसतात. अशा पद्धतीने ज्ञानवर्धनाचा हा अभिनव उपक्रम सुरू करण्यात आला आहे, त्याचा सकारात्मक स्वीकार करावा आणि महानिर्मितीच्या शाश्वत विकासात आपला सहभाग, योगदान वाढवावे हीच अपेक्षा.

## चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र येथे जागतिक पर्यावरण दिवस साजरा<br>"भूमी पुनर्संचय आणि वाळवंटीकरण" साठी जागरूकता कार्यक्रम

दरवर्षी ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिवस साजरा करण्यात येतो. पर्यावरणबाबत लोकांमध्ये जागरुकता निर्माण व्हावी यासाठी या दिवसाचे महत्व आहे. मनुष्य आणि पर्यावरण यांचे अतुट नाते आहे. युनायटेड नेशन्स एन्व्हायर्न्मेंट प्रोग्राम (UNEP) च्या नेतृत्वाखाली १९७३ पासून दरवर्षी आयोजित केले जाणारे, हे पर्यावरणीय प्रसारासाठी सर्वात मोठे जागतिक विचारपीठ आहे. जगभरातील लाखो लोक हा दिवस उत्साहाने साजरा करतात. या वर्षी जागतिक पर्यावरण दिवस – २०२४ ची थीम "जमीन पुनर्संचयित करणे, वाळवंटीकरण आणि दुष्काळ प्रतिबंध (Land restoration, desertification and drought resilience) अशी आहे. ज्यामध्ये जमीन पुनर्संचयित करणे, वाळवंटीकरण आणि दुष्काळ प्रतिकारशक्ती यावर लक्ष केंद्रित केले जाईल. भूमी जिर्णोद्धार हा पर्यावरणाच्या पुनर्संचयनावर (२०२१–२०३०) दशकाचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे, जो जगभरातील परिसंस्थाचे संरक्षण आणि पुनरुज्जीवन करण्यासाठी एक मोठा आवाज आहे आणि शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.

पर्यावरण दिनानिमित्त नागरिकांमध्ये व विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणबद्दल जागरूकता निर्माण व्हावी या हेतूने ४ जून रोजी ऊर्जानगर वसाहतीतील अधिकारी मनोरंजन केंद्र सभागृह येथे 'पर्यावरण' या विषयावर चित्रकला स्पर्धा आणि घोषवाक्ये स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धांमध्ये ऊर्जानगर वसाहतीतील नागरिकांनी उत्स्फूर्तपणे भाग घेऊन भरपूर प्रतिसाद दिला.

यावर्षी ५ जून रोजी चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर यांनी संयुक्तिकपणे जागतिक पर्यावरण दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला. हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड यांनी देखील कंपनीच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त मोठ्या उत्साहाने सहभाग घेऊन तसेच चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण दिवस साजरा केला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र परिसरातील ग्रीट फिल्टर येथील "बायोडायव्हरसिटी ऑर्चार्ड (BIODIVERSITY ORCHARD)" येथे चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता श्री. गिरीश कुमरवार यांनी केले. चंद्रपूर महाऔ. वि. केंद्राचे मुख्य अभियंता श्री. गिरीश कुमरवार, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उप प्रादेशिक अधिकारी श्री. उमाशंकर भादुले, हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडचे उप महाव्यवस्थापक श्री. नवीन कुमार व श्री. प्रशांत पराते, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलचे डेप्युटी कमांडंट श्री. गिरिषण. पी, जलबिरादरी स्वयंसेवी संस्थेचे सदस्य श्री. संजय वैद्य यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

तसेच हा कार्यक्रम चंद्रपूर महाऔ. वि. केंद्राचे उपमुख्य अभियंता डॉ. भूषण शिंदे, श्री. प्रफुल्ल कुटेमाटे, श्री. अनिल पुनसे (प्रभारी), श्री. अशोक उमरे (प्रभारी), वित्त आणि खाते विभागाचे महाव्यवस्थापक श्री. बाहुबली डोडल, मानव संसाधन विभागाचे महाव्यवस्थापक श्री. नंदकिशोर चन्ने, अधीक्षक अभियंता श्री. पद्माकर कामतकर, श्री. मिलिंद रामटेके, श्री. विष्णु ढगे, श्रीमती. झीनत पठाण, वैद्यकीय अधिकारी डॉ. संगीता बोधलकर, अग्निशमन अधिकारी श्री. ज्ञानेश्वर ठोमने, कल्याण अधिकारी श्री. दिलीप वंजारी, सुरक्षा अधिकारी श्री. गोंगले कार्यकारी अभियंता श्री. विनोद उरकुडे; महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे क्षेत्र अधिकारी श्री. सुरेन्द्र कारनकर यांच्या उपस्थितीत यशस्वीपणे पार पडला.

या प्रसंगी चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रात शाश्वत विकासाच्या दिशेने वेळोवेळी केलेल्या विविध उपाययोजना तसेच भविष्यातही पर्यावरणपूरक वीज निर्मिती करण्यासाठी चंद्रपूर महाऔ. वि. केंद्र सतत कार्यरत राहील असे संबोधन मुख्य अभियंता श्री. गिरीश कुमरवार यांनी केले.

तसेच या कार्यक्रमास कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ डॉ. विजय येऊल, अतिरिक्त कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ सौ. माया डफाडे, श्री. पुरुषोत्तम पडघन, श्री. विनोद कंगाली, उपकार्यकारी रसायनशास्त्रज्ञ श्री. लीलाधर नागपुरे, सौ. स्नेहल पाटील, सहाय्यक रसायनशास्त्रज्ञ श्री. विकास परतेकी, डॉ. अंकुश कुलरकर, सौ. मुग्धा डोंगरे, कनिष्ठ रसायनशास्त्रज्ञ कु. मीनल जाधव व तंत्रज्ञ, श्री. ए. बी. राजूरकर, श्री. जी.आर. नवले, श्री.अब्दुल शेख , श्री. बी.एस. येवले, यांचे सहयोग लाभले.

## कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात, कार्यक्षम ऊर्जा निर्मितीसाठी, ताणतणाव व्यवस्थापन आणि प्रेरणादायी प्रशिक्षण

कोराडी औष्णिक विद्युत केंद्र ३×६६० मे.वॅ. येथे मोटीवेशन प्रोग्राम फॉर एफिशीएंट पॉवर जनेरेशन (Motivation Programme for Efficient Power Generation) या शिर्षका अंतर्गत प्रेरणादायी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. तज्ज्ञ प्रशिक्षक, प्रसिद्ध नॉन क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट, वरिष्ठ पत्रकार आणि प्रभावी चरित्रकार, डॉ. पी.आर. सूबास चंद्रन यांनी प्रस्तुत विषयावर मार्गदर्शन केले.

कोराडी औष्णिक विद्युत केंद्र येथे कॉन्फरन्स सभागृहात आयोजित या कार्यक्रमाला सर्व वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा भरघोस प्रतिसाद लाभला. महानिर्मितीच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या परिसंवादात जवळपास १५० पेक्षा जास्त अधिकारी–कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला.

ऊर्जा निर्मिती सारख्या अविरत चालणाऱ्या तणावपूर्ण वातावरणात काम करून कंपनीची उद्दिष्टे आणि ध्येये गाठण्याचा सातत्याने पाठपुरावा करण्यासाठी प्रेरित करणारा हा उपक्रम उपस्थितांना मनापासून आवडला.

ताण–तणाव व्यवस्थापन या महत्वाच्या विषयास अनुसरून, संगणकीय सादरीकरण, मुद्यावर आधारित व्हिडिओ क्लिप्स, सहभागी सभासदांशी प्रत्यक्ष संवाद, प्रश्नोत्तरे याद्वारे संपूर्ण कार्यक्रमात डॉ. चंद्रन यांनी प्रत्येकास सहभागी करुन ताण–तणाव व्यवस्थापनाचे मूलभूत तंत्र अत्यंत सोप्या भाषेत विषद केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मुख्य अभियंता (कोराडी औ.वि. केंद्र) श्री. विलास मोटघरे यांनी भूषविले. कार्यक्रमाला मुख्य अभियंता (सौर) श्री. राजेशकुमार ओसवाल, प्रभारी मुख्य अभियंता (बांधकाम) श्री. अरुण पेटकर, उप मुख्य अभियंता कोराडी श्री. शैलेन्द्र कासुलकर, प्रभारी उप मुख्य अभियंता श्री. भास्कर इंगळे, तसेच कोराडी आणि खापरखेडा वीज केंद्र, कोराडी प्रशिक्षण केंद्र, बांधकाम, कोराडी प्रकल्प, सौर आणि कोराडी स्थापत्य –२ येथील अधीक्षक अभियंते, श्री नितिन रोकडे, श्री. परिमल रामटेके, श्री. कुंदन जाधव, श्री. कुणाल घाटे, श्री. सचिन भगेवार, सौ. सारीका सोनटक्के, सौ. किरण नानवटकर, श्री. संजय तायडे, श्री. शिरीष वितोंडे, श्री. विजय काळे, श्री. संजय पखाण, श्री. विश्वास सोमकुंवर, विलासकुमार ऊके, सौ. भारती विजयकर, प्रभारी उप महाव्यवस्थापक (मासं) श्री. अतुल बोरकर, कार्यकारी अभियंते, विभाग प्रमुख, अभियंते, अधिकारी, कर्मचारी आणि महिला अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणामध्ये श्री. विलास मोटघरे यांनी वीज निर्मितीचे उद्दिष्टे गाठतांना अधिकारी कर्मचारी यांचेसाठी, अश्या प्रकारच्या प्रेरणादायी प्रशिक्षण कार्यक्रमाचे महत्व आणि उपयोगिता विषद केली आणि त्याअनुषंगाने महानिर्मितीच्या कार्यक्षमता वाढीसाठी सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन सातत्यपूर्ण कार्य करण्याची अपेक्षा व्यक्त केली. समारोपीय कार्यक्रमात श्री. राजेशकुमार ओसवाल यांनी प्रशिक्षणातील प्रेरणादायी विचार आणि तणाव व्यवस्थापनाच्या सूचनांचे दैनंदिन जीवनात नियमितपणे आचरण केल्यास महानिर्मितीची यशस्वीपणे वाटचाल करण्याकरिता उपयुक्त ठरेल अशी आशा व्यक्त केली. या कार्यक्रमासाठी, कोराडी प्रशिक्षण केंद्राचे मुख्य अभियंता श्री. सुनील सोनपेठकर आणि खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता श्री. विजय राठोड यांचे या कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे समन्वयक, श्री. प्रवीण बुटे यांनी सूत्रसंचलन आणि आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी, समन्वय विभाग, प्रशिक्षण विभाग, ओ.एस. विभाग, माहिती व तंत्रज्ञान विभाग आणि संबंधित विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले, सर्व उपस्थितांनी प्रशिक्षणाचे आयोजनाबाबत समाधान व्यक्त केले.

## Vacation Training for Engineering Students organized at CSTPS

Summer 2024, Vacation training Batch conducted under the guidance of Chief Engineer CSTPS, Shri. Girish Kumarwar.

Dy. Chief Engineer (Admin) CSTPS, Dr. Bhushan Shinde was present as the President, while Shri. Narendra Rahate, (Training Coordinator) and Shri. Ghanshyam Kamadi (AE), were present as the Special Guest on the inaugural function.

Total 110 students from various colleges from all over India enrolled for the Vacation training program. At the time of inauguration motivational Guidance and Training kits were distributed by Dr. Bhushan Shinde, Dy. Chief Engineer (Admin). The inaugural program was hosted by Shri. Rahul Pahune Assistant Engineer (Training). Special efforts taken by Shri. Yashil Satarde and Shri Vishweshwar Madavi.

## कार्यस्थळी पर्यावरण आणि स्वच्छतेचे स्वामित्व, कोराडी वीज केंद्रातील प्रेरणादायी उपक्रम

**वृक्ष हमारे मित्र हैं,वृक्ष हमारी जान।**
**वृक्षों की रक्षा बने,पर्यावरणी शान।**

कोराडी औष्णिक विद्युत केंद्र ६६० मेगावॅट कोळसा हाताळणी विभागात(रोड ट्रान्सपोर्ट वे–ब्रिज) येथील कार्यरत मनुष्यबळाने मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या त्रिसूत्रीची अंमलबजावणी करून चांगल्या कामाचा आदर्श दाखवून दिला आहे.

चार वर्षांपूर्वी एक वजन काटा होता तो पण जमिनीलगत असल्याने वजन करताना अडचणी निर्माण व्हायच्या. त्यामुळे वजन काट्याची उंची वाढवून अडचणी दूर केल्या आणि सोबतच नजीकचा परिसर स्वच्छ करून घेतला. त्यानंतर दुसरा वजन काटा बसविताना नियोजनबद्ध पद्धतीने सर्व गोष्टी करून घेतल्याने आता दोन्ही वजन काटे उत्तमरीत्या चालू आहेत.

वजन काट्याच्या दोन्ही बाजूस कच्चा रस्ता होता, वजन काट्यावर वाहन चढताना व उतरताना प्रचंड धूळ उडायची. सिमेंट रस्ता करून घेतल्याने स्वच्छता राखता येते, आता पाणी मारल्यावर कोळशाची धूळ मोठ्या प्रमाणात कमी झाली, परिणामी हवेचे प्रदूषण नियंत्रणात आले. वाहनांचे वजन झाल्यावर वाहन सील तोडणे व टारपोलीन खोलणे हे करावे लागायचे त्यासाठी कच्चा प्लॅटफॉर्म होता, वाहने वारंवार फसायची, त्यासाठी मोठ्या मशीन मागवून फसलेली वाहने काढावी लागत असे. तसेच ५५–६० टन वजनी ट्रक येत असल्याने प्लॅटफॉर्मची वारंवार डागडुजी करावी लागायची. चांगल्या कामाच्या सवयीने वजन काट्यावरील कर्मचाऱ्यांच्या मानसिकतेत सकारात्मक बदल झाला.

दररोज सुमारे ३०० वाहने येतात. प्रत्येक वाहनाचे रिकामे आणि भरलेल्या वाहनांचे वजन करावे लागते. म्हणजे एका दिवसात ६०० वेळा वाहन वजनकाट्यावर येते. असे असूनही काट्यावरील शिस्तबद्ध कार्यपध्दतीमुळे वजनकाट्यावर कोणताही गोंधळ उडत नाही आणि हे काम अतिशय शांततेत व सहजगत्या यशस्वीपणे सुरू आहे. वजन काट्यावरील वातावरणात खुलेपणा आल्याने कोणताही कर्मचारी तणावात राहत नाही आणि कामचुकारपणा हा शब्द येथील कर्मचाऱ्याच्या मनाला सुद्धा शिवत नाही.

वजन काट्याच्या परिसरात रिजेक्ट कोळसा असूनही जवळपास ८० झाडे लावण्यात आली त्याची योग्य निगा राखण्यात आली आणि ही झाडे आता ४ वर्षांची झाली आहेत. त्यामुळे या परिसरात गर्द सावली होत आहे तसेच पक्षांचा किलबिलाट ऐकायला मिळतो. पक्षांसाठी पाणी आणि आवश्यक कडधान्य व्यवस्था देखील केली आहे. जो परिसर पूर्वी प्रचंड प्रदूषित आणि अस्वच्छ होता तो आता स्वच्छ व निसर्गरम्य झाला. ही किमया वजन काट्यावरील कर्मचारी, कंत्राटी कामगार आणि झाडांची विशेष काळजी घेणारे सुरेंद्र, राहुल, रुपेश, पवन या कर्मचाऱ्यांच्या कष्टाचे फलित असल्याचे सहाय्यक अभियंता (शिफ्ट प्रमुख रोड ट्रान्सपोर्ट वे–ब्रिज) श्री. चंद्रकांत जाधव यांनी सांगितले. छोट्या–छोट्या कामातून मोठे काम सहजतेने कसे होते याचे हे उत्तम उदाहरण आहे. या कामात ज्यांनी मागील ४ वर्षांपासून सातत्याने लक्ष घातले आणि कार्यस्थळी बदल घडवून आणला त्याबद्दल या सर्वांचे मुख्य अभियंता श्री. विलास मोटघरे यांनी अभिनंदन केले आहे.

## जीवनवृक्षाच्या पारंब्यांचा शिलेदार !

सातत्यपूर्ण टाकलेले छोटेसे पाऊल सुद्धा सभोवताल समृद्ध करू शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे महानिर्मितीमध्ये वारणा जल विद्युत केंद्र येथे कार्यरत असलेले सहाय्यक अभियंता श्री. गजानन चौगुले. कोयना जल विद्युत केंद्र येथे कार्यरत असताना आजूबाजूला होत असलेला निसर्गाचा ऱ्हास आणि उजाड होत असलेले डोंगर पाहून आपणही निसर्ग संवर्धन केले पाहिजे या ध्यासाने त्यांनी अनोखे व्रत अंगीकारले. ज्याला जीवन वृक्ष असे संबोधले जाते. अशा राष्ट्रीय वृक्ष वडाची लागवड करण्याचा त्यांनी निश्चय केला. अर्थात एकट्याला असलेल्या मर्यादा लक्षात घेऊन त्यांनी आपल्या अनेक स्नेही आणि मित्रांना या संकल्पामध्ये जोडून घेत आजपर्यंत आपल्या निसर्ग मित्रांच्या सहाय्याने ३०० विविध वृक्षांची लागवड केली असून त्यांचे संगोपन करण्यात ते यशस्वी झाले आहेत.

जवळचे स्नेही, निसर्गप्रेमी यांना वड, पिंपळ, कडुलिंब अशा भेट दिलेल्या या रोपांचे आता वृक्षात रूपांतर होत आहे. वृक्ष लागवड करताना त्याची पूर्ण क्षमतेने वाढ व्हावी, याकरिता त्याची योग्य निवड करण्यापासून त्याची योग्य जागी – योग्य पद्धतीने लागवड व्हावी, यासाठी ते कटाक्षाने लक्ष ठेवत असतात. किमान पाच फूट उंचीच्या रोपाची लागवड केली जात असल्याने एका पावसानंतर त्याचे वृक्षात रुपांतर होत असते. त्यांचे माध्यमातून सातारा, सांगली, रत्नागिरी, सिंधुदुर्ग,कोल्हापूर जिल्ह्यामधील निसर्गमित्रांनी त्यांना याकरिता मदत करत वटवृक्ष लागवड केली आहे. हे वटवृक्ष हजारो वर्ष आपल्याला सावली आणि ऑक्सिजन देत राहतील. मात्र

“जेव्हा एका रोपाचे वटवृक्षामध्ये रुपांतर होते तेव्हा पक्ष्यांकरिता एक शहर तयार होत असते”, हे त्यांचे वाक्य त्यांची निसर्गाप्रती असलेली संवेदनशीलता दाखवून देते.

महानिर्मितीच्या या अनोख्या निसर्ग संवर्धक शिलेदाराचे अभिनंदन आणि महानिर्मिती परिवारातर्फे पुढील कार्यास शुभेच्छा...

## Sports Competition held at Koradi Training Centre with full Enthusiasm

Sports is necessary for an individual's overall growth and development. It plays an important part of routine and helpful in keeping ourself Physically as well as Mentally fit. Koradi Training Centre always emphasises for Physical, Mental as well as professional development of Trainees and gives platform for exploring their inner talents.

Under the guidance of Shri. Sunil Sonpethkar, Chief Engineer, Koradi Training Centre we have successfully organised Outdoor as well as Indoor Sports Competitions such as Badminton, Table Tennis, Carrom, Chess, Volley Ball and Cricket were enthusiastically played by Trainees.

Prize Distribution ceremony was organised in presence of Mrs. Bharti Vijaykar, Superintending Engineer (Admin) and Mrs. Aruna Bhendekar, Superintending Engineer with Executive Engineers Mrs. Vidhya Bakde, Shri. Nilesh Wankhede, S. Suke Incharge Executive Engineer and all Koradi Training Centre Engineers.

Prize distribution Ceremony was compered by Mr. Balu Ratnaparkhi, Incharged Executive Engineer on June 14, 2024 for Indoor Sports Competitions such as Badminton, Table Tennis, Carrom, Chess, Volleyball and Cricket.

All Koradi Training Centre staff taken efforts to successfully execute this program.

## घाटघर जल विद्युत केंद्र येथे जागतिक पर्यावरण दिन व महानिर्मितीच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून वृक्षारोपण

घाटघर जल विद्युत केंद्र येथे जागतिक पर्यावरण दिन व महानिर्मितीच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून ६ जून २०२४ रोजी वृक्षारोपण करण्यात आले.

सदर प्रसंगी नवीकरणीय ऊर्जा मंडळ, घाटघर विभाग येथील अधीक्षक अभियंता श्री. कंबोज, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. काशिव, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. तेजस पाटील, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. भोळे, उप व्यवस्थापक (सुरक्षा) श्री. सोनवणे, उप अभियंता श्री. वाझट, श्री. गायकवाड, श्री. मुरगेश व इतर कर्मचारी व कंत्राटी कामगार उपस्थित होते.

## कोराडी औष्णिक वीज केंद्रातून महानिर्मितीमध्ये सर्वात कमी दरात वीज उत्पादन

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीमध्ये दुसऱ्या क्रमांकाची स्थापित क्षमता असणाऱ्या आणि २,१९० मेगावॅट स्थापित क्षमतेच्या कोराडी औष्णिक विद्युत केंद्राने, महानिर्मिती मध्ये एम.ओ.डी. नुसार सर्वात कमी दरात वीज निर्मिती करण्याचे उद्दिष्ट गाठले आहे.

उपलब्ध संसाधनांचा सुयोग्य वापर करीत २१० मेगावॅट आणि ६६० मेगावॅटच्या संचांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी सातत्याने उपाययोजना केल्यामुळे इंधन खपत कमी झाली आणि एकूणच वीजनिर्मितीच्या खर्चात लक्षणीय कपात करता आली. वीजनिर्मिती खर्च कमी झाल्याने वीज ग्राहकांसाठी महानिर्मितीच्या कोराडी येथील संचामधून सर्वात कमी दरात, माहे जून–जुलै २०२४ दरम्यान वीज निर्मिती उपलब्ध करता येईल.

अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ. पी. अन्बलगन, संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारुडकर, कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था – २) श्री. पंकज सपाटे यांनी किफायत दरात वीज निर्मिती केल्याबाबत मुख्य अभियंता श्री. विलास मोटघरे आणि कोराडी वीज केंद्राच्या अधिकारी, अभियंते, तंत्रज्ञ, कर्मचारी, संघटना, कंत्राटदार आणि पुरवठादार यांचे अभिनंदन केले आहे.

## महानिर्मिती तंत्रज्ञ "हॅप्पी कपल"

परळी औष्णिक विद्युत केंद्र, चाचणी विभाग ६, ७ येथे तंत्रज्ञ पती–पत्नी जोडीचे कामात एकत्रित योगदान. श्री. गणेश उपरे तंत्रज्ञ–१ व पूजा खर्गे उपरे तंत्रज्ञ–३ हे पती–पत्नी कार्यरत आहेत. पूजा उपरे ह्या स्टोरकीपर असून रिझर्व्ह शटडाऊनच्या कामासाठी जास्त मनुष्यबळाची गरज असल्याने दोघेही साईटवर कामाला आहेत. रिझर्व्ह शटडाऊनमध्ये ब्रेकर कंट्रोल पॅनलचे कामावेळी दोघेही पती–पत्नी एकत्रित योगदान देत आहेत. चाचणी विभागाचे प्रमुख श्री. सुनिल काळे यांच्या संकल्पनेतून टेस्टिंगची अनेक चांगली कामे पार पाडली जातात.

परळी औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता डॉ. अनिल काठोये व उपमुख्य अभियंता श्री. अमित बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली परळी औ. वि. केंद्राच्या भरभराटीसाठी उपलब्ध मनुष्यबळ व संसाधनाचा जास्तीत जास्त उपयोग होण्यासाठी अनेक नावीन्यपूर्ण गोष्टी अंमलात आणल्या जात आहेत, हे विशेष.

# आम्ही आपले आभारी आहोत

**सांघिक कार्यालय, मुंबई येथून सेवानिवृत्त झालेले अधिकारी कर्मचारी–**

**मार्च २०२४ -** (१) श्री. नारायण मिसाळ – सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं).

**एप्रिल २०२४ -**

(१) श्री. आनंद जोशी– उप मुख्य अभियंता, (२) श्री. जितेंद्र खंडाळे – कार्यकारी अभियंता, (३) श्री. मनोहर गुनाळे – कार्यकारी अभियंता.

**मे २०२४ -** (१) सौ. सुहासिनी कदम शिपाई.

**जून २०२४ -**

(१) श्री. अजय बामणे – मुख्य अभियंता, (२) श्री. विजय गायकवाड – उप कार्यकारी अभियंता

**जुलै २०२४ -**

(१) श्री. सुरेंद्र माहुरे – उप मुख्य अभियंता (स्थापत्य–१), (२) श्री. दिपक राणे – कार्यकारी अभियंता, (३) श्री. अविनाश शेवाळे – उप. अभियंता, (४) श्री. संजय यादव – कार्यकारी अभियंता.

**चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**

**मार्च २०२४ -**

(१) श्री. संजय शेगावकर – कनिष्ठ अभियंता, (२) श्री. देओरओ नवघरे – तंत्रज्ञ १, (३) श्री. भास्कर भागवत – तंत्रज्ञ १, (४) श्री. देवीदास गायकवाड – तंत्रज्ञ १, (५) श्री. अरविंद रायपुरे – तंत्रज्ञ १, (६) श्री. अनुप्रितम राऊत – तंत्रज्ञ १, (७) श्री. बंडू ढोके – तंत्रज्ञ १, (८) श्री. राजेश माहुलकर – तंत्रज्ञ ३, (९) श्री. बाळू पाखरे – तंत्रज्ञ २, (१०) श्री. हेमंतकुमार कस्तुरे – तंत्रज्ञ २, (११) श्री. पुरुषोत्तम पांडे – चौकीदार, (१२) श्री. विष्णू मस्के – समयपाल.

**एप्रिल २०२४ -**

(१) श्री. भीमराव पळवेकर – तंत्रज्ञ १, (२) श्री. विलास कोळसे – तंत्रज्ञ १, (३) श्री. छत्रपती श्रीखंडकर – तंत्रज्ञ १, (४) श्री. अनिल चौरे – टंकलेखक.

**मे २०२४ -**

(१) श्री. प्रमोदकुमार चाणेकर – सहाय्यक अभियंता, (२) श्री. फिरोज शेख – तंत्रज्ञ –१, (३) श्री. गोवर्धन रामटेके – तंत्रज्ञ –१, (४) श्री. अरुण रचालवर – तंत्रज्ञ –१.

**जून २०२४ -**

(१) श्री. नेरुपाल राहुलगडे – तंत्रज्ञ–२, (२) श्री. विलास हजारे – मदतनीस, (३) श्री. संजय बनसोड – उप व्यवस्थापक (वित्त व लेखा), (४) श्री. दिनकर मशाखेत्री – सहाय्यक अभियंता, (५) श्री. संदिप कौर – कार्यकारी अभियंता, (६) श्री. प्रभुराज मोरे – तंत्रज्ञ १, (७) श्री. कृष्णा जुंगहारे – तंत्रज्ञ १, (८) श्री. हेमंत हिरडे – तंत्रज्ञ १, (९) श्री. सुरेश निंकर्दे – तंत्रज्ञ १, (१०) श्री. गजानन चांदेकर – तंत्रज्ञ १, (११) श्री. प्रेमचंद कोवे पहारेकरी, (१२) श्री. जयंत तायडे – तंत्रज्ञ १, (१३) श्री. राजेश मून – तंत्रज्ञ २.

**जुलै २०२४ -**

(१) श्री. दयाराम जयपूरकर – तंत्रज्ञ– १, (२) श्री. उदाराम काठेवार – तंत्रज्ञ–२, (३) श्री. भीमराव नारणावरे तंत्रज्ञ–१, (४) श्री. मारोती पिडूरकर – तंत्रज्ञ १.

**कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**

**मार्च २०२४ -**

(१) श्री. दिवाकर देशमुख – वरिष्ठ व्यवस्थापक (मासं), (२) श्री. रवींद्र केळकर – अतिरिक्त अभियंता.

**एप्रिल २०२४ -**

(१) श्री. मोहन जाधव– अतिरिक्त कार्यकारी अभियंता, (२) किसना खडसे – कार्यकारी अभियंता.

**मे २०२४ -**

(१) श्री. वासुदेव पोकळे उप कार्यकारी अभियंता, (२) श्री. परशराम गांगुरडे – सहाय्यक केमिस्ट), (३) श्री. राजेंद्र गुजर – तंत्रज्ञ–१, (४) श्री. अर्जुन ढवळे – तंत्रज्ञ–१, (५) श्री. नरेंद्र हेलोडे – तंत्रज्ञ–१, (६) श्री. आशीष सोरती – अतिरिक्त माजी अभियंता.

**जून २०२४ -**

(१) श्री. नीलकंठ दिक्षीत – कार्यकारी अभियंता, (२) श्री. गौतम वाकडे – उप कार्यकारी अभियंता, (३) श्री. सुधाकर देशमुख – सहाय्यक अभियंता, (४) श्री. उत्तम महंत – तंत्रज्ञ– १, (५) श्री. घनश्याम भिवणकर – तंत्रज्ञ–१, (६) श्री. अंकुश पुरी – तंत्रज्ञ–१, (७) श्री. पुरुषोत्तम सोनारे – तंत्रज्ञ–१, (८) श्री. सुरेश पाटील – तंत्रज्ञ–१, (९) श्री. सुनील गेडम – तंत्रज्ञ –२, (१०) श्री. गणेशलाल जयस्वाल – तंत्रज्ञ –३

**जुलै २०२४ -**

(१) श्री. गजानन डोंगरे – कार्यकारी अभियंता, (२) श्री. राहुल दिवे – अतिरिक्त कार्यकारी अभियंता, (३) श्री. प्रभुमन मेश्राम अतिरिक्त – कार्यकारी अभियंता, (४) श्री. चंद्रशेखर लखोटे – तंत्रज्ञ–१, (५) श्री. राजू वांखाडे – तंत्रज्ञ–१.

**खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी:-**

**एप्रिल २०२४ -**

(१) श्री. अनिरुद्ध वाईकर – कार्यकारी अभियंता, (२) श्री. प्रशांत चव्हाण उप कार्यकारी अभियंता, (३) श्री. सुनील मडवी – चार्जमन ग्रेड–२.

**मे २०२४ -**

(१) श्री. अतुल चव्हाण – कार्यकारी अभियंता, (२) श्री. रवींद्र मडवी – व्यवस्थापक (वित्त व लेखा).

**भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**

**मार्च २०२४ -** (१) श्री. पवन सोनवणे – उप मुख्य अभियंता.

**एप्रिल २०२४ -**

(१) श्री. शिवाजी गीते – सहाय्यक रसायनशास्त्रज्ञ, (२) श्री. रतनसिंग पाटील – दफ्तरी.

**मे २०२४ -**

(१) सौ. कल्पना बावा – कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ, (२) श्री. बाळकृष्णा चौधरी – उप कार्यकारी अभियंता, (३) श्री. सतीश इंगळे – तंत्रज्ञ –१, (४) श्री. शशिकांत चौधरी – तंत्रज्ञ १, (५) श्री. चंद्रकांत पाटील – वाहन चालक, (६) श्री. कमल पाटील – सफाई कामगार.

**जून २०२४ -**

(१) श्री. अशोक मराठे – अतिरिक्त कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ, (२) श्री. प्रदिप साळे – तंत्रज्ञ–१, (३) श्री. मधुकर चौधरी – तंत्रज्ञ–१, (४) श्री. भरत पाटील – तंत्रज्ञ–१, (५) श्री. गुणवंत चौधरी – तंत्रज्ञ–१, (६) श्री. संतोष पाटील – तंत्रज्ञ–१.

**जुलै २०२४ -**

(१) श्री. ज्ञानेश्वर दांडगे – अतिरिक्त रसायनशास्त्रज्ञ, (२) श्री. निवृत्ती पवार – चार्जमन ग्रेड –१.

## आम्ही आपले आभारी आहोत

**पारस औष्णिक विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**

**मार्च २०२४ -** (१) श्री. अफजल जियाअहमद - उप मुख्य अभियंता.

**एप्रिल २०२४ -**

(१) सौ. इंदिरा गवांडे - परिचालिका, (२) श्री. भागवनसिंग दंबेरॉ - पहारेकरी.

**मे २०२४ -** (१) श्री. रवी व्यास - उप महाव्यवस्थापक (सुरक्षा).

**जून २०२४ -**

(१) श्री. भगवान चिंतले - उप कार्यकारी अभियंता, (२) श्री. श्रीकृष्णा आरखरओ - तंत्रज्ञ-१, (३) श्री. तुकाराम काले - तंत्रज्ञ-१, (४) श्री. हेमंत बंद - उच्चस्तर लिपिक (वित्त व लेखा), (५) श्री. उदलसिंग पेजवार - पहारेकरी.

**जुलै २०२४ -**

(१) श्री. सुनील चंदनबटवे - तंत्रज्ञ-२, (२) श्री. लक्ष्मण सोनावणे - डब्ल्यु.एस.एच./स्थापत्य मदतनीस.

**जुलै २०२४ -**

(१) श्री, प्रवीण दिक्षीत - अतिरिक्त कार्यकारी अभियंता, (२) सौ. तृप्ती वाघंबरे - उप कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ.

**परळी औष्णिक विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**

**मार्च २०२४ -** (१) श्री. बबन मुंडे - तंत्रज्ञ-१, (२) श्री. शांतीलाल मुंडे - तंत्रज्ञ-१.

**एप्रिल २०२४ -** (१) श्री. गोविंद माने - चार्जमन ग्रेड-१.

**मे २०२४ -**

(१) श्री. सिदराम बामगोनडे - उप कार्यकारी अभियंता, (२) श्री. देवीदास लांडे - तंत्रज्ञ-१, (३) श्री. ज्ञानोबा येडाले - तंत्रज्ञ-१, (४) श्री. भास्कर भिसे - तंत्रज्ञ-२.

**जून २०२४ -**

(१) श्री. संतराम गिराम - सहाय्यक रसायनशास्त्र, (२) श्री. शंकर कुंभार - सहाय्यक लेखापाल.

**नाशिक औष्णिक विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**

**एप्रिल २०२४ -**

(१) श्री. सुनील गायकवाड - कार्यकारी अभियंता, (२) श्री. नंदकूमार चौधरी - कार्यकारी अभियंता, (३) श्री. अनिलकुमार कस्तुरे - सहाय्यक अभियंता, (४) श्री. रवींद्र कोष्टी - चार्जमन ग्रेड-१.

**मे २०२४ -**

(१) श्री. विष्णु मिसल - उप कार्यकारी अभियंता, (२) श्रीमती. वंदना चव्हाण - सहाय्यक लेखा, (३) श्री. प्रमोद बागुल - तंत्रज्ञ-२.

**जून २०२४ -**

(१) श्री. आबासाहेब मोरले - उप कार्यकारी अभियंता, (२) श्री. संजय पाटील - सहाय्यक अभियंता.

**जुलै २०२४ -** (१) श्री. राजेंद्र हिंगे - अतिरिक्त कार्यकारी अभियंता.

**उरण वायु विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**

**मे २०२४ -**

(१) श्री. अनिल शिंदे - उप कार्यकारी अभियंता, (२) जगन्नाथ शिंदे - उप कार्यकारी अभियंता, (३) श्री. लक्ष्मण निकम - तंत्रज्ञ-१.

**जून २०२४ -** (१) श्री. सुभाष गांगुर्डे - तंत्रज्ञ-३

**जुलै २०२४ -**

(१) श्री. दशरथ चव्हाण - पहारेकरी, (२) श्री. संतोबा नाईक - वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा).

**कोयना जल विद्युत केंद्र संकुल येथून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी:-**

**एप्रिल २०२४ -** (१) श्री. राजेंद्र क्षत्रिय - उप कार्यकारी अभियंता.

**मे २०२४ -**

(१) श्री. सुरेश चव्हाण - उप कार्यकारी अभियंता, (२) श्री. एकनाथ पुजारी - तंत्रज्ञ-१, (३) श्री. अनिल विभूते - चार्जमन ग्रेड-२.

**जून २०२४ -** (१) सौ. प्रणाली कांबळे - टंकलेखक.

**जुलै २०२४ -** (१) श्रीमती. रेश्मा मराठे - शिपाई.

**वीर भाटघर जल विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**

**मार्च २०२४ -** (१) श्री. सुधाकर शिंदे - इतर कर्मचारी-४.

**जून २०२४ -** (१) श्री. प्रदीप वाठारे उप कार्यकारी अभियंता

**एप्रिल २०२४ मध्ये जनरल कन्स्ट्रक्शन कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**

(१) सुनील रामटेके - मुख्य अभियंता.

**पानशेत जल विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी कर्मचारी**

**एप्रिल २०२४ -** (१) श्री. शंकर नाळे - उप कार्यकारी अभियंता.

**मे २०२४ -** (१) श्री. सुरेश मोहरे - पहारेकरी.

**जून २०२४ -** (१) श्री. विश्वनाथ दिघे - तंत्रज्ञ-३.

**वैतरणा जल विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी कर्मचारी-**

**मे २०२४ -**

(१) श्री. राजेंद्र महाजन - सहाय्यक अभियंता, (२) श्री. पुंडलिक गायकवाड - चार्जमन ग्रेड-२, (३) श्री. विष्णु दिवे - मदतनीस.

**जुलै २०२४ -** (१) श्री. जयंत सोनवणे - तंत्रज्ञ-१.

**मे २०२४ मध्ये जल विद्युत केंद्र भिरा टेलरेस येथून सेवानिवृत्त झालेले अधिकारी कर्मचारी-**

(१) श्री. जैतू पदीर - वाहन चालक.

**जून २०२४ मध्ये कोळसा विभाग, नागपूर येथून सेवानिवृत्त झालेले अधिकारी कर्मचारी :-**

(१) श्री. संजय भुरे - कार्यकारी अभियंता.

**जून २०२४ मध्ये पुणे येथून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**

(१) श्री. महेश अभयनकर - कार्यकारी अभियंता.

## प्रतिक्रिया

Respected Sir,

We are very much thankful and grateful for implementing such a beautiful motivating activity continuously every morning or as per event.

It gives us reminder to wish birthday, retirement, Mahagenco positive News-Highest Generation, Social, Organisational, Cultural, National, News & Events, Awards, Women's Empowerment, Inspirational Stories and many more attitude changing events.

Also, the most important thing - Your initiative has been creating a great impact in the lives of Mahagenco employees in terms of Organisation Love, Integrity and Honesty towards Work, Man, Machine, Safety etc. of our assets.

Apart from daily work, we get News at a glance in short.

The most and valuable thing is we get direct message from our Hon'ble CMD Sir & Respected Director Sir on generation targets & it's achievements with Special Guidance and Appreciation on various occasions.

I express deep gratitude to you and your team for implementing such a nice activity and we assured you that this heart connecting initiative certainly motivating us to work with vim & vigour to make our organisation No.1 in Power Industry as well as invokes our share in progress, growth and development of our Mahagenco to maintain & sustain the name & fame, goodwill as Mahagenco-The topmost power generating company in India.

Thank you very much, sir.

With warm regards,

**- Jaywardhan Suryawanshi**
Asst. Engineer
Parli TPS.

## Two Important Books released on Effective Practices in Power Station

Mahagenco's Hon.Chairman and Managing Director has Launched essential plant Operation Resources.

(1) Operation Directives

(2) Operation Guidance Notes.

Operation Directives : This mandatory document, prepared by the Chief Engineer (EST), Mr.Sunil Sonpethkar who outlines essential aspects of plant operation and maintenance. It ensures consistent and effective practices across all power stations.

Operation Guidance Notes also compiled by the Chief Engineer (EST), Shri Sunil Sonpethkar, this resource provides detailed, step-by-step procedures for various operation and maintenance tasks.

These comprehensive resources will empower power station personnel with the knowledge and guidance necessary for safe, efficient and reliable plant operation.

This caption clarifies the titles and purposes of the documents, emphasizes their importance and highlights the role of the Chief Engineer (EST).

## कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात अंतर्गत वाहतूकीसाठी बहूपयोगी आठ सीटर इलेक्ट्रीक वाहन सेवा

महानिर्मिती कोराडी औष्णिक विद्युत केंद्र येथे कार्यरत अधिकारी, कर्मचारी व सर्व संबंधितांसाठी २४ जून २०२४ पासून वीज केंद्रात अंतर्गत वाहतूकीसाठी बहुपयोगी आठ सीटर इलेक्ट्रिक वाहन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या प्रसंगी कोराडी औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता श्री. विलास मोटघरे, उप मुख्य अभियंता श्री. राहुल सोहनी व श्री. शैलेन्द्र कासुलकर, प्रभारी उप मुख्य अभियंता श्री. भास्कर इंगळे, अधीक्षक अभियंते श्री. सचिन देगवेकर, श्री. नितिन रोकडे, श्री. कुणाल घाटे, श्री. परिमल रामटेके, सौ. सारिका सोनटक्के, सौ. किरण नानवटकर तसेच विभागप्रमुख, अधिकारी, संघटना पदाधिकारी / प्रतिनिधी, कर्मचारी व कंत्राटी कामगार प्रामुख्याने उपस्थित होते.

अंतर्गत वाहतूकीसाठी बहुपयोगी आठ सीटर इलेक्ट्रिक वाहन सुविधेची सुरुवात करण्यात आल्यामुळे, २१० मेगावॅट आणि ६६० मेगावॅट प्लांटच्या परिसरात तसेच कोळसा हाताळणी विभागात आवश्यकतेनुसार मनुष्यबळ व संसाधने यांची गतीशील आणि पर्यावरणपूरक वाहतूक करणे सोयीचे होणार आहे. या सुविधेमुळे वीज केंद्रातील संबंधित सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

# भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र येथे आंतर विद्युत केंद्र - आंतरगृह क्रीडा स्पर्धा - २०२३-२४ संपन्न

**ब्रिज - सांघिक उपविजेता (भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र) :**
(१) ईश्वर उध्दव उगलमुगले, (२) पंकज गोविंद हिरे, (३) बंडु रतन पातोडे, (४) मिलिंद भिकाजी पगारे, (५) अविनाश दिगंबर जाधव, (६) गजानन श्रीराम आगरकर.
**ब्रिज - सांघिक विजेता (कोराडी औष्णिक विद्युत केंद्र) :**
(१) विकांत मस्के, (२) भारत पराते, (३) उज्वल प्पुपलवार, (४) दिपक टिकास, (५) अमर रामटेके, (६) प्रशांत बारसागडे.

**ब्रिज - पेयर प्रोग्रेसिव - उपविजेता (खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र) :**
(१) देविदास नन्नावरे, (२) अजय चवरे.
**ब्रिज - पेयर प्रोग्रेसिव - विजेता (कोराडी औष्णिक विद्युत केंद्र) :**
(१) उज्वल प्पुपलवार, (२) दिपक टिकास.

**टेबल टेनिस - महिला - सांघिक उपविजेता (पारस औष्णिक विद्युत केंद्र) :**
(१) भारती अंभोरे, (२) मनिषा बावणे, (३) योगिता बाप.
**टेबल टेनिस - महिला - सांघिक विजेता (भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र) :**
(१) ऐश्वर्या खोसे, (२) मिताली कांबळे, (३) प्रगति गित्ते.

**टेबल टेनिस - पुरुष - सांघिक उपविजेता (सांघिक कार्यालय, मुंबई) :**
(१) समीर म्हस्के, (२) गणेश पाटील, (३) अमित पाटील, (४) मुकेश कलागोरी, (५) राहुल शेळके.
**टेबल टेनिस - पुरुष - सांघिक विजेता (कोयना जल विद्युत केंद्र संकुल) :**
(१) अरविंद सुतार, (२) सुरेश जाधव, (३) विनायक गणाचारी, (४) शिवाजी लोखंडे, (५) अरुण जाधव.

**टेबल टेनिस - खुला गट - पुरुष - उपविजेता (सांघिक कार्यालय, मुंबई) :**
(१) समीर म्हस्के.
**टेबल टेनिस - खुला गट - पुरुष - विजेता (सांघिक कार्यालय, मुंबई) :**
(१) गणेश पाटील.

**टेबल टेनिस - खुला गट - महिला - उपविजेता (सांघिक कार्यालय, मुंबई) :**
(१) वैशाली पाटील.
**टेबल टेनिस - खुला गट - महिला - विजेता (खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र) :**
(१) पूजा टागोरे.

**टेबल टेनिस - खुला गट - पुरुष दुहेरी - उपविजेता (सांघिक कार्यालय, मुंबई) :**
(१) गणेश पाटील, (२) समीर म्हस्के.
**टेबल टेनिस - खुला गट - पुरुष दुहेरी - विजेता (कोयना जल विद्युत केंद्र, पोफळी) :**
(१) अरविंद सुतार, (२२) सुरेश जाधव.

**टेबल टेनिस-खुला गट-महिला दुहेरी-उपविजेता (खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र) :**
(१) शुभांगी चिंचुरकर, (२) पूजा टोंगारे.
**टेबल टेनिस - खुला गट - महिला दुहेरी - विजेता (सांघिक कार्यालय, मुंबई) :**
(१) वैशाली पाटील, (२) दर्शना रॉड्रीग्ज.

**बॅडमिंटन - महिला - सांघिक उपविजेता (भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र) :**
(१) रेवती मुळे, (२) शुभांगी साबे, (३) अश्विनी बेंद्रे.
**बॅडमिंटन - महिला - सांघिक विजेता (खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र) :**
(१) करुणा दहिवले, (२) लक्ष्मी पाटील, (३) पल्लवी शिरसाठ.

**बॅडमिंटन - पुरुष - सांघिक उपविजेता (कोराडी औष्णिक विद्युत केंद्र) :**
(१) प्रियम सबलोक, (२) राहुल वैद्य, (३) इशान मेश्राम, (४) निलेश साबळे, (५) भुषण देशमुख.
**बॅडमिंटन - पुरुष - सांघिक विजेता (नाशिक औष्णिक केंद्र) :**
(१) शशांक केशरखाने, (२) आशिष पवार, (३) प्रसाद डिग्रसकर, (४) लतिकेश कदम, (५) चंद्रसेन परदेशी.

**बॅडमिंटन - उत्कृष्ट खेळाडू - पुरुष एकेरी (कोराडी औष्णिक विद्युत केंद्र)**
(१) प्रितम सबलोक
**बॅडमिंटन - उत्कृष्ट खेळाडू - महिला एकेरी (भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र)**
(१) रेवती मुळे

**बॅडमिंटन - उत्कृष्ट खेळाडू - पुरुष - दुहेरी (नाशिक औष्णिक विद्युत केंद्र) :**
(१) शशांक केसरखाने, (२) आशिष पवार.
**बॅडमिंटन - उत्कृष्ट खेळाडू - महिला - दुहेरी (खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र) :**
(१) करुणा दहिवले, (२) लक्ष्मी पाटील.

**बुद्धिबळ - महिला - उपविजेता (भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र) :** (१) प्रतिक्षा काळे.
**बुद्धिबळ - महिला - विजेता (परळी औष्णिक विद्युत केंद्र) :** (१) शमिम शेख.

**बुद्धिबळ-पुरुष एकेरी-उपविजेता (परळी औष्णिक विद्युत केंद्र):** (१) सखाराम देशपांडे.
**बुद्धिबळ - पुरुष एकेरी - विजेता (नवीकरणीय ऊर्जा) :** (१) संग्राम सावंत.

**बुद्धिबळ - सांघिक उपविजेता (भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र) :**
(१) गिरीश बोदले, (२) अभिजीत जोशी, (३) सुधिर महाले, (४) हर्षद अहिरराव.
**बुध्दिबळ - सांघिक विजेता (परळी औ. वि. केंद्र) :**
(१) अमोल काळे, (२) सखाराम देशपांडे, (३) अशोक मुडे, (४) प्रकाश चव्हाण.

**कॅरम-महिला एकेरी-उपविजेता (भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र) :** (१) मितीली कांबळे.
**कॅरम-महिला एकेरी-विजेता (खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र) :** (१) स्नेहा सैनी.

**कॅरम - महिला दुहेरी - उपविजेता (परळी औष्णिक विद्युत केंद्र) :**
(१) पल्लवी शिराळे, (२) स्वाती घाटे.
**कॅरम - महिला दुहेरी - विजेता (कोराडी औष्णिक विद्युत केंद्र) :**
(१) सुचिता पवार, (२) इंदुबाई डोमडे.

**कॅरम - पुरुष एकेरी - उपविजेता (परळी औष्णिक विद्युत केंद्र) :** (१) अविनाश पवार.
**कॅरम - पुरुष एकेरी - विजेता (खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र) :** (१) अनिल राठोड.

**कॅरम - पुरुष दुहेरी - उपविजेता (परळी औष्णिक विद्युत केंद्र) :** (१) अविनाश पवार, (२) मनिष बलखंडे.
**कॅरम-पुरुष दुहेरी-विजेता (चंद्रपुर औ.वि.केंद्र):** (१) जावेद पठाण, (२) अमोल धाकडे.

**कुस्ती-५७ किलो गट-उपविजेता (परळी औ. वि. केंद्र) :** (१) श्रीकृष्ण दत्तात्रय चाटे
**कुस्ती - ५७ किलो गट - विजेता (नविकरणीय ऊर्जा) :** (१) सुनिल एम बंडगर.

**कुस्ती - ६१ किलो गट - उपविजेता (चंद्रपूर महा औ. वि. केंद्र) :** (१) सिध्दांत रामटेके.
**कुस्ती - ६१किलो गट - विजेता (नविकरणीय ऊर्जा) :** (१) प्रकाश बाबुराव मोहिते.

**कुस्ती - ६५ किलो गट - उपविजेता (नविकरणीय ऊर्जा) :** (१) भरमण्णा के. नाईक.
**कुस्ती - ६५ किलो गट - विजेता (नाशिक औ वि केंद्र) :** (१) रणजीत बी. काशीद.

**कुस्ती-७० किलो गट-उपविजेता (परळी औ.वि. केंद्र) :** (१) आकाश वि. मदिलवार.
**कुस्ती - ७० किलो गट - विजेता (भुसावळ औ वि केंद्र) :** (१) आप्पा बाबुराव राठोड.

**कुस्ती-७४ किलो गट-उपविजेता (परळी औ.वि. केंद्र) :** (१) दत्ता गोविंद पुरी.
**कुस्ती-७४ किलो गट-विजेता (भुसावळ औ.वि केंद्र) :** (१) मानशिंग कौतिक कोकणी.

**कुस्ती-७९ किलो गट-उपविजेता (सांघिक कार्यालय, मुंबई) :** (१) रियाज उस्मान शेख.
**कुस्ती-७९ किलो गट-विजेता (चंद्रपूर महा. औ.वि. केंद्र) :** (१) नामदेव गित्ते.

**कुस्ती-८६ किलो गट-उपविजेता (भुसावळ औ.वि.केंद्र) :** (१) विकास बाबूलाल राठोड.
**कुस्ती-८६ किलो गट-विजेता (कोराडी औ.वि.केंद्र) :** (१) शरद पांडे.

**कुस्ती-९२ किलो गट-उपविजेता (पारस औ. वि. केंद्र) :** (१) विजय गिर्हे.
**कुस्ती-९२ किलो गट-विजेता (खापरखेडा औ. वि. केंद्र ) :** (१) राजेश आर. बिस्वास.

**कुस्ती-९७ किलो गट-उपविजेता (कोराडी औ.वि. केंद्र) :** (१) ज्ञानेश्वर सहारे.
**कुस्ती-९७ किलो गट-विजेता (भुसावळ औ.वि. केंद्र) :** (१) दत्तात्रय भास्करराव शिंदे.

**कुस्ती-१२५ किलो गट - उपविजेता (चंद्रपूर महा. औ. वि. केंद्र) :** (१) अर्जुन मुंडे.
**कुस्ती-१२५ किलो गट - विजेता (नाशिक औ. वि. केंद्र) :** (१) डिगंबर छबुराव गित्ते.

## अभियंता अभिजित कुळकर्णी यांच्या आकस्मिक निधनाने महानिर्मितीची अपिरिमित हानी



कुस्तीगीर, साखर कारखाने, मराठी नाट्यपंढरी, हळदीचे शहर आणि कृष्णा काठ ही सांगली शहराची ओळख. याच मातीत अभिजित कुळकर्णी संस्कारित झाले आणि सन १९९८ मध्ये "सहाय्यक अभियंता" म्हणून तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात आणि वर्तमान महानिर्मितीच्या चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रात ते रुजू झाले. चंद्रपूर, पोफळी, नाशिक, पुणे, मुंबई येथे त्यांनी उप मुख्य अभियंता पदापर्यंत किंबहुना प्रभारी मुख्य अभियंता पदापर्यंत आपल्या कार्याची, कौशल्यतेचे चुणूक दाखवून दिली. अनेक तांत्रिक इंग्रजी शब्दांना मराठी पर्यायी शब्द दिले. अभियांत्रिकी ज्ञानासोबतच उत्तम शरीरयष्टी, उच्च विद्याविभूषित, सौंदर्यदृष्टी, रसिकता, समयसूचकता, साहित्य–संस्कृती, मराठी भाषा–लेखन–व्याकरणाचा अभ्यास, भाषण कौशल्य, व्यंगचित्रे, गडकिल्ले, छत्रपती शिवाजी महाराज, दासबोध, स्वातंत्र्यवीर सावरकर, ऐतिहासिक–अध्यात्मिक चिंतन आणि पाठांतर इत्यादी बाबींवर त्यांचा हातखंडा होता. त्यांच्या कल्पकतेतून महानिर्मितीच्या अतिथिगृहात लावलेली वॉटर कलर मधील पेंटिंग तसेच त्यांचे प्रकल्प, जल विद्युत आणि नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रातील योगदान वर्तमान आणि आगामी पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारे आहे, हे निश्चित. अशा या बहुगुणी व्यक्तिमत्वाच्या अचानक जाण्याने महानिर्मितीची अपरिमित हानी झाली आहे. त्यांच्या कार्यकर्तृत्वास मानाचा मुजरा आणि महानिर्मिती परिवारातर्फे साश्रू नयनांनी भावपूर्ण श्रद्धांजली...

**"तू अभिजित तू कुशल सारथी, अनेक प्रकल्पांचा तू सेनापती,**
**भाषा प्रवीण तू विद्यावाचस्पती, जीवलग मित्र अन् आश्वासक सोबती,**
**कुशल अधिकारी अन् तत्पर सेवाव्रती, आदर्श कुटुंब प्रमुख तू जोडूनी नाती,**
**तू कलासक्त अमोघ तव अभिव्यक्ती, तुज विन अमुची सदा ओंजळ रिती"**



**For the first time in BTPS Project, Simulator Training for N71, N72 & N73 batches were conducted. Junior Engineers / Assistant Engineers trainees had hands on experience in 660 MW Cold Light up upto Boiler Light up. Training was imparted by Shobha Subramaniam Exe.Engr and it was successfully carried out and very much appreciated by all trainees. Mr. Sanjay Darade Addl.EE NTC, Mr. Kahale and Mr. Sangram Korde were co-ordinators.**



**वेस्टर्न कोलफिल्डस् लि. चे अध्यक्ष–तथा–व्यवस्थापकीय संचालक श्री. जे.पी. द्विवेदी यांची महानिर्मितीचे संचालक (खनिकर्म) डॉ. धनंजय सावळकर यांनी औपचारिक भेट घेतली. या बैठकीत विविध विषयांवर यशस्वी चर्चा संपन्न झाली.**

## महानिर्मिती तंत्रज्ञ - हॅप्पी कपल



परळी औष्णिक विद्युत केंद्र चाचणी विभाग ६, ७ येथे तंत्रज्ञ पती–पत्नी जोडीचे कामात एकत्रित योगदान. श्री. गणेश उपरे तंत्रज्ञ–१ व पूजा खर्गे उपरे तंत्रज्ञ–३ हे पती पत्नी कार्यरत आहेत. पूजा उपरे ह्या स्टोरकीपर असून सध्या रिझर्व्ह शट डाऊनच्या कामासाठी जास्त मनुष्यबळाची गरज असल्याने दोघेही साईटवर कामाला आहेत. रिझर्व्ह शट डाऊनमध्ये ब्रेकर कंट्रोल पॅनलचे कामावेळी दोघेही पती–पत्नी एकत्रित योगदान देत आहेत. चाचणी विभागाचे प्रमुख श्री. सुनिल काळे यांच्या संकल्पनेतून टेस्टिंगची अनेक चांगली कामे पार पाडली जातात.

## जीवनवृक्षाच्या पारंब्यांचा शिलेदार!



महानिर्मितीमध्ये वारणा जल विद्युत केंद्र येथे कार्यरत असलेले सहाय्यक अभियंता श्री. गजानन चौगुले ह्यांनी निसर्ग संवर्धनाचे व्रत हाती घेऊन त्यांनी आपल्या अनेक स्नेही आणि निसर्ग मित्रांच्या सहाय्याने ३०० विविध वृक्षांची लागवड केली असून त्यांचे संगोपन करण्यात ते यशस्वी झाले आहेत. त्यांनी लागवड केलेल्या वड, पिंपळ, कडुलिंब अशा रोपांचे आता वृक्षात रूपांतर झाले आहे.



15 MW Solar Power Purchase Agreement between MAHAGENCO and M/s. SEZ Biotech Pvt. Ltd., Pune in the presence of Hon'ble Chairman & Managing Director Dr. P. Anbalagan, Director (Finance) Hon'ble Shri. Balasaheb Thite, Director (Projects) Hon'ble Shri. Abhay Harne, Chief Engineer (RE Projects) Shri. Sanjay Kurhade and General Manager (MREL) Shri. Harshal Bhaskare



MAHAGENCO's Hon'ble Chairman and Managing Director Dr. P. Anbalagan has launched Book on Essential Plant Operation Resources in the presence of Hon'ble Directors and Executive Directors of MAHAGENCO

## कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात अंतर्गत वाहतुकीसाठी बहुपयोगी आठ सीटर इलेक्ट्रिक वाहन सेवा





महानिर्मिती कोराडी औष्णिक विद्युत केंद्र येथे कार्यरत अधिकारी, कर्मचारी व सर्व संबंधितांसाठी वीज केंद्रात अंतर्गत वाहतुकीसाठी बहुपयोगी आठ सीटर इलेक्ट्रिक वाहन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. या प्रसंगी कोराडी औ.वि.केंद्राचे मुख्य अभियंता श्री. विलास मोटघरे, उप मुख्य अभियंता श्री. राहुल सोहनी व श्री. शैलेन्द्र कासुलकर, प्रभारी उप मुख्य अभियंता श्री. भास्कर इंगळे आाणि अधीक्षक अभियंते, विभागप्रमुख, अधिकारी, संघटना पदाधिकारी / प्रतिनिधी, कर्मचारी व कंत्राटी कामगार प्रामुख्याने उपस्थित होते.

## कोराडी प्रशिक्षण केंद्रामध्ये महानिर्मितीच्या कनिष्ठ / सहाय्यक रसायनशास्त्रज्ञ यांचे इंडक्शन लेव्हल प्रशिक्षण





कोराडी प्रशिक्षण केंद्रामध्ये कनिष्ठ/ सहाय्यक रसायनशास्त्रज्ञ यांचे इंडक्शन लेव्हल बॅच प्रशिक्षण सुरु झाले. प्रशिक्षण केंद्राचे मुख्य अभियंता (प्रशिक्षण) श्री. सुनिल सोनपेठकर यांच्या अध्यक्षतेखाली सदर बॅचचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून खापरखेडा औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता श्री. विजय राठोड यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमास अधीक्षक रसायनशास्त्रज्ञ श्री. राजेश चिवाने, श्री. विवेक घोडमारे तसेच अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) सौ. भारती विजयकर, सौ. अरुणा भेंडेकर व इतर अधिकारी वर्ग उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सौ. श्रध्दा सुके तर आभार प्रदर्शन श्री. प्रशांत धांदे यांनी केले.










MAHAGENCO's Director (Projects) Hon'ble Shri. Abhay Harne attended New Energies Conclave recently held at Mumbai. It was on Green Hydrogen as a Versatile Energy Carrier.



MAHAGENCO's Director (Projects) Hon'ble Shri. Abhay Harne attended the Asia Clean Energy Forum (ACEF), with the theme "Accelerating the Clean Energy Transition and Ensuring Energy Security and Affordability - Time for Urgent Action Now" on 3 to 7 June 2024 at ADB Headquarters in Manila, Philippines.






महानिर्मिती नॉलेज बँक (प्रश्नोत्तरे) डेस्क टॉप स्क्रीन सेव्हरवर



Welcoming NTPC Director (Finance) & (HR) Shri. Jaikumar Srinivasan by Director (Operations) Shri. Sanjay Marudkar and Director (Projects) Shri. Abhay Harne in the presence of Company Secretary Shri. Rahul Dubey and General Manager (MREL) Shri. Harshal Bhaskare

## भाटघर जलविद्युत केंद्र वसाहत येथे महिला दिन उत्साहात संपन्न






भाटघर विद्युत केंद्र व भाटघर विभागीय कार्यालय यांचे वतीने महिला दिन अधीक्षक अभियंता (नवीकरणीय ऊर्जा), पुणे यांचे अध्यक्षतेखाली उत्साहात साजरा करण्यात आला. महिला दिनाचे औचित्य साधून विविध कार्यक्रम तसेच केंद्रातील अधिकारी-कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले.

















**Mahagenco Mission 5E workshop held at Koradi Thermal Power Station Glimpses thereof...**











# Mahagenco Mission 5E workshop held at Koradi TPS - Glimpses thereof...
























## Mahagenco Mission 5E workshop held at Koradi Thermal Power Station Glimpses thereof...
















**संपादक : यशवंत मोहिते (जनसंपर्क अधिकारी)**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :** संपादक, सृजन (महानिर्मिती), प्रकाशगड, दुसरा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०००५१. **(खाजगी वितरणासाठी)**

**E-mail :** pro@mahagenco.in
**Web. :** www.mahagenco.in
**Printed & Published by :** Shri. Yashwant Mohite for
**MAHARASHTRA STATE POWER GENERATION CO. LTD.**

**Printed At : Hema Arts**
121, Sagar, Prabhat Ind. Estate, Near Dahisar Checknaka,
Western Express Highway, Dahisar (E), Mumbai - 400068.
PH. : 28968221 & Published at Hongkong Bank Bldg., M.G. Road,
Fort, Mumbai - 400 001.
**The Company accepts no responsibility for the matter published in the journal.**